# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल
## २०२४-२०२५

## महानगरपालिकेची प्रमुख खाती

(फलश्रुतीवर आधारित)

(खाते प्रमुख यांनी सादर केल्याप्रमाणे)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल
## २०२४-२०२५

## महानगरपालिकेची प्रमुख खाती

( फलश्रुतीवर आधारित )

(खातेप्रमुख यांनी सादर केल्याप्रमाणे)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**कार्यानुरुप अहवाल २०२४-२०२५**

# महानगरपालिकेची प्रमुख खाती

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | खात्याचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | पर्जन्य जलवाहिन्या खाते | ०१-०८ |
| २. | रस्ते, वाहतूक आणि पूल खाते | ०९-१५ |
| ३. | आरोग्य व वैद्यकीय सेवा | १७-२८ |
| ४. | शिक्षण खाते | २९-५२ |
| ५. | घन कचरा व्यवस्थापन / परिवहन खाते | ५३-६१ |
| ६. | उद्यान खाते | ६३-६९ |
| ७. | बाजार खाते | ७१-७५ |
| ८. | देवनार पशुवधगृह | ७७-८४ |
| ९. | मुंबई अग्निशमन दल | ८५-८९ |
| १०. | आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी केंद्र | ९१-९४ |
| ११. | माहिती तंत्रज्ञान कक्ष | ९५-९८ |
| १२. | करनिर्धारण व संकलन खाते | ९९-१०२ |
| १३. | विकास नियोजन खाते | १०३-११६ |
| १४. | सुरक्षा खाते | ११७-१२० |
| १५. | सुधार योजना | १२१-१२६ |
| १६. | गलिच्छ वस्ती सुधारणा | १२७-१२९ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# पर्जन्य जलवाहिन्या खाते

**१. प्रस्तावना:-**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ अ अन्वये नाल्यांचे परिरक्षण करणे, सफाई करणे आणि जलनि:सारणाची कामे करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

पावसाळयात मुंबई शहर आणि उपनगरात पाणी साचून नागरिकांना त्यांचा उपद्रव होऊ नये आणि जनजीवन सामान्य रहावे याकरिता पावसाळा सुरू होण्यापूर्वी मुंबईतील नाल्यामधील गाळाचा उपसा करण्यात येतो.

मागील काही वर्षामधील मुसळधार पावसाच्या तीव्रतेचे दिवस लक्षात घेता पूरप्रवण क्षेत्रातील पूरस्थिती टाळण्यासाठीच्या कार्यपध्दतीमध्ये अमूलाग्र बदल करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक पूरप्रवण ठिकाणाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिका, सुधारित ब्रिमस्टोवॅड बृहत आराखड्यातील शिफारशीनुसार उपलब्ध साधनास्त्रोतांचा वापर करुन पर्जन्य जलवाहिन्यांचे जाळे सुधारण्याचे काम करीत आहे. सदर शिफारशीनुसार प्राधान्याने हाती घ्यावयाच्या ५८ कामांपैकी ४५ कामे आजमितीस पूर्ण झाली असून ०९ कामे प्रगतीपथावर आहेत आणि ०४ कामे लवकरच सुरु करण्यात येतील.

**पर्जन्य जल उदंचन केंद्र :**

ब्रिमस्टोवॅड बृहत आराखडा-२ च्या शिफरशीनुसार मुंबई शहर व उपनगरात पूर परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याकरीता ०८ पर्जन्य जल उदंचन केंद्रे प्रस्तावित करण्यात आली असून, त्यापैकी ०६ उदंचन केंद्राची कामे पूर्ण झाली असून ती पूर्णपणे कार्यान्वित झालेली आहेत व त्यांचे प्रचालन व परिरक्षणाचे कामे चालू आहे.

**मोगरा-माहूल येथील उर्वरित ०२ पर्जन्य जल उदंचन केंद्राच्या बांधकामाबाबत :**

विधी खात्याचे अभिप्राय प्राप्त करुन भूसंपादनाकरिता येणारा खर्च वाचविण्याकरीता मोगरा नाल्याच्या पाणलोट क्षेत्रात मोगरा पर्जन्य जल उदंचन केंद्र बांधण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे. तथापि, मोगरा नाला पाणलोट क्षेत्रातील भूसंपादन प्रक्रियेतील काही कायदेशीर बाबींमुळे मोगरा पर्जन्य जल उदंचन केंद्र बांधण्याच्या प्रक्रियेमध्ये विलंब होत आहे. सद्यस्थितीत मोगरा पर्जन्य जल उदंचन केंद्राच्या किरकोळ कामाकरीता कंत्राटदारास कार्यादेश (अंशत:) जारी करण्यात आला आहे.

ब्रिमस्टोवॅड अहवालानुसार, माहूल पर्जन्य जल उदंचन केंद्र हे मिठ आयुक्त, केंद्र सरकार यांच्या मालकीच्या जमिनीवर प्रस्तावित आहेत. तथापि, सदरची जमीन महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी मिठ आयुक्त यांच्याकडे

अनेकवेळा पत्रव्यवहार करुन देखील सदर जमीन मिठ आयुक्त यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली नाही. सबब, सल्लागारांनी सुचविल्यानुसार खाजगी मालकी असलेल्या पर्यायी जागेवर माहूल पर्जन्य जल उदंचन केंद्र प्रस्ताविण्यात आले आहे. सदर जमिनीवर माहुल उदंचन केंद्र बांधण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या आहेत.

**पूरप्रवण क्षेत्र :**

मुंबईमध्ये ४५३ पूरप्रवण क्षेत्रे आढळून आली आहेत. त्यापैकी ३६९ पूरप्रवण क्षेत्रांमधील पूर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे. उर्वरीत ८४ पूरप्रवण क्षेत्रांचे निराकरण करणे आवश्यक असून त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर संस्थांचा समावेश आहे. यापैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेने ६६ पूरप्रवण क्षेत्रे हाताळणे आवश्यक आहे. ज्यामध्ये २०२५ व २०२६ च्या पावसाळ्यापूर्वी टप्प्याटप्प्याने ५५ पूरप्रवण क्षेत्रे हाताळणे अपेक्षित आहे व ११ पूरप्रवण क्षेत्रे हाताळण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे आणि उर्वरीत १८ पूरप्रवण क्षेत्रांचे नियोजन सरकारी प्राधिकरण/खाजगी मालक यांच्या समन्वयाने करण्यात येईल.

**पोर्टेबल उदंचन संच :**

सखल भागातील पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी मुंबई शहर व उपनगरांमध्ये विविध ३९६ ठिकाणी पाण्याचा उपसा करणारे पोर्टेबल उदंचन संच लावण्यात आले आहेत. तसेच रेल्वे कल्व्हर्ट आणि इतर सखल भागातील पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी ११२ अतिरिक्त उदंचन संच वर्ष २०२३ च्या पावसाळ्यात लावण्यात आले.

**पावसाळ्यात पूर प्रतिबंधक उपाययोजना:**

१) ‘जी/उत्तर’ प्रभागातील मुख्याधापक भवन, सायन रेल्वे स्थानक, अध्यापक नाला, धोबीघाट, धारावी टी जंक्शन येथे दरवर्षी पावसाळ्यात साठणा-या पाण्याचा निचरा करण्यासाठी, पातमुखाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची पंपिंगची व्यवस्था करण्यात आली होती.

२) मिलन सबवे येथे पावसाळ्यात पूर प्रतिबंधक उपाय म्हणून ३००० घन मी.प्रतितास क्षमतेचे एकूण ५ पंप बसविण्यात आले आहेत. तसेच मिलन सबवे ते होल्डिंग पॉईंट पर्यंत ९०० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी वाहिनी टाकण्यात आली होती.

३) ‘एफ/उत्तर’ विभागातील विद्यालंकार महाविद्यालय परिसर, भरणी नाका, वडाळा फायर ब्रिगेड जवळच्या परिसरामध्ये पावसाळ्यादरम्यान पाणी साचत असल्यामुळे, सन २०२३ च्या पावसाळ्याकरिता पूर प्रतिबंधक उपाय म्हणून विद्यालंकार महाविद्यालय परिसर या ठिकाणी ३००० घन मी.प्रतितास क्षमतेचे एकूण २ पंप व ५०० घन मी.प्रतितास क्षमतेचा १ पंप बसविण्यात आला होता. तसेच भरणी नाका, वडाळा फायर ब्रिगेड जवळच्या परिसरामध्ये ३००० घन मी. प्रतितास क्षमतेचे एकूण २ पंप व ५०० घन मी. प्रतितास क्षमतेचे २ पंप बसविण्यात आले होते.

**मिठी नदी :**

आजमितीस, मिठी नदीची संरक्षक भिंत बांधण्याचे काम ९० टक्के आणि रुंदीकरण व खोलीकरणाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले आहे. मिठी नदीच्या विकासाचा आणि प्रदुषण नियंत्रणाचा आराखडा तयार करण्यात आलेला असून त्याची अंमलबजावणी चार पॅकेजेस मध्ये प्रस्ताविण्यात आली आहे.

**पॅकेज-१**: अंतर्गत मिठी नदीच्या पवई येथील फिल्टरपाडा ते डब्लू.एस.पी. कंपाऊंड पर्यंत 'इंटरसेप्टर' चे बांधकाम करणे, मलनि:सारण वाहिनी टाकणे, सर्व्हिस रोडचे बांधकाम करणे व १५ वर्षे प्रचालन व परीरक्षण करणे इत्यादी कामे अंतर्भूत असून सदर काम प्रगतीपथावर आहेत. सध्यस्थितीत ८ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण झाले आहे.

**पॅकेज-२**: अंतर्गत मिठी नदीच्या पवई येथील फिल्टरपाडा ते डब्लू.एस.पी. कंपाऊंड पर्यंत नदीचे उर्वरित रुंदीकरण व खोलीकरण करणे, 'इंटरसेप्टर' सह नदीची उर्वरित संरक्षक भिंत व सेवा रस्त्याचे बांधकाम करणे, मलनि:सारण वाहिनी टाकणे इत्यादी कामे अंतर्भूत असून त्यापैकी ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.

**पॅकेज-३**: अंतर्गत मिठी नदीच्या भरतीप्रवण क्षेत्रात (सी.एस.टी. रोड पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यान) 'इंटरसेप्टर' सह नदीची उर्वरित संरक्षक भिंत व सेवा रस्त्याचे बांधकाम करणे, 'फ्लड गेटस' पंपिंग यंत्रणेसह बांधणे व १० वर्षाचे प्रचालन व परीरक्षण करणे इत्यादी कामे अंतर्भूत असून सदर कामांची मसुदा निविदा तयार करण्यात आलेली आहे व प्रशासकीय मंजूरी प्राप्त करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**पॅकेज-४**: मध्ये बापट नाला ते सफेद पूल नाला येथील बिन पावसाळी प्रवाह 'धारावी मलजल प्रक्रिया केंद्र' येथे बोगद्याद्वारे वळविण्याचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे.

**नद्यांचे पुनरुज्जीवन :**

दहिसर, पोयसर आणि ओशिवरा व वालभट या नद्यांचे पुनरुज्जीवीकरण करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले आहे. नद्यांच्या पुनरुज्जीवन करण्याच्या कामामध्ये नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातून नदीत होणारे प्रदुषण रोखणे, मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे टाकणे, गाळ काढण्यासाठी लागणारा पोहोच रस्ता बांधणे, नदीकाठचे सौंदर्यीकरण करणे आणि मलजल प्रक्रिया केंद्र उभारणे इत्यादी कामे अंतर्भूत असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

२.    **खात्याची ठळक उद्दिष्टये व ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू. कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **प्रतिताशी ५० मि.मी. पाऊस पडला तरी पाण्याचा योग्य प्रकारे निचरा व्हावा याकरिता विद्यमान पर्जन्य जलवाहिन्या प्रणालींची दर्जोन्नती करणे.** | **'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्प कामांव्यतिरिक्तची कामे**<br>पर्जन्य जलवाहिन्यांचे बांधकाम / पुनर्बांधकाम/सुधारणा/पुनर्रचना /ट्रेनिंग रुंदीकरण करणे. | २२७६.४३ | १३२४.२१ |
| २. | **अतिरिक्त पर्जन्य जलसाठ्याचा उपसा करण्यासाठी उदंचन क्षमता निर्माण करणे.** | **'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्पांतर्गत कामे**<br>पर्जन्य जल उदंचन केंद्रे उभारणीची खालील कामे पूर्ण करण्यात आली.<br>१) हाजी अली<br>२) इर्ला<br>३) लव्हग्रोव्ह<br>४) क्लिव्हलँड बंदर<br>५) ब्रिटानिया<br>६) गझदरबंद | २९४.२२ | ५८.९४ |

(रू. कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| ३. | **लहान/ मोठे, नाले /गटारे यांचे रुंदीकरण करणे/ गाळ काढणे व त्यामधील अडथळे दूर करणे.** | (एक) सर्वसाधारण स्थापत्य दुरुस्त्या. पर्जन्य जलवाहिन्या. | १२.०० | ११.११ |
| | | (दोन) मुंबई शहर व उपनगरात कमानीखालून जाणारी गटारे, बंद गटारे, ढापा गटारे, नाले गाळविरहीत करणे. रेल्वे व अशासकीय संस्था यांना अधिदानासह | ११.०० | ६.८० |
| | | (तीन) गणपती विसर्जनाकरिता तलावातील गाळ काढणे | १.२० | ०.७९ |
| | | (चार) कमानीखालून जाणारी गटारे, बंद (बॉक्स) गटारे, ढापा गटारे इ.गाळ विरहीत करण्याचा खर्च - मिठी नदी | २२६.०० | २१९.६६ |

## ३. सन २०२३-२०२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | सीटी-५८:-‘जी/दक्षिण’ विभागातील महालक्ष्मी रेल्वे स्थानक परिसर ते डॉ.ई.मोझेस मार्ग येथील भूमिगत पर्जन्य जलवाहिनीपर्यंत उदंचन व्यवस्थेसहित १२०० मिमी व्यासाच्या दोन रायझिंग मेन (Rising Main) वाहिन्या टाकणे. | महालक्ष्मी रेल्वे स्थानक परिसर ते डॉ.ई.मोझेस मार्ग येथील भूमिगत पर्जन्य जलवाहिनीपर्यंत उदंचन व्यवस्थेसहित १२०० मिमी व्यासाच्या दोन रायझिंग मेन (Rising Main) वाहिन्या टाकण्यात आल्या. त्यामुळे नायर हॉस्पिटल, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मोरलॅन्ड मार्ग, एम.ए.रोड, मराठा मंदिर जंक्शन येथे पावसाळ्यात उद्भवणारी पूर परिस्थिती ब-याच प्रमाणात आटोक्यात येवून त्यावर नियंत्रण मिळविण्यास मदत झाली. |
| २. | सीटी-५०: ‘एफ/दक्षिण’ विभागातील हिंदमाता सिनेमा परिसरात होणारी पूर परिस्थिती कमी करण्यासाठी प्रमोद महाजन उद्यान मधील साठवण टाकीचा विस्तार करणे व साठवण टाकीवर स्लॅब बांधून आच्छादन करणे. | ‘एफ/दक्षिण’ विभागातील हिंदमाता सिनेमा परिसरात होणारी पूर परिस्थिती कमी करण्यासाठी प्रमोद महाजन उद्यान मध्ये साठवण टाकी बांधण्यात आली. हिंदमाता परिसरात साचणारे पावसाचे पाणी वाहून नेऊन सदर साठवण टाकीत साठविल्यामुळे हिंदमाता सिनेमा परिसरात होणारी पूर परिस्थिती कमी करण्यास मदत झाली. |
| ३. | सीटी-६०: ‘जी/उत्तर’ विभागातील सायन-माहिम जोडरस्ता येथील पिवळा बंगला ते टी-जंक्शन पर्यंत लोहयुक्त सिमेंट कॉंक्रीट पेटीका पध्दतीच्या पर्जन्य जलवाहिनीचे बांधकाम करणे. | ‘जी/उत्तर’ विभागातील सायन-माहिम जोडरस्ता येथील पिवळा बंगला ते टी-जंक्शन पर्यंत लोहयुक्त सिमेंट कॉंक्रीट पेटीका पध्दतीच्या पर्जन्य जलवाहिनीचे बांधकाम केल्यामुळे सायन परिसर येथे पावसाळ्यात उद्भवणारी पूर परिस्थिती ब-याच प्रमाणात आटोक्यात येवून त्यावर नियंत्रण मिळविण्यास मदत झाली. |
| ४. | प.उ.-६९१: ‘के/पश्चिम’ विभागातील मिलन सब-वे येथे उद्भवणा-या पूरस्थिती नियंत्रणाकरीता साठवण टाकीचे शिल्लक बांधकाम करणे. | ‘के/पश्चिम’ विभागातील मिलन सब-वे येथे उद्भवणारी पूर परिस्थिती काही प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले. |
| ५ | प.उ.-६९३–‘पी/उत्तर’ विभागातील मालाड (प) येथील वळणई नाला व पोयसर नाल्याचे मार्वे ब्रीज पर्यंत रूंदीकरण व बांधकाम करणे. | ‘पी/उत्तर’ विभागातील मालाड (प) येथील वळणई नाला व पोयसर नाला येथील पावसाच्या पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यास मदत झाली. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ६ | प.उ.-६३०–'एच/पश्चिम' विभागातील वांद्रे (प) येथील आर.के.पाटकर मार्ग, वेरोनिका मार्ग, नॅशनल लायब्रेरी मार्ग (नुतन नगर) व लगतच्या परिसरामध्ये पूर नियंत्रणाकरिता पर्जन्य जलवाहिन्यांचे बांधकाम/आवर्धन करणे. | 'एच/पश्चिम' विभागातील वांद्रे (प) येथील आर.के.पाटकर मार्ग, वेरोनिका मार्ग, नॅशनल लायब्रेरी मार्ग (नुतन नगर) परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यास मदत झाली. |
| ७ | प.उ.-५३६-संकल्पचित्रे आखणे, बांधणे व चालविणे (डि.बी.ओ.) या तत्वावर पोयसर नदीवर पूर्णत: स्वंयचलित पॅकेज/मॉडयुलर व अत्याधुनिक मलनि:सारण प्रक्रिया केंद्रासाठी संकल्पचित्रे आखणे, बांधकाम करणे व प्रचालन करणे यासह १५ वर्षासाठी प्रचालन व परिरक्षण करणे आणि मलनि:सारण वाहिन्या टाकणे, पावसाळ्या व्यतिरिक्त (शुष्क काळातील) प्रवाहाच्या मार्ग परिवर्तनाकरिता इंटरसेप्टर्सची तरतूद करणे. तसेच पोयसर नदीच्या दोन्ही काठांवर सेवा रस्ता आणि रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या बांधून नदीचे पुनरूज्जीवीकरण करणे. | पोयसर नदीच्या दोन्ही काठांवर सेवा रस्ता आणि रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या बांधून नदीची पूर परिस्थिती काही प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले. |
| ८. | पू.उ-१६७-'एम/पूर्व' विभागातील चिता कॅम्प मानखूर्द एन.ए.डी. नाला वळविणे/रूंदीकरण/ खोलीकरण व पुनर्बांधकाम करणे. | 'एम/पूर्व' विभागातील चिता कॅम्प मानखूर्द परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यास मदत झाली. |
| ९. | पू.उ.-२२४-'टी' विभागातील पाणलोट क्षेत्र क्र.३०१ मधील लोक एव्हरेस्ट जवळ बांऊडरी नाल्याची पुनर्बांधणी व पाणलोट क्षेत्र क्र.३०३ मधील सनराईज जवळ नानेपाडा नाल्याची पुनर्बांधणी करणे. | 'टी' विभागातील पाणलोट क्षेत्र क्र.३०१ मधील लोक एव्हरेस्ट जवळ बांऊडरी नाल्याची पूर परिस्थिती काही प्रमाणात कमी झाल्याचे आढळून आले. |
| १०. | पू.उ.-२२९-'एन' विभागातील तानसा मेन ते सेंट्रल रेल्वे घाटकोपर (प) येथील सोमय्या नाला वळविणे. | 'एन' विभागातील तानसा मेन ते सेंट्रल रेल्वे घाटकोपर (प) येथील सोमय्या नाला येथील पावसाच्या पाण्याचा निचरा जलद गतीने होण्यास मदत झाली. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | २५७०.६५ | १११५.६८ | १९३०.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ६९५.५० | ९८८.२० | ७४४.०० |
| एकूण | ३२६६.१५ | २१०३.८८ | २६७४.०० |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**कार्यानुरुप अहवाल २०२४-२५**

# रस्ते, वाहतूक व पूल खाते

१. **प्रस्तावना :-**

**रस्ते :**

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ अन्वये महानगरपालिकेच्या हद्दीत सार्वजनिक वापरासाठी रस्ते बांधणे व ते सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार व सुधारणा करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत साधारण २०५० कि.मी.लांबीच्या रस्त्यांची देखभाल व परिरक्षण केले जाते. त्यामध्ये शहर विभागातील ५४०.५८ कि.मी., पश्चिम उपनगरातील ९९९.४७ कि.मी. व पूर्व उपनगरात ५०९.९५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचा समावेश आहे. प्रवासासाठी उत्तम असलेल्या व बदलत्या हवामानाचा कोणताही परिणाम न होणारे रस्ते तयार करण्याच्या उद्देशाने सन १९८९ मध्ये रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आला आणि आतापर्यंत टप्प्याटप्प्याने एकूण १२६६.०१ कि.मी लांबीचे रस्ते सिमेंट काँक्रिटचे करण्यात आले आहेत. शहराचे संख्यात्मक, राजकीय व आर्थिक महत्व लक्षात घेता रस्ते विषयक पायाभूत सुविधा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाश्वत, टिकाऊ व पर्यावरण अनुकूल करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने खालील बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

मुंबई शहरांची भौगोलिक परिस्थिती, पडणारा तीव्र पाऊस तसेच सतत वाढणारी वाहतुकीची वर्दळ याने रस्त्यांची बिकट अवस्था होते. त्यामुळे आय.आय.टी. ने सुचविल्यानुसार जास्तीत जास्त रस्ते डांबरी रस्त्यांऐवजी सिमेंट काँक्रिट रोड मध्ये करण्याचे धोरण अवलंबिले आहे

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्ग देखभाल व परिरक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. सदर महामार्गाच्या पृष्ठभागांची दुरुस्ती करण्याचे तसेच महामार्गाचे सुशोभिकरण करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

शहर विभागामध्ये सन २०२३-२४ या कालावधीत सुमारे १७ कि.मी. रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले. शहर विभागाच्या 'ए' विभागातील नानाभाई मुस मार्ग आणि 'जी/दक्षिण' विभागातील सर पोचखानवाला मार्ग तसेच शहर विभागातील इतर महत्त्वाच्या रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे.

पश्चिम उपनगरामध्ये सन २०२३-२४ या कालावधीत सुमारे ७७ कि.मी. रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले. 'के/पूर्व' येथील जे.व्ही.एल.आर. व इतर महत्वाच्या रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले. तसेच आरे वसाहत गोरेगांव (पूर्व) येथील रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरणाचे कार्य प्रगतीपथावर आहे.

पूर्व उपनगरामध्ये सन २०२३-२४ या कालावधीत सुमारे २८ कि.मी. रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले. 'एल' विभागात (१) हॉल रोड पासून ए.एच.वाडिया मार्ग ते सहारा मेडिकल पर्यंत ५९० मी. (२) नारी सेवा सदन रोड ७४० मी.रस्ता व इतर रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच पी.सोमण मार्ग, विक्रोळी पश्चिम आणि विक्रोळी स्टेशन पूर्व येथील ५०० मी.लांबीचा रस्ता व इतर रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. विक्रोळी स्टेशन पूर्व येथील स्लीप रस्ता व इतर रस्त्यांची कामे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पूर्ण होतील.

**पूल :**

महानगरपालिकेच्या अखत्यारितील १६ पूलांचे निष्कासन करून पुनर्बांधणी करण्याचे काम, १५ पूलांच्या मोठया संरचनात्मक दुरुस्त्या आणि १८ पूलांच्या किरकोळ दुरुस्त्या करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**पूल विभागामध्ये खालील प्रमुख पूलांची कामे सुरु आहेत.**

१. 'जी/दक्षिण' विभागातील डॉ.ई.मोझेस रोडपासून डॉ.ऍनी बेझंट रोडपर्यंतच्या नेहरु विज्ञान केंद्राला लागून असलेल्या नाल्यावर पूलाचे आणि नेहरु तारांगण आणि नेहरु सेंटरला जोडणाऱ्या पेडेस्ट्रीयन अंडर पास (पीयूपी) चे बांधकाम

२. 'जी/दक्षिण' विभागातील केशवराव खाड्ये मार्ग येथील महालक्ष्मी स्थानकाजवळीक बांधकाम सुरु असलेल्या पूर्वेकडील केबल स्टेड रेल्वेवरील पूलाचा विस्तार हा एन.एम.जोशी मार्ग जंक्शन ते एस ब्रीज जंक्शन पर्यंत करणे तसेच पश्चिमेकडील बाजूस हाजीअली जंक्शन जवळील महालक्ष्मी रेसकोर्स वाहनतळामधुन एक मार्गिका (आर्म) बांधकाम सुरु असलेल्या केबल स्टेड पूलाला जोडणे संबंधीचे काम

३. गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्प अंतर्गत. १) रत्नागिरी हॉटेल चौक, गोरेगाव येथे प्रस्तावित सहा पदरी उड्डाणपूल २) मुलुंड खिंडीपाडा येथे प्रस्तावित उच्चस्तरीय चक्रीय उन्नत मार्ग ३) डॉ.हेगडेवार चौक, मुलुंड येथे सहा पदरी उड्डाणपूल याकरिता संरचनात्मक आराखड्यासह बांधकाम

४. महालक्ष्मी रेल्वे स्थानकातील केशवराव खाड्ये मार्ग ते सातरस्ता जंक्शन यांना जोडणाऱ्या रेल्वे पूलाचे बांधकाम

५. गोखले पूलावर अस्तित्वात असलेल्या पोहोच मार्गाची पुनर्बांधणी (रेल्वे विभाग)

६. गोखले पूलावर अस्तित्वात असलेल्या पोहोच मार्गाची पुनर्बांधणी (महानगरपालिका विभाग)

७. माहिम कॉजवे येथील मिठी नदीवरील पूलाचे रुंदीकरण व पुनर्बांधणी करण्याचे काम

८. विद्याविहार रेल्वेस्थानक रेल्वे रुळावरील उड्डाणपूलाचे बांधकाम

९. विक्रोळी रेल्वेस्थानक रेल्वे रुळावरील उड्डाणपूलाचे बांधकाम

१०. 'पी/उत्तर' विभागातील मालाड येथील लिंक रोडवरील मीठ चौकी जंक्शनवर उड्डाणपूल बांधणे

११. 'के/पश्चिम' विभागातील अंधेरी (पश्चिम) येथील जेव्हीपीडी जंक्शनवर जुहू – वर्सोवा रोडपासून सी.डी.बर्फीवाला रस्त्यापर्यंत उड्डाणपूलाचे बांधकाम करणेबाबत

१२. 'के/पश्चिम' आणि 'पी/दक्षिण' विभागाच्या हद्दीतील ३६.६ मी. रुंदीच्या डी.पी.रस्त्यावर गोरेगाव खाडी ओलांडून भगतसिंग नगर येथे वाहतुकीसाठी पूल बांधणेबाबत

१३. दहिसर (पश्चिम), लिंक रोड, बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीपासून भाईंदर (पश्चिम), (मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये) ४५ मीटर रुंद उन्नत मार्ग बांधणे (किनारी मार्ग शेवटचा टप्पा) कामाकरिता

१४. मुंबई सागरी किनारी रस्ते सहा पाकिटे (ए,बी,सी,डी,ई,एफ)

**<u>प्रगतीपथावर असणाऱ्या पूलांची कामे</u>**

१. मच्छीमार कॉलनी (सेनापती बापट मार्ग) ते पश्चिम द्रुतगती मार्गापर्यंत पूल बांधण्यासाठी EPC निविदा

२. गोरेगाव मुलुंड लिंक रोडला जोडणारा मुंबई किनारी प्रकल्प (वर्सोवा आंतरबदल ते दहिसर आंतरबदल) (पॅकेज ए, बी, सी, डी, ई आणि एफ)

३. पूर्व पश्चिम दळणवळण वाढविणाऱ्या खार भुयारी मार्ग व वांद्रे टर्मिनस जोडणाऱ्या उन्नत मार्गाचे बांधकाम

४. 'के/पश्चिम' आणि 'पी/उत्तर' विभागातील मढ-वर्सोवा खाडी पूल

५. 'पी/उत्तर' विभागात लगून रोड ते इन्फिनिटी मॉल जोडणारा पूल

२.     **खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **सुयोग्य आखणी करुन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन वाहतुकीचा दर्जा सुधारण्याकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाचे रस्ते तयार करणे.** | (एक) सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे. | ७२७.५८ | ⅄ ८७३.६४ |
| | | (दोन) स्टॅण्डींग टेक्निकल ॲडव्हायझरी कमिटीच्या अहवालानुसार उच्च दर्जाचे नवीन डांबरी रस्ते बांधणे, विद्यमान रस्त्यांच्या दुरुस्त्या करणे, रस्त्यांचे रूंदीकरण व सुधारणा करणे व रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे. | ५९७.४४ | ✦६६३.१५ |
| | | (तीन) शहरातील रस्त्यांमध्ये सेटबॅक लॅण्ड समाविष्ट करुन रस्त्यांचे रुंदीकरण करणे. | ५.०० | ०.०७ |
| २. | **वाहतूक व्यवस्थेची दर्जोन्नती आणि वाहतूक बेटांचा विकास करणे.** | (एक) स्ट्रीट फर्निचर पुरविणे. | ४९.८० | ♦१२०.२२ |
| | | (दोन) ५० संगमस्थानावर कन्व्हेशनल आर टी एस.एस.चा पुरवठा, उभारणी व कार्यान्वित करणे. | ५.०० | २.०६ |
| ३. | **मुंबईतील सर्व रस्त्यांवरील विद्यमान दिव्यांचे एलईडीमध्ये रुपांतर** | रस्त्यावरील परंपरागत दिव्यांचे एल.ई.डी.दिव्यांमध्ये रुपांतर करणे. | ७.०० | --- |
| ४. | **पूलांचे संरचनात्मक परिक्षण आणि उपाययोजना** | शहर विभाग, पश्चिम उपनगरीय विभाग, पूर्व उपनगरीय विभागातील नदी आणि नाल्यांवरील पूल, रेल्वेवरील पूल, फ्लायओव्हर, पादचारी पूल, रेल्वेवरील पादचारी पूल, वाहनांचे पूल आणि वाहनांकरिता भुयारी मार्ग, पादचारी भूयारी मार्ग सरकते जिने यांचे नवीन बांधकाम/पाडणे आणि पुर्नबांधणी करणे/दुरुस्त्या/ परिरक्षण | ३१५९.०० | २१२९.३९ |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.८९५.०० कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.७३५.८४ कोटी

♦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१२६.०० कोटी

## ३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | सुधारित संकल्पचित्रावर आधारित बांधण्यात आलेले दिर्घकाळ टिकतील असे डांबरी रस्ते बांधण्याचे काम हाती घेतले आहे. परिणामी भविष्यात रस्त्यांच्या देखभाल खर्चामध्ये लक्षणीय बचत होईल. | सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २५ कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. |
| २. | बृहन्मुंबईची भौगोलिक परिस्थिती तसेच, दिर्घकाळ टिकणारे सिमेंट काँक्रिटचे रस्ते बांधण्याचे काम हाती घेतले आहे. | सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात १२२ कि.मी.लांबीचे सिमेंट काँक्रिट रस्ते पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे. |
| ३. | अ) मुंबई क्षेत्र वाहतूक नियंत्रण (ए.टी.सी.) या आधुनिक वाहतूक सिग्नल पध्दतीच्या वापरामुळे वाहतूक नियंत्रित तसेच सुरळीत होण्यास मदत होईल. | मुंबई क्षेत्र वाहतूक नियंत्रण (ए.टी.सी.) या अत्याधुनिक यंत्रणेअंतर्गत बसविण्यात आलेल्या २५८ वाहतूक नियंत्रकांचे परिरक्षण तसेच ही वाहतूक यंत्रणा ज्या नियंत्रण कक्षांशी जोडली आहे त्या वाहतूक पोलीस मुख्यालय व इंजिनिअरींग हब नियंत्रण कक्षाचे परिरक्षण व्यवस्थितरित्या चालू आहे. त्यामुळे वाहतुकीचे व्यवस्थापन योग्यरित्या होण्यास मदत झाली. |
| | ब) वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी वाहतूक नियंत्रकांची उभारणी करणे. | नवीन वाहतूक नियंत्रकांची उभारणी केल्यामुळे वाहतुकीचे व्यवस्थापन सुरळीत होण्यास मदत झाली. |
| ४. | संपूर्ण मुंबई शहरामध्ये एकूण ९१ सशुल्क वाहनतळे असून ती प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) या कार्यालयाच्या उप प्रमुख अभियंता (वाहतूक) व विभागीय कार्यालय यांच्यामार्फत कंत्राटदारांद्वारे चालविण्यात येतात त्या व्यतिरिक्त सार्वजनिक वाहनतळे, सुविधा वाहनतळे (Amenity Parking) व आरक्षित भूखंडांवरील वाहनतळे देण्याचे धोरण असून उपलब्धतेनुसार त्या त्या जागा वाहनतळांसाठी वापरण्यात येतील. | रस्त्यावरील एकूण ९१ सशुल्क वाहनतळांपैकी उप प्रमुख अभियंता (वाहतूक) खात्यातर्फे सध्या ६३ ठिकाणी सशुल्क वाहनतळांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कंत्राटदार नियुक्त करुन संबंधित विभाग कार्यालयाच्या देखरेखी अंतर्गत सदर सशुल्क वाहनतळ चालविण्यात येत आहेत. मुंबईतील पार्किंग समस्येच्या अनुषंगाने वाहनतळ उभारण्यास शासनाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल करून दिनांक २०.१०.२००८ रोजीच्या अधिसुचने अन्वये नवीन |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | कलम ३३ (२४) अंतर्भूत केले आहे. सदर नवीन कलम ३३ (२४) नुसार खाजगी विकासकांनी त्यांच्या भूभागावर सार्वजनिक वाहनतळ विकसित करून दिल्यास अतिरिक्त चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे. तसेच सार्वजनिक वाहनतळासाठी भूभागाची योग्यता ठरविण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली असून सदर समितीच्या शिफारशीनंतर सार्वजनिक वाहनतळ विकासास परवानगी देण्यात येते. |
| ५. | रस्त्यांवरील दिशा व मार्गदर्शक फलक, रस्त्यांचे नामफलक बसविणे इत्यादी कामे पूर्ण करणे. सदर कामाच्या पूर्णत्वामुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. | रस्त्यांवरील रस्ते नामफलक, चौक नामफलक, अनिवार्य फलक, सूचना फलक इत्यादी तसेच मोठ्या रस्त्यांवरील दिशादर्शक आणि मार्गदर्शक फलक लावणे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुबंईतील शहर (परिमंडळ-१ वगळून), पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरांमध्ये वाहतूक फलक व अनुषंगिक कामांकरीता प्रत्येकी जवळपास ६० कोटी इतक्या रकमेचे दोन वर्षाकरीता कंत्राटदाराची नियुक्ती केली असून आधुनिक चिन्हांसह दर्जोन्नत वाहतूक फलक बसविण्यात आले. यामुळे वाहतूक पोलिसांच्या समन्वयाने वाहतूक सुरळीत होण्यास मदत केली जाते. |
| ६. | अंधेरी येथील सी.डी.बर्फीवाला रोडला जोडणा-या (रेल्वे भागासाठी) गोपाळ कृष्ण गोखले पूलावरील रेल्वे उड्डाणपूलाची पुर्नबांधणी | गोपाळ कृष्ण गोखले रोड व सी.डी.बर्फीवाला तथा गोपाळ कृष्ण गोखले रोड मधील पोहोच रस्ता यामध्ये रेल्वेच्या धोरणामुळे आंतर निर्माण झाले होते. परंतु, विशिष्ट अभियांत्रिकी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व जॅकच्या सहाय्याने सी.डी.बर्फीवाला आकाशमार्गिका उत्तरेकडे उंचावण्यात आली व गोपाळ कृष्ण गोखले रोडला समांतर जोडली गेली. अशा प्रकारे विशेष स्वरूपाची तांत्रिक उपाययोजना करण्यात येऊन सदर प्रकल्प जनतेच्या वापरास खुला करण्यात आला आहे. |

## ४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | | | |
| १) रस्ते व वाहतूक प्रचालन | ३१७६.२१ | २६९४.७२ | ३४००.०० |
| २) पूल | ३१७९.७१ | २१२७.९९ | ५२३०.०० |
| एकूण (अ) | ६३५५.९२ | ४८२२.७१ | ८६३०.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | | | |
| १) रस्ते व वाहतूक प्रचालन | ८०५.६५ | १९०२.६७ | ११५०.९६ |
| २) पूल | १९.८१ | ४५.७२ | २२.०३ |
| एकूण (ब) | ८२५.४६ | १९४८.३९ | ११७२.९९ |
| एकूण अर्थसंकल्पीय तरतूद (अ + ब) | ७१८१.३८ | ६७७१.१० | ९८०२.९९ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# आरोग्य व वैद्यकीय सेवा

**प्रस्तावना** :

बृहन्मुंबई महानगरपालिका ही देशातील एकमेव महानगरपालिका आहे जी नागरीकांना त्रिस्तरीय आरोग्य सेवा पुरविते. यामध्ये, २३३ आरोग्य केंद्रे, १९० दवाखाने, ३० प्रसुतीगृहे व ५ विशेष रूग्णालयांमार्फत प्राथमिक आरोग्य सुविधा., १६ उपनगरीय रूग्णालयांमार्फत द्वितीय स्तरावरील आरोग्य सेवा व ४ वैद्यकीय महाविद्यालये, प्रमुख रूग्णालये आणि १ दंत महाविद्यालयामार्फत तृतीय स्तरावरील आरोग्य सेवा यासारख्या सर्वसमावेशक सेवा पुरविल्या जातात.

**उपनगरीय रुग्णालये**

मुंबईतील बहुसंख्य लोकसंख्या शहराच्या उपनगरीय भागात राहते. उपनगरातील वाढती लोकसंख्या आणि प्रमुख रूग्णालयांवर येणारा ताण विचारात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रूग्णालयांमध्ये प्रशिक्षित व कुशल कर्मचारी वर्गाच्या सहाय्याने सर्व प्रकारच्या विशेष व अतिविशेष सेवा उपलब्ध करून देण्याकरीता विविध महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविले जात आहेत. तसेच १६ उपनगरीय रूग्णालयांपैकी ६ रूग्णालयांमध्ये DNB अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली असून एकूण १७२ तज्ञ शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे व १० विषयांत प्रतिवर्षी ७९ जागा उपलब्ध झाल्या आहेत. सदर उपक्रमामुळे, जटील व अतिविशेष शस्त्रक्रिया उपनगरीय रुग्णालयात पार पडत असून नागरीकांना उच्च दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत. यासोबतच, २०० पेक्षा कमी रूग्णशय्या असलेल्या रुग्णालयांकरीता DNB अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून याद्वारे अधिकाधिक विध्यार्थांना प्रवेश देऊन सर्वंकष क्षमता वाढविण्याचा उद्देश आहे. त्यामुळे कुशल आरोग्यसेवा व्यावसायिक व विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. आरोग्य सेवांच्या सक्षमीकरणासाठी ऑन्कोलॉजी (Oncology), कार्डिओलॉजी (Cardiology), गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी (Gastroentrology) इत्यादी अतिविशिष्ट सेवांसह विविध आरोग्य पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

**क्षयरोग**

भारतातून क्षयरोगाचे निर्मूलन करण्याच्या उद्दिष्टानुसार, क्षयरोग रूग्णांचे त्वरित निदान करणे आवश्यक आहे. म्हणूनच, AI द्वारे रुग्णांचे तात्काळ निदान करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक विभागात एक याप्रमाणे २४ विभागात २४ Truenat मशिन्स आणि २४ Hand Held एक्सरे मशिन्स उपलब्ध करण्याचे प्रस्ताविले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने , SMILE संशोधन संस्थेच्या सहयोगाने, Whole Genome Sequencing (WGS) या आधुनिक चाचणीद्वारे क्षयरोगाचे निदान करण्यास सुरुवात केली आहे. भविष्यात, औषध प्रतिरोधक क्षयरोगाच्या उपचारामध्ये सदर चाचणी सहाय्यक ठरणार आहे. सद्यस्थितीत, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे औषध संवेदनशील क्षयरोग रुग्णांना प्रतिबंधात्मक

उपचार पुरविण्यात येतात. औषध प्रतिरोधी रूग्णांसोबत राहणा-यांकरीता सुध्दा क्षयरोग प्रतिबंध उपचार पध्दती सुरू करण्यात येणार आहे. क्षयरोग रूग्णालय समूह, शिवडी येथे १० रूग्णशय्या असलेले Negative Intensive Respiratory Care Unit सुरू करण्यात येणार आहे.

**असंसर्गजन्य रोग कक्ष**

''**आरोग्यम् कुटुंबम्**'' हा कार्यक्रम अधिक सक्षम करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने ''**मुख्यमंत्री आरोग्य आपल्या दारी**'' अंतर्गत सर्वसमावेशक कार्यक्रम नियोजित केला आहे. या योजनेअंतर्गत, मधुमेह, उच्च रक्तदाब, मानसिक आरोग्य आणि मोठ्या प्रमाणात आढळणारे कर्करोग (oral, breast and cervix) या आजारांची तपासणी करून संशयित रूग्णांना पुढील निदान करण्याकरीता संदर्भ सेवा देणे, वयोवृध्द तसेच संवेदनशील नागरिकांची घरी जाऊन रक्त तपासणी करणे व त्यांच्या रोगाच्या पुढील उपचारांचे व्यवस्थापन करणे यांचा समावेश आहे. तसेच ''**कर्करोग नियंत्रण मॉडेल**'' (Cancer Prevention Model) स्थापन करण्यात येणार आहे. ज्यामध्ये oral, breast and cervical कर्करोग नियंत्रणाकरीता विभाग पातळीवर निदान व संदर्भ सेवा देण्यात येणार असून त्यामध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांचा समावेश असेल. त्याचप्रमाणे, प्रायोगिक तत्त्वावर ''**हृदय संजीवनी**'' (Heart Rejuvention) ''Spoke & Hub Model'' प्रस्ताविण्यात येईल आणि हृदयविकारामुळे होणारे मृत्यू टाळण्यासाठी, केंद्र शासनाच्या NCD-STEMI प्रकल्पांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार निदान व उपचार सेवा देण्यात येईल.

**हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – आपला दवाखाना**

प्राथमिक आरोग्य सेवांच्या बळकटीकरणाच्या दिशेने एक पाऊल म्हणून २०२ " हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना" सुरू करण्यात आले. पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टीक सेंटरमध्ये नागरिकांना दंतचिकित्सक, स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, फिजिशियन, त्वचारोगतज्ञ आणि नेत्रतज्ञ, इ. तज्ञांच्या सेवा पुरविण्यात येत आहेत. तसेच ६ अतिरिक्त पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टीक सेंटर्स आणि ५४ " हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे – आपला दवाखाना " सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, फिजिओथेरपिस्ट आणि कान, नाक, घसा तज्ञांच्या सुविधा लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पॅनलवरील खाजगी डायग्नोस्टीक सेंटरमार्फत एक्स-रे, मॅमोग्राफी, ई.सी.जी.,सी.टी.स्कॅन आणि एम.आर.आय. इत्यादी सेवा Voucher पध्दतीने अनुदानित दरात प्रदान करण्यात येणार आहेत.

**विशेष रूग्णालये**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सन २०२७ पर्यंत मुंबईत कुष्ठरोग प्रसाराची साखळी खंडीत करण्यासाठी दिशादर्शक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार, मुंबईतील सर्व आरोग्य केंद्रांच्या विभागात कुष्ठरोगाच्या शुन्य प्रसाराचे उद्दिष्ट गाठण्याकरिता विविध उपाययोजना अवलंबिण्यात येणार आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), नाशिक यांच्या सहयोगाने कस्तुरबा रूग्णालय, मुंबई येथे संसर्गजन्य रोग प्रशिक्षण आणि

संशोधनाकरीता MUHS प्रादेशिक केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे. साथरोगांच्या परिणामकारक संशोधन व अचूक निदानाकरिता, चालू वित्तिय वर्षात, भारत सरकारच्या सहयोगाने नवीन अद्ययावत BSL-3 प्रयोगशाळा प्रस्तावित आहे. तसेच, PCR प्रयोगशाळा डेंगी आजारासाठी Whole Genome Sequencing (WGS) तपासणी Anti-Microbial Resistance बाबत संशोधन करण्याचे देखील योजिले आहे. कस्तुरबा रूग्णालयात TBC DST प्रयोगशाळा नजीकच्या काळात कार्यान्वित होणार आहेत. मुरली देवरा म्युनिसिपल नेत्र रूग्णालयाच्या सध्याच्या इमारतीमागील भूखंडावर १६ मजली मल्टिस्पेशालिटी रूग्णालयाचे बांधकाम सुरू असून पुढील २ वर्षात सदर बांधकाम पूर्ण होईल. या रूग्णालयातील तिसरा व चौथा मजला नेत्र रूग्णालयासाठी राखीव असून उर्वरीत मजल्यांवर विविध स्पेशालिटी, बाह्यरूग्ण विभाग, आरोग्य केंद्रे, दवाखाने व डायलेसिस सेंटर प्रस्ताविण्यात आले आहेत.

**स्मशानभूमी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ७ स्मशानभूमींचे पी.एन.जी. स्मशानभूमीत रूपांतर करण्याचे काम पूर्ण करण्यात येईल. वायू प्रदूषण कमी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ स्मशानभूमींमध्ये (३ शहर, ३ पूर्व उपनगरे, ३ पश्चिम उपनगरे) पारंपारिक चितेऐवजी पर्यावरणपूरक दहनाकरीता लाकूड/ब्रिकेट्स् ऐवजी पॅलेट्सचा वापर करून नवीन चिता तयार करण्यात येणार आहे.

२. **खात्याची ठळक उद्दिष्टये व ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **महानगरपालिकेच्या आरोग्यविषयक पायाभूत सुविधांचे बळकटीकरण** | | | |
| | **(अ) <u>प्राथमिक आरोग्य सेवा</u>** | (एक) सार्वजनिक आरोग्य संस्था, दवाखाने यांची दर्जोन्नती आणि प्रादेशिक आरोग्य केंद्रांचे बांधकाम | १७.०० | १३.३३ |
| | | (दोन) महानगरपालिका प्रसुतिगृहांची दर्जोन्नती | १७.०० | १४.२२ |
| | | (तीन ) विविध उपनगरीय रुग्णालये/विशेष रुग्णालये/ मोठी रुग्णालये/वैद्यकीय महाविद्यालये आणि आरोग्य खात्याच्या संरचनात्मक दुरुस्त्या | ६.०० | ⅄८.०६ |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१०.२० कोटी

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | **(ब) <u>माध्यमिक आरोग्य सेवा</u>** | **(एक) उपनगरीय रुग्णालयांची दर्जोन्नती** | | |
| | | - के.बी. भाभा रुग्णालय वांद्रे रुग्णालयाचे विस्तारीकरण | ५३.६० | ४२.५६ |
| | | - आर/उत्तर विभागातील भगवती रुग्णालय कॉम्प्लेक्स फेज-दोन बोरिवली (प) चे पुनर्विकास करणे | ११०.०० | ६९.३२ |
| | | - एम.टी.अगरवाल महानगरपालिका दवाखाना टी विभाग मुलुंड (प) चे विस्तारीकरण करणे | ९५.०० | ⅄ १०२.४८ |
| | | - राजवाडी रुग्णालय येथील जुन्या व नवीन इमारतीच्या विस्तृत अंतर्गत दुरुस्त्या, महिला ऑर्थो व सर्जिकल कक्ष तसेच निवासी वैद्यकीय अधिकारी वसाहतीच्या दुरुस्त्या आणि नुतनीकरणासाठी तरतूद आणि तळमजला आणि ४ मजली नवीन इमारतीच्या दुरुस्त्या | ५.५२ | ४.४३ |
| | | - विक्रोळी येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचा पुनर्विकास | ६.८८ | ✦ १३.२३ |
| | | - गोरेगांव येथील सिध्दार्थ रुग्णालयाच्या पुनर्विकासाकरीत | ५०.०० | १७.७४ |
| | | - कांदिवली (प) येथील शताब्दी रुग्णालयाचे प्रस्तावित बांधकाम | ७५.०० | ३३.१३ |
| | | -गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयाचा पुनर्विकास | ११०.०० | १०१.९४ |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१०२.५० कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१५.०० कोटी

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | **क) उच्चतम दर्जाच्या स्तरावरील आरोग्य सेवा** | **रा. ए. स्मा. रुग्णालय** : | | |
| | | - यंत्रे व संयंत्रे | ३९.४८ | २९.८० |
| | | - डिजीटल रेडिओलॉजी इक्वीपमेंट | ७.५० | --- |
| | | - मल्टीडिटेक्टर सी.टी.स्कॅन | १३.०० | ११.०८ |
| | | - एम.आर.आय. मशिन्स | १५.०० | --- |
| | | - मॉडयूलर ओ.टी. | ९.७५ | २.९१ |
| | | **लो. टि. म. स. रुग्णालय** : | | |
| | | - यंत्रे व संयंत्रे | ३०.०० | १५.६६ |
| | | - मल्टीडिटेक्टर सी.टी.स्कॅन | १२.५० | १.८६ |
| | | - सायन रुग्णालयाच्या इमारतींची पुनर्बांधणी | ७०.०२ | ⅄१००.०५ |
| | | **नायर रुग्णालय** : | | |
| | | - यंत्रे व संयंत्रांची खरेदी | २७.०० | ४.९३ |
| | | - मल्टीडिटेक्टर सी.टी.स्कॅन | १२.५० | ७.५४ |
| | | - निविदा मागवून नायर रुग्णालयातील मुख्य स्थापत्य दुरुस्त्यांची कामे करणे | १.३७ | ०.६३ |
| २. | **स्मशानभूमींचा विकास आणि दर्जोन्नती** | - स्मशानभूमीचा विकास / सुधारणा | ५६.०२ | २७.२० |
| ३. | **महानगरपालिकेच्या वैद्यकीय शिक्षण संस्थांच्या विस्तार आणि दर्जोन्नती** | - नायर दंत महाविद्यालयाचा विस्तार करणे | १७.५० | ✦ १७.५१ |
| | | - डॉ.आर.एन.कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय येथे वैद्यकीय महाविद्यालय नवीन इमारत बांधणे | ५.०० | --- |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१००.१२ कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.२८.५१ कोटी

### ३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | प्राथमिक आरोग्य सेवा बळकटीकरण | प्राथमिक आरोग्य सेवा बळकटीकरणाच्या दिशेने एक पाऊल म्हणून ''हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना'' हा Flagship Programme बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुरु केला आहे, जेणेकरुन नागरिकांना सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा त्यांच्या सोयीच्या ठिकाणी आणि वेळेत मिळू शकतील. पॉलीक्लिनीक व डायग्नॉस्टिक सेंटरमध्ये नागरिकांना दंतचिकित्सक, स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, फिजिशियन, त्वचारोगतज्ञ आणि नेत्रतज्ञ, इ. तज्ञांच्या सेवा पुरविण्यात येत आहेत. तसेच ६ अतिरिक्त पॉलीक्लिनीक व डायग्नॉस्टिक सेंटर्स आणि ५४ ''हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना'' सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे, फिजिओथेरपिस्ट आणि कान, नाक, घसा तज्ञांच्या सुविधा लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पॅनलवरील खाजगी डायग्नॉस्टिक सेंटरमार्फत एक्स-रे, मॅमोग्राफी, ई.सी.जी.,सी.टी.स्कॅन आणि एम.आर.आय. इत्यादी सेवा Voucher पध्दतीने अनुदानित दरात प्रदान करण्यात येणार आहेत. |
| २. | उपनगरीय रुग्णालयांच्या बळकटीकरणाचा कार्यक्रम | मुंबईतील बहुसंख्य लोकसंख्या शहराच्या उपनगरीय भागात राहते. या भागातील नागरीकांना विशेष आणि अतिविशेष आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपनगरीय रुग्णालयांच्या बळकटीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. मुलुंड येथील श्रीमती एम.टी.अगरवाल रुग्णालय आणि बोरिवली येथील भगवती रुग्णालयांच्या पुनर्विकासाचे बांधकाम प्रगतीपथावर असून ते डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होईल.वांद्रे येथील भाभा रुग्णालयाच्या विस्तारीकरण प्रकल्पाचे |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | बांधकाम सुरु असून ते डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. राजावाडी रुग्णालयातील निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थान इमारतीचा ताबा रुग्णालय प्रशासनाकडे देण्यात आला असून आवश्यक त्या फर्निचर खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच, या रुग्णालयात आपत्कालीन विभागासाठी स्वतंत्र इमारत प्रस्तावित आहे. गोरेगांव येथील सिध्दार्थ रुग्णालयाच्या पुनर्विकासाकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यादेश देण्यात आला आहे. सद्यस्थितीत इमारतीच्या पायाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. विक्रोळी येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रूग्णालयाचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. ५०० खाटांच्या नवीन प्रस्तावित रुग्णालयाच्या आराखडाला मान्यता मिळाली असून, निविदाप्रक्रिया सुरू आहे. उपनगरीय रुग्णालयांच्या पुनर्विकासाच्या कामांमुळे मुंबईतील उपनगरात राहणाऱ्या एक कोटीहून अधिक लोकसंख्येला थेट फायदा होईल. उपनगरातील नागरिकांना ज्यासाठी सध्या शहर परिसरातील प्रमुख रुग्णालयांत जावे लागत आहे त्या सुपर स्पेशालिटी सेवेचा लाभ त्यांच्या निवासस्थानाजवळ मिळेल. उपनगरीय रुग्णालयांच्या पुनर्विकासामुळे प्रमुख रुग्णालयांवरील रुग्णसेवेचा भार निश्चितपणे कमी होईल ज्यामुळे तेथील वैद्यकीय संशोधन आणि शैक्षणिक उपक्रम यात गुणात्मक वाढ होईल. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ३. | उच्चतम दर्जाच्या स्तरावरील आरोग्य सेवा | सर्व प्रमुख रूग्णालये नागरीकांना उच्च दर्जाच्या विशेष व अतिविशेष स्वरूपांच्या रूग्णसेवा पुरवितात. सर्व प्रमुख रूग्णालयांत अतिरिक्त ३० रूग्णशय्या उपलब्ध करून डायलिसीस सेवांचा विस्तार व सक्षमीकरण करण्यात येत आहेत. के.ई.एम., सायन, नायर येथे कृत्रीम गर्भधारणा तंत्रज्ञानाचा अवलंब करून इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन (In-Vitro Fertilization – IVF) सेवा सुरू करण्यात येत आहे. के.ई.एम.रूग्णालयात यकृत व हदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभाग सुरू करण्यात येणार आहे. या प्रयोजनार्थ आवश्यक सी.टी.स्कॅन, लॅप्रोस्कोपिक एचडी सेट, हार्ट लंग मशिन, अत्याधुनिक सोनोग्राफी मशीन, विविध एन्डोस्कोपी प्रक्रियांकरीता आवश्यक नेजल एन्डोस्कोपी सिस्टम इत्यादींची खरेदी खात्यामार्फत करण्यात येणार आहे. तसेच ४ नग '3-Tesla MRI machine' देखील खरेदी करण्यात येणार आहेत. बा.य.ल.नायर धर्मादाय रूग्णालयातील समर्पित ओन्कोलॉजी विभाग व आपत्कालीन विभाग इमारत आणि के.ई.एम.रूग्णालयातील शताब्दी इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे.सायन रूग्णालयाच्या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत, नर्सिंग कॉलेज व आर.एम.ओ. वसतीगृहाचा समावेश असलेला पहिला टप्पा पूर्णत्वास येत असून रूग्णालय इमारतीचा समावेश असलेल्या दुस-या टप्प्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांतील जैव वैद्यकीय उपकरणांचे मॅपिंग करण्याचे काम पूर्ण झाले आहे. रुग्णालयातील सदर यंत्रणा जास्तीत जास्त काळ कार्यान्वित राहण्याच्या दृष्टीने त्यांच्या परिरक्षणासाठी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. नवीन सुविधांमुळे, मोठ्या रुग्णालयांमधील उच्चस्तरीय निदान सुविधांचा केवळ प्रतिक्षा कालावधीच कमी होईल असे नाही तर सुविधांच्या परवडणाऱ्या दरांमुळे नागरिकांच्या खिशातून होणारा खर्चही लक्षणीयरित्या कमी होईल. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ४. | स्मशानभूमींचा विकास आणि दर्जोन्नती | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ७ स्मशानभूमींचे पी.एन.जी. स्मशानभूमीत रूपांतर करण्याचे काम पूर्ण करण्यात येईल. वायू प्रदूषण कमी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ स्मशानभूमींमध्ये (३ शहर, ३ पूर्व उपनगरे, ३ पश्चिम उपनगरे) पारंपारिक चितेऐवजी पर्यावरणपूरक दहनाकरीता लाकूड /ब्रिकेट्स ऐवजी पॅलेट्सचा वापर करून नवीन चिता तयार करण्यात येणार आहे. |
| ५. | प्रशिक्षण आयोजित करणे | विविध ३२ विषयांवर प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील ४४३९ व निम्न वैद्यकीय क्षेत्रातील २८९७ मिळून ७३३६ अधिकारी व कर्मचा-यांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. |
| ६. | विविध माध्यमांद्वारे आरोग्य विषयक जनजागृती करणे | माहिती, शिक्षण व संपर्क विभागातर्फे<br>**पोस्टर्स**:- डेंग्यू-मलेरिया-१ लाख, जलजन्य आजार-१ लाख, लेप्टोस्पायरोसिस-१ लाख, मेंटल हेल्थ-२५ हजार, जागतिक तंबाखू विरोधी दिवस-२५ हजार, जागतिक आरोग्य विषयक पोस्टर्स -२५ हजार, गणपती उत्सवात मिठाईतून होणारी विषबाधा टाळण्याकरीता १५ हजार पोस्टर्स छापून वितरित करण्यात आले. २४ विभागात छापून वितरित करण्यात आले.<br>**बॅनर**:- बॅनर छापून तसेच २४ विभागात वितरण लसीकरण, आभा कार्ड, असंसर्गजन्य रोग-मधुमेह, कुटुंब नियोजन इ. आरोग्य खात्याने केलेले कार्य महानगरपालिकेतील इतर विभागांना देखील अवगत व्हावे व सर्वांना आरोग्य विषयक योग्य माहिती वेळोवेळी मिळावी याकरिता ‘आरोग्य मंथन-मुंबई’ त्रैमासिक आरोग्य पत्रिका ३००० प्रती छापून वितरित करण्यात आले.<br>तसेच २१० दवाखाने व प्रसुतिगृहे येथे एलसीडी टिव्ही वर विविध आजारांविषयक फिल्म व जाहिरात दाखविण्यात आली.<br>**बस फलक जाहिरात**:-क्षयरोग व क्षयरोग लक्षणे, डेंग्यू,एनिमिया मुक्त मुंबई या विषयांवर जाहिरात प्रदर्शित करण्यात आली. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | **रेडिओ जाहिरात:-** मानसिक आरोग्य विषयक रेडिओ सिटी रेडिओ वाहिनीवर जाहिरात प्रसारित करण्यात आली.<br>**होर्डिंग्ज:-** क्षयरोग, पोलिओ, मधुमेह, कुष्ठरोग विषयक होर्डिंग्ज महानगरपालिकेच्या २४ विभागात प्रदर्शित करण्यात आले.<br>उपरोक्त जनजागृती माध्यमांचा वापर करून आरोग्य विषयक जनजागृती करण्यात आली. |
| ७. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत सर्व आरोग्य संस्था उदा. आरोग्य केंद्रे -२११ (ORS+IPPV+RCH+NUHM) प्रसुतिगृहे -२९+१ माता-बाल रूग्णालय दवाखाने-१९०, विशेष रूग्णालये - ५, सर्वसाधारण रूग्णालय-१६, शैक्षणिक महाविद्यालयीन रूग्णालये-५, शासकीय रूग्णालये-५ व खाजगी आरोग्य संस्था (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील) यांचे विविध अहवाल संकलित करून, वर्गीकरणे व अवलोकन करणे आणि आरोग्य खात्यास व शासनास त्यांची पूर्तता करणे. व्यमाका कार्यालयामध्ये पुढील दर्शविण्यात आलेले अहवाल तयार करणे जसे कुटुंब कल्याण विषयक मासिक,त्रैमासिक व वार्षिक अहवाल तयार करणे, जन्म व मृत्यू नोंदणीची आकडेवारी तयार करण्याबाबतचा अहवाल. सॅप आणि सी.आर.एस. प्रणाली अनुषंगाने, सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत असलेल्या दवाखान्यांचे अहवाल तयार करणे, आरोग्य व्यवस्थापन माहिती व कार्यप्रणाली. (HMIS) आणि नागरी नोंदणी पध्दती (CRS System) या नवीन अद्ययावत कार्यप्रणालींचे काम करणे. | कुटुंब कल्याण विषयक मासिक व वार्षिक अहवाल तयार करणे जसे-<br>**मासिक अहवाल-**<br>कुटुंब कल्याण विषय निर्देशक अहवाल -<br>१) १८ निर्देशक अहवाल (कुटुंब कल्याण व लसीकरण),<br>२) २० कलमी अहवाल (कुटुंब कल्याण व लसीकरण),<br>**वार्षिक अहवाल-**<br>अ) सामाजिक व लोकसांख्यिक वैशिष्टयानुसार अहवाल-<br>१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन कार्यक्रम (मुंबई शहर व मुंबई उपनगरे)<br>ब) जीवनाविषयक सांख्यिकी आकडेवारी बाबत अहवाल-<br>• जन्म आणि जन्मदर<br>• मृत्यू आणि मृत्यूदर<br>• अर्भक मृत्यू आणि अर्भक मृत्यूदर<br>• नवजात मृत्यू आणि नवजात मृत्यूदर<br>• उपजत मृत्यू<br>• घरी झालेले जन्म<br>• ५ वर्षाखालील बालकांचे मृत्यू |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ८. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामधील कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या विविध आरोग्य संस्थांकडून म्हणजेच महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालयीन रूग्णालये, सर्वसाधारण रूग्णालये, सर्वसाधारण रूग्णालये, प्रसुतिगृहे आरोग्य केंद्रे व दवाखाने तसेच शासकीय रूग्णालय व खाजगी स्वयंसेवी संस्था दरमहा केंद्रशासनाच्या HMIS संगणक प्रणालीवर संस्थानिहाय Username व Password वापरून ५ ते १० तारखेपर्यंत अहवाल भरतात. एप्रिल २०१७ पासून केंद्रशासनाच्या HMIS संगणक प्रणालीवर संस्थानिहाय माहिती भरत आहेत. केंद्रशासनाच्या संगणक प्रणालीवर जवळपास १००० Data elements आहेत.<br>दि.०१.०१.२०१६ पासून महानगरपालिकेच्या हद्दीत होणा-या जन्म व मृत्यूंची नोंदणी पध्दती (CRS) संगणक प्रणालीमध्ये विभागवार करण्यात येते. दि.०१.०१.१६ पूर्वी महानगरपालिकेच्या हद्दीत होणा-या जन्म व मृत्यूंची नोंदणी सॅपप्रणालीमध्ये होत होती. सदर नागरी नोंदणी पध्दती (CRS) संगणक प्रणाली मधून जन्म,मृत्यू, उपजत मृत्यू, अर्भक मृत्यू, बाल मृत्यू व मृत्यूंच्या कारणाची माहिती (ICD-10 Report) इ. अहवाल तयार करण्यात येतात. सदर माहितीचा उपयोग महानगरपालिका, राज्यशासन व केंद्रशासन यांना, आरोग्य विषेयक विविध उपक्रम राबविण्याकरीता उपयुक्त ठरते. | सदर माहिती विविध आरोग्य विषयक उपक्रम व धोरणे निश्चित करण्याच्या उद्देशाने संकलित केली आहे. कुटुंब नियोजन आणि माता बाल आरोग्याशी निगडित १८ निर्देशांकाचे मासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, वार्षिक अहवाल सादर करण्यात येतात. त्रैमासिक प्रत्येक सभेमध्ये उपेक्षित उध्दिष्टे व साध्य उध्दिष्टे यांचा आढावा घेतला जातो. कुटुंब नियोजनाच्या दृष्टीने जननक्षम जोडप्यांची सांख्यिकी माहिती, कुटुंब नियोजनात सहभागी झालेल्या कुटुंबांची वय, शिक्षण व उत्पन्न यानुसार निर्देशक निहाय वर्गवारी करण्यात येते.<br>नागरी नोंदणी पध्दती (CRS) संगणक प्रणाली मधून जन्म,मृत्यू, उपजत मृत्यू, अर्भक मृत्यू, बाल मृत्यू व मृत्यूंच्या कारणाची माहिती (ICD-10 Report) इ. अहवाल तयार करून त्याचे विश्लेषण करण्यात येते.<br>केंद्रशासनाच्या सुचनांनुसार जन्म व मृत्यूंच्या नोंदणीकरीता नागरी नोंदणी पध्दती (CRS) संगणक प्रणाली सुरू करण्यात आली आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित आणि साध्य केलेली फलश्रुती | मुंबई शहर | | | मुंबई उपनगरे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | | अपेक्षित | साध्य | % | अपेक्षित | साध्य | % |
| | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया | ९७३४ | ३२७४ | ३३.६३ | १७०३१ | ६५६२ | ३८.५२ |
| | तांबी | १६४२५ | ७०२७ | ४२.७८ | ३६४६५ | २११४६ | ५७.९८ |
| | संतती नियमन गोळ्या | १०५७५५ | ६६५०८ | ६२.८८ | २९६२७० | १४१४९३ | ४७.७५ |
| | निरोध | १४९९८३२ | १२७६७६८ | ८५.१२ | ३१५०१४४ | २६६०३०४ | ८४.४५ |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | १६८०.१९ | १०५५.८९ | १७१६.८५ |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ४६२९.१९ | ४८१.४३ | ५४७४.२८ |
| एकूण | ६३०९.३८ | १५३७.३२ | ७१९१.१३ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# शिक्षण खाते

**१. प्रस्तावना** :

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (क्यू) अन्वये प्राथमिक शिक्षण देणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे. सदरची जबाबदारी महानगरपालिकेचे शिक्षण खाते पार पाडीत आहे. मुंबई महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, इंग्रजी, तेलगू, तामिळ व कन्नड अशा आठ माध्यमाच्या ९६५ प्राथमिक शाळेतून शिक्षण दिले जात आहे. तसेच सीबीएसई मंडळाच्या १८ व आयसीएसई, आयजीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी १ अशा २१ शाळा सुरू आहेत व २४९ माध्यमिक शाळांमधून मोफत शिक्षण दिले जात आहे.

महानगरपालिकेतर्फे विशेष मुलांसाठी १८ विशेष शाळा सुरु आहेत. महानगरपालिकेतर्फे २ अध्यापक विद्यालये व ३ ज्यूनियर कॉलेज देखील चालविली जात आहेत. प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार करण्याच्या उद्दिष्टाने खाजगी संस्थांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात उद्युक्त करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत, बृहन्मुंबई महागरपालिका अनुदान शाळा संहितेतील तरतुदीचे पालन करणा-या शाळांना सदर अनुदान सहाय्य संहितेच्या अटी व शर्तीनुसार, अनुदानास पात्र ठरणा-या शाळांना महानगरपालिकेतर्फे अनुदान सहाय्य देण्यात येते. या खाजगी शाळांच्या कामकाजांचे पर्यवेक्षण करणे इ. कामे महानगरपालिकेतर्फे करण्यात येतात. या अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचा-यांना संगणकीय प्रणालीद्वारे मासिक वेतन देण्याची व्यवस्था महानगरपालिकेद्वारे करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेमार्फत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संगीत, चित्रकला, हस्तकला तसेच शारीरिक शिक्षणही दिले जाते. मुंबई महानगरपालिकेतर्फे विद्यार्थ्यांसाठी पार पाडण्यात येणा-या उपक्रमांचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे आहे.

**मोफत पाठ्यपुस्तके :**

मुंबई महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते ८ वी तील तसेच खाजगी अनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान या प्रकल्पाच्या माध्यमातून मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतात.

**शालेय वस्तूंचा मोफत पुरवठा :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतून प्रवेश घेणारे बहुसंख्य विद्यार्थी हे आर्थिक दृष्टया दुर्बल समाजघटकातून आलेले असतात. अशा परिस्थितीत महानगरपालिकेतील शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांवर शालोपयोगी वस्तू खरेदीचा आर्थिक बोजा पडू नये म्हणून सन २००७-०८ पासून मोफत शालोपयोगी वस्तुंचे वितरण करण्यात येते.

सद्यस्थितीत २०२४-२५ करिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थांना शालोपयोगी वस्तु गणवेश, वह्या, बुट व मोजे, पावसाळी सँडल, रेनकोट/छत्री, स्कूल किट (पाण्याची बाटली, जेवणाचा डबा व शाळेची बॅग), कॅनव्हास

शूज व स्पोर्टस युनिफॉर्म इत्यादी साहित्याची खरेदी करुन विद्यार्थांना वाटप करणेबाबत व त्याचप्रमाणे, बालवाडी वर्गाना प्रथमच लेखन-वाचन साहित्य पुरविण्यात आलेले आहे. तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या अन्य मंडळाच्या शालेय विद्यार्थांना देखील मोफत शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

**महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना मोफत बस प्रवास :**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक हे विविध प्रांतिय तसेच बहुभाषिक असल्यामुळे सर्व बालकांसाठी त्यांच्या मातृभाषेची शाळा वेळेत उपलब्ध होण्याच्या उद्देशाने गणवेषधारी इ. १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या निवासस्थानापासून ते शाळेपर्यंत ये-जा करण्यासाठी त्रास होऊ नये, त्यांना वेळेत शाळेमध्ये येता यावे यासाठी ज्या भागांमध्ये बस सेवा उपलब्ध नाही अशा ठिकाणी बस सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने बेस्ट बस मोफत प्रवास (झिरो तिकीट) योजना सन २०१७-१८ पासून सुरु करण्यात आली आहे. प्रतिवर्षी अंदाजे २३,००० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. तसेच बेस्ट विभागामार्फत नव्याने अद्ययावत करण्यात आलेल्या चलो स्मार्ट कार्ड चे वितरण करण्यात आलेले आहे.

**विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेश :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा कल क्रीडा क्षेत्राकडे होणे, क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी होणे, क्रीडा कौशल्य वाढणे तसेच शारीरिक शिक्षणाच्या तासिकांमध्ये कुठल्याही प्रकारचा खेळ खेळताना सर्व शारीरिक हालचाली मुक्तपणे करता येऊन विद्यार्थ्यांना क्रीडा गणवेशात सहज खेळता येणे, शालेय वातावरणात क्रीडा गणवेशातील व्यक्तीमत्व व शिस्त वृद्धिंगत होण्यात भर पडेल, या सर्व दृष्टीने मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील सुमारे २,२२,३९० विद्यार्थ्यांना आठवड्यातील शनिवारी त्या दिवसाच्या तासिकेसाठी लाल, निळा, पिवळा व हिरवा अशा रंगातील क्रीडा गणवेश देण्यात आलेले आहेत.

**क्रीडा संकुल:-** महानगरपालिका परिक्षेत्रातील मध्यवर्ती ठिकाणे निश्चित करून मुंबई शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगर यांजकरीता प्रत्येकी एक अशी एकूण ०३ क्रीडा संकुले उभारण्यात येत आहेत.

**महानगरपालिका शालेय इमारतींची दुरस्ती, दर्जोन्नती, पुनर्बांधणी :**

महानगरपालिकेच्या स्वत: च्या मालकीच्या एकूण ४७९ शालेय इमारती आहेत.

**दुरुस्ती व दर्जोन्नती**: सन २०२३-२४ वर्षातील मोठया दुरुस्तीची व दर्जोन्नतीची ४४ कामे व सन २०२४-२५ या वर्षामध्ये दि. ३१.१०.२०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली दुरुस्तीची व दर्जोन्नतीची २२ कामे अशी एकूण ६६ कामे प्रगतीपथावर होती. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ४० कामे पूर्ण करण्यात येणार आहेत आणि २६ कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

**पुनर्बांधणी व नवीन बांधकामे**: सन २०२३-२४ वर्षातील पुनर्बांधणी व नवीन बांधकामाची ०८ कामे व सन २०२४-२५ वर्षामध्ये दि. ३१.१०.२०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली पुनर्बांधणी व नवीन बांधकामाकारिता ०७ कामे अशी एकूण १५ कामे प्रगतीपथावर होती. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ०५ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत आणि १० कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

अशाप्रकारे मार्च २०२५ पर्यंत दुरूस्ती व दर्जोन्नती पुनर्बांधणी व नवीन बांधणीची एकूण ४५ कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित ३६ कामे त्यापुढील वर्षामध्ये पूर्ण करण्यात येणार आहेत.

**परिमंडळनिहाय ठेकेदार (Zonal Contractor)**:- महानगरपालिका शालेय इमारतींच्या किरकोळ व तात्काळ स्वरुपाची दुरुस्तीची कामे करण्यासाठी सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षाकारिता ठेकेदारांची नियुक्ती निविदा प्रक्रिया राबवून करण्यात येणार आहे.

**डिजिटल क्लासरुम :**

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूण ७,९३४ वर्गखोल्यांपैकी मागील वर्षापर्यंत एकूण २,५१४ वर्गखोल्या डिजीटल करण्यात आलेल्या आहेत. सन २०२४-२५ मध्ये आणखी १,३०० वर्गखोल्यांमध्ये "LED Interactive Pannel" द्वारे डिजीटल वर्ग उभारण्यासाठीचे काम सुरु आहे. अशा प्रकारे ३,८१४ वर्गखोल्या डिजीटल क्लासरुम होणार असून उर्वरित ४,१२० वर्गखोल्या टप्प्याटप्प्याने डिजीटल करण्यात येणार आहेत.

सन २०२४-२५ मध्ये "LED Interactive Pannel" द्वारे इयत्ता १ ली ते इयत्ता १०वी च्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्या सर्व विषयाचा अभ्यासक्रम ऑडिओ व व्हिडिओ आणि E-Content स्वरुपात उपलब्ध करुन दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे "LED Interactive Pannel" मध्ये विद्यार्थ्यांच्या फेस बायोमॅट्रीक उपस्थितीसाठी वेब कॅमेराची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**टॅबद्वारे खेळातून शिक्षण:-**

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत वापरात येणा-या तंत्रज्ञानामधील नवनवीन बदलांचा विचार करून खेळातून शिक्षण या संकल्पनेवर आधारित "Gamified Learning App" ही सुविधा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या एकूण १९,४०१ टॅबमध्ये नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

**कॉम्प्युटर लॅब (संगणक प्रयोगशाळा) अद्ययावतीकरण :-**

मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील २२४ (प्राथमिक १९३ व माध्यमिक ३१) संगणक प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण करणे व ५० संगणक प्रयोगशाळांमध्ये (प्राथमिक ४१ व माध्यमिक ९) अतिरिक्त संगणक संचाची खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यापैकी सन २०२४-२५ मध्ये ११२ संगणक प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण तसेच ३८ संगणक संचाची खरेदी करण्यात येणार आहे.

अद्ययावतीकरणामध्ये संगणकाचे रॅम क्षमता वाढविण्यात येणार असून MS Office, Learning Management System, Remote Management System, Coding Software व संगणक आणि माहिती तंत्रज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमासाठी सॉफ्टवेअर तसेच भौतिक सुविधांसाठी फर्निचर, इलेक्ट्रीक साहित्य यासारख्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

**वार्षिक शैक्षणिक सहल :**

शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये इयत्ता ४ थी च्या २८,४१५ विद्यार्थांकरिता वीर माता जिजामाता भोसले वनस्पती उद्यान व प्राणी संग्रहालय, भायखळा येथे व इयत्ता ७ वी च्या २९,३७४ विद्यार्थांकरिता किडझेनिया येथे अशा एकूण ५७,७८९ विद्यार्थ्यांकरिता सहलीचे आयोजन करण्यात आले.

**बेटी बचाओ बेटी पढाओ :**

बेटी बचाव बेटी पढाओ उपक्रमांतर्गत मुलींचा आत्मविश्वास वाढविणे, शैक्षणिक मूल्यसंवर्धनाचा विकास करणे, तारक कौशल्य व कृतीशील जीवनशैली जोपासणे, पालकांचा समाजाचा मुलींच्या बाबतीत दृष्टीकोन बदलण्याकरिता कार्यक्रमांचे आयोजन करणे, शिक्षण प्रवाहात मुलींना आणणे व दर्जेदार शिक्षण देणे ही उद्दिष्टे आहेत. त्याकरिता जनजागृती मेळावे, जीवनोपयोगी व्यवसाय प्रशिक्षण, व्यक्तीमत्व विकास शिबिर, माता- पालक संघाच्या बैठका, कर्तृत्ववान स्त्रियांचा माहितीपट दाखविणे इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना:**

केंद्रशासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेचे नव्याने नामकरण झालेली **'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना'** अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील महानगरपालिका व खाजगी अनुदानित प्राथमिक/माध्यमिक शाळांतील इ.१ ली ते इ.८ वी च्या अंदाजीत ५.५७ लक्ष विद्यार्थांना मध्यान भोजन दिले जाते.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात १६० महिला संस्थांद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील महानगरपालिकेच्या व खाजगी अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते ५ वी च्या ३,११,१०१ व इ.६ वी ते ८ वी च्या २४,०७५ विद्यार्थांना शिजवलेल्या आहाराचे वितरण करण्यात आले.

वितरण करण्याच्या आहाराचा मेनू शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या पीएम पोषण विभागाद्वारे निश्चित केला जातो. मेनू व्यतिरिक्त अतिरिक्त पूरक अन्नपदार्थ जसे की केळी किंवा ऋतूनुसार उपलब्ध फळे, खजूर, लाडू, इत्यादी पोषक पदार्थ विद्यार्थांना आठवड्यातून एकदा दिले जातात.

प्रतिदिन प्रतिविद्यार्थी इ. १ ली ते ५ वी साठी ४०० ग्रॅम ते ४५० ग्रॅम वजनाचा व इ. ६ वी ते ८ वी साठी ७०० ग्रॅम ते ७५० ग्रॅम वजनाचा शिजवलेला आहाराचा पुरवठा महिला संस्थांकडून शाळा स्तरावर केला जातो. याकरिता महिला संस्थाना इ. १ ली ते ५ वी साठी रु.५.४५ प्रति लाभार्थी व इ.६ वी ते ८ वी साठी रु.८.१७ प्रति लाभार्थी इतके अनुदान दिले जाते.

**व्हर्च्युअल क्लासरुम (VTC) :**

सद्यस्थितीत मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी या ०४ माध्यमाच्या एकूण ४८० शाळांमध्ये (३६० प्राथमिक व १२० माध्यमिक ) व्हीटीसी ऑनलाईन शिक्षण सुरू करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, महानगरपालिका शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या १,३०० इंटरॲक्टीव्ह डिजीटल पॅनेलपैकी ३०० पॅनेल व्हीटीसीशी जोडले गेले असून त्या माध्यमातून निवडक शिक्षक अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

**शालेय आरोग्य कार्यक्रम :**

शालेय आरोग्य विभागाच्या वैद्यकीय पथकांतर्फे मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी केली जाते. यामध्ये जन्मत: व्यंग, पोषणमूल्यांची कमतरता, शारीरिक व मानसिक विकासात्मक विलंब, इ. आजारांची तपासणी केली जाते. विद्यार्थांना असणा-या संशयित आजारानुसार महानगरपालिका दवाखाना/रुग्णालये येथे संदर्भित करुन त्यांच्यावर मोफत उपचार केले जातात. त्याचप्रमाणे, शिक्षक, विद्यार्थी व पालकांना विविध आजार व स्वास्थाविषयी माहिती देण्यात येते. विद्यार्थांची नेत्रचिकित्सा करुन चष्माचा नंबर असलेल्यांना मोफत चष्मे देण्यात येतात.

**बालकोत्सव :**

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातून प्रतिवर्षी बालकोत्सव साजरा करण्यात येतो. बालकोत्सव या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होते. या कार्यक्रमांतर्गत नाटयस्पर्धा, लोकनृत्य व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थांना आपल्या नृत्य संगीत व अभिनय गुणांचा अविष्कार दाखविण्याची उत्तम संधी उपलब्ध करुन देण्यात येते व संपूर्ण महानगरपालिकेतून जवळपास २०,५२० विद्यार्थी सहभागी होणारी ही महत्वपूर्ण स्पर्धा आहे. ही स्पर्धा विभागस्तर, महानगरपालिका स्तरावर आयोजित करण्यात येते. बालकोत्सव स्पर्धेअंतर्गत तीन प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यामध्ये नाट्य स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा कार्यक्रम स्पर्धा विभाग स्तरावर घेण्यात येते. लोकनृत्य स्पर्धा विभाग स्तरावर तसेच त्यानंतर महानगरपालिकेच्या आठ विभागातून प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या लोकनृत्याची अंतिम फेरी प्रशस्त सभागृहामध्ये स्पर्धेसाठी सादर करण्यात येऊन त्यामधून अंतिम विजेत्यांची निवड करण्यात येते. प्रथम तीन विजेत्या लोकनृत्यास ट्राफी, प्रशस्तीपत्र व रोख स्वरुपात बक्षिस तसेच सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येतात.

**महापौर पुरस्कार :**

विद्यादानाचे पवित्र कार्य करणा-या शिक्षकांना प्रोत्साहित करावे, त्यांना प्रेरणा व स्फूर्ती मिळावी व त्यातून त्यांनी उद्याचे भावी नागरिक घडविताना तन, मन, धनाने कार्य करावे याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक, विशेष शाळा तसेच खाजगी अनुदानित शाळांतील ५० मुख्याध्यापक, प्रशिक्षकांना भारताचे भुतपूर्व राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीदिनी दि.०५ सप्टेंबर रोजी मान. महापौरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

**स्काऊट गाईड :**

शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये स्काऊट-गाईडच्या चळवळीमध्ये २८,८९७ विद्यार्थी व १,२०० शिक्षकांची नोंद झाली आहे.

सन २०२३-२४ पासून Urban Vegetable Farming अंतर्गत किचन गाईड हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. वाढते प्रदुषण व ग्लोबींग वार्मींगला आळा घालण्याकरिता पृथ्वीवर जास्तीत जास्त हिरवळ निर्माण होणे आवश्यक आहे. शहरी भागात त्याची कार्यवाही करण्याबाबत स्काऊट –गाईड विद्यार्थांना सदर उपक्रमांतर्गत शिक्षण देण्यात येत आहे.

हज यात्रा सेवाकार्य, माऊंट मेरी सेवाकार्य, अनंत चतुर्दशी सेवाकार्य, महालक्ष्मी सेवाकार्य या उपक्रमांतर्गत स्काऊट – गाईड विद्यार्थ्यांनी पाणी वाटप, स्वच्छता मोहिम व प्रथमोपचार यांसारख्या कार्यक्रमांत सहभाग नोंदविला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाच्या संयुक्तिक कार्यक्रमात उदा.मेरी माटी मेरा देश, वन्य जीव सप्ताह, वृक्षारोपण, गांधी जयंती निमित्त स्वच्छता मोहिम या कार्यक्रमांत देखील स्काऊट- गाईड विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

दि.१ ऑक्टोबर २०२४ रोजी स्काऊट-गाईड विभागाने स्वच्छता मोहिमेत देखील सक्रीय सहभाग घेत स्वच्छता करण्याबरोबर जनजागृती देखील केली. प्रजासत्ताक दिनी होणा-या शासकीय संचलनामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका स्काऊट-गाईड विभागातील गाईड्स पथकाचा सक्रिय सहभाग असतो.

**रस्ता सुरक्षा दल (आरएसपी) :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध माध्यमांच्या प्राथमिक, माध्यामिक शाळांमध्ये आर.एस.पी.ची एकूण २६८ पथके कार्यरत आहेत. प्राथमिक विभागाच्या २३७ पथकात सुमारे ९,४८० विद्यार्थी तसेच माध्यमिक शाळांमध्ये

आर.एस.पी.ची ३१ पथके कार्यरत असून १,२४० विद्यार्थी असे एकूण १०,७२० विद्यार्थी सक्रीय आहेत. या विद्यार्थ्यांकरिता आर.एस.पी. निवासी शिबिर आयोजित करुन, मुंबई वाहतूक नियंत्रण कक्षातून पोलिस अधिकारी व तज्ञ व्यक्तींकडून त्यांना रस्ता सुरक्षेचे नियम, ट्राफीक सिग्नल (Traffic Signal) संबंधी परिपूर्ण माहिती दिली जाते. मुंबई शहर वाहतूक नियंत्रण कक्षाकडून आर.एस.पी. पथकात सामील असलेल्या प्रत्येक विद्यार्थास प्रमाणपत्र देण्यात येते.

**दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना :**

इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी मधील सर्व दिव्यांग विद्यार्थी जे प्रथम व व्दितीय सत्र परीक्षेत 'ब' किंवा त्यापेक्षा वरील श्रेणी प्राप्त करतील अशा विद्यार्थ्यांना रु. १,०००/- ते रु. २,०००/- पर्यंत वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ हा सन २०२४-२५ या वर्षात २,६८७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

**दिव्यांग विद्यार्थी व पालक उपस्थिती भत्ता योजना :**

विशेष शाळांमधील व समावेशित शिक्षणांतर्गत शिकणाऱ्या सर्व माध्यमांतील इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी मधील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता प्रति विद्यार्थी रु.१० + रु.१० पालकांसाठी उपस्थिती भत्ता दिला जातो. एकूण ८०% पेक्षा जास्त उपस्थिती असणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना अधिक रु. २००/- प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता एकूण ३,५२९ दिव्यांग विद्यार्थांना प्रतिदिन रु.२०/- प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. सन २०२४-२५ मध्ये सदर योजना सुरु राहणार आहे.

**माध्यमिक शिक्षण विभाग :**

स्थानिक लोकांच्या मागणीनुसार १९६५ -६६ मध्ये महानगरपालिकेने प्रथमत: १७ माध्यमिक शाळा सुरु केल्या, ही संख्या आता ४९ शाळा इतकी झाली आहे. या ४९ शाळा अनुदानित माध्यमिक शाळा असून शासनाकडून अनुदान प्राप्त होते. तसेच १३८ विना अनुदानित माध्यमिक शाळा आणि ६२ इंग्रजी माध्यमाच्या **MPS** माध्यमिक शाळा विना अनुदानित तत्वावर सुरु आहेत. विना अनुदानित माध्यमिक शाळांना शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. महाराष्ट्र शासन महानगरपालिकेला माध्यमिक शाळांसाठी मान्यता देते व केवळ अनुदानित माध्यमिक शाळांना अनुदान देते. माध्यमिक शाळा संहितेतील तरतूदींनुसार माध्यमिक शाळांचा प्रशासकीय कारभार महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशांनुसार शिक्षणाधिकारी पाहतात.

**कौशल्य विकास केंद्र:-** विज्ञान व तंत्रज्ञानासह कौशल्य विकासावर आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण १९६ माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ९ वी व इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी १२ प्रकारच्या अभ्यासक्रमांसह एकूण २२० कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

**वाचनालये :**

'रुम टू रिड इंडिया' या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने महानगरपालिकेने मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या विविध माध्यमांच्या १९० शाळांमध्ये वाचनालये सुरु केली आहेत. ही योजना प्रभावी ठरल्याने त्याच धर्तीवर महानगरपालिकेच्या २७८ शाळा संकुलांमध्ये महानगरपालिकेने स्वखर्चाने वाचनालये स्थापन करुन कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. या वाचनालयाचा वापर शाळा संकुलातील सर्व माध्यमाचे विद्यार्थी करीत आहेत.

**ई वाचनालय :**

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या २५ माध्यमिक शाळांमध्ये इंटरनेटच्या सुविधेसह ४ संगणकांमार्फत ई-वाचनालये सुरू करण्यात आली आहेत. शिक्षकांना त्याचा लॉगिन, पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यामार्फत इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थांना एकाच क्लिकवर माध्यम व विषय निहाय अभ्यासक्रमांची ८०० संदर्भ पुस्तके मराठी/हिंदी/उर्दू व इंग्रजी या माध्यमात मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याच धर्तीवर महानगरपालिकेच्या ५० प्राथमिक शाळांमध्ये ई वाचनालये सुरू करण्यात येणार आहेत.

**अध्यापक महाविद्यालयांची सुविधा :**

शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षण व शिक्षणोत्तर विकासासाठी प्रशिक्षित आणि कार्यतत्पर शिक्षक आवश्यक असतात आणि त्याकरिता महानगरपालिका दोन उर्दू अध्यापक महाविद्यालये चालविते. एक महाविद्यालय फक्त महिला उमेदवारांसाठी असून दुसरे महाविद्यालय महिला पुरुष उमेदवारांसाठी आहे.

**माध्यमिक अनुदान :**

सर्व महानगरपालिका माध्यमिक शाळा या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या अधिपत्याखाली शासनाच्या नियमानुसार तसेच माध्यमिक शाळा संहितेनुसार चालविल्या जातात. महाराष्ट्र शासनाकडून ४९ माध्यमिक शाळांसाठी अनुज्ञेय खर्चाच्या १०० टक्के अनुदान प्राप्त होते.

**माध्यमिक शालांत परिक्षा निकाल :**

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधून मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेकरीता बसलेल्या १६,१४० विद्यार्थ्यांपैकी १४,७७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुंबई महानगरपालिकेचा एकूण निकाल ९१.५६% लागला आहे. महानगरपालिकेच्या ७९ शाळांचा निकाल १००% लागला आहे.

कु. आयुष जाधव या विद्यार्थ्याने ९७.४०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकवला आहे. मार्च २०२४ च्या माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील एकूण ६३ विद्यार्थांनी ९०% व त्याहून अधिक गुण प्राप्त केले आहेत.

**हिंदूहृदयसम्राट मान.बाळासाहेब ठाकरे चित्रकला स्पर्धा :**

जागतिक किर्तीचे व्यंगचित्रकार हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मान.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त प्रति वर्षाप्रमाणे आयोजित करण्यात येणारी बालचित्रकला स्पर्धा या वर्षी दि.१४ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील इयत्ता १ ली ते १० वीच्या एकूण ८८,७४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धा महानगरपालिकेच्या ४८ उद्यांनामध्ये आयोजित करण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना प्रति वर्षीप्रमाणे रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यासोबत सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रे देखील देण्यात आली.

**खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा:-** महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना खगोलीय घडामोडींचे ज्ञान व त्या विषयातील जिज्ञासू वृत्ती वाढीकरीता तसेच विद्यार्थ्यांमधील निरिक्षण एकाग्रता व आकलन क्षमतेमध्ये वाढ होऊन संशोधन वृत्ती जागरूक होण्याकरीता एकूण ५४ खगोलीय प्रयोगशाळा उभारणी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

**ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) :-** महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी ओढ निर्माण होण्यासाठी 'शहरी शेती' या उपक्रमांतर्गत ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) ही संकल्पना शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते महानगरपालिकेच्या ०२ शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली. सदर उपक्रमाच्या माध्यमातून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीची संकल्पना समजावून भाज्या पिकवण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच या शाळांमध्ये पिकवल्या जाणा-या भाज्यांचा वापर मुलांच्या मध्यान्ह भोजनामध्ये केला जात आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि जिल्हा नियोजन समिती- मुंबई शहर, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त योगदानाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील १०० शाळांमध्ये ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) ही संकल्पना राबविण्यात आलेली आहे.

**शब्दकोश** (Dictionary) :- महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीच्या सुमारे १,७०,००० विद्यार्थ्यांना 'मॉडर्न स्कूल डिक्शनरी' (इंग्रजी-मराठी) तसेच शिक्षकांसाठी प्रत्येक शाळेला एक शब्दकोश याप्रमाणे १,२०० शाळांसाठी 'ऍडव्हान्स डिस्शनरी' (इंग्रजी-मराठी) देण्यात येत आहे.

**व्याकरणाची पुस्तके खरेदी करणे :-** लेखन कौशल्य व अस्खलित संभाषणाकरीता व्याकरणाची गरज लक्षात घेऊन महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी च्या एकूण १९,४०१ विद्यार्थ्यांकरीता माध्यमनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय भाषेच्या व्याकरणाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**शिक्षण विभागाच्या उपक्रमांची चित्रफीतीद्वारे प्रसिध्दी :-** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राबविण्यात येणा-या विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम/प्रकल्प/उपक्रम व स्पर्धा आणि विद्यार्थ्यांची यशस्वी वाटचाल यांच्या माहितीवर आधारीत चित्रफीतीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर चित्रफीत दूरदर्शनसह विविध समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात आलेली आहे.

**माध्यमिक शालांत परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांकरीता आर्थिक सहाय्य योजना :-** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणानुक्रमे प्रथम १०० विद्यार्थ्यांकरीता, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यरत सफाई कर्मचा-यांच्या पाल्यांनी माध्यमिक शालांत परिक्षेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केले असतील अश्या गुणानुक्रमे १०० पाल्यांकरीता मार्च २०२४ पासून खालील आर्थिक सहाय्य योजना लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

**१) योजना क्र.१ :-** भारतातील मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी पर्यंतच्या शिक्षणासाठी प्रतिवर्ष प्रति विद्यार्थी (तांत्रिक/व्यवसायिक/वैद्यकीय इ.अभ्यासक्रमांसाठी जास्तीत जास्त ७ वर्षापर्यंत) रू.२५,०००/- किंवा महाविद्यालयाचे फक्त शैक्षणिक शुल्कांपैकी जे अधिक असेल त्या रक्कमेचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल.

**२) योजना क्र.२ :-** वैद्यकीय व व्यावसायिक शिक्षणाच्या पूर्व परीक्षेच्या तयारी करीता खाजगी शिकवणीसाठी प्रती विद्यार्थी एकदाच रू.५०,०००/- इतके आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल.

**३) योजना क्र.३ :-** राज्य किंवा केंद्र शासनाच्या सरकारी नोकरीसाठी पूर्व परीक्षेच्या तयारी करीता खाजगी शिकवणीसाठी प्रति विद्यार्थी एकदाच रू.५०,०००/- इतके आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल.

**आयसीएसई, सीबीएसई, आयजीसीएई व आयबी शिक्षण मंडळाच्या शाळांची उभारणी:-**

- सन २०२३-२४ मध्ये सीबीएसी मंडळाच्या (१) मुंबई पब्लिक स्कूल आणि कव्हिलेज जिजामाता नगर- एम/पश्चिम, (२) मुंबई पब्लिक स्कूल आशिष तलाव- एम/पूर्व२, (३) मुंबई पब्लिक स्कूल एम.जी.क्रॉस रोड क्र.१- आर/दक्षिण अशा एकूण ३ नवीन शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत.
- सद्यस्थितीत सीबीएसई मंडळाच्या १४ तसेच आयसीएसई, आयजीसीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी ०१ अशा एकूण १७ शाळा सुरु आहेत. या सर्व शाळांमध्ये नर्सरी ते इयत्ता ९ वी पर्यंत एकूण ७,५११ विद्यार्थी (मुले ४,००४ व मुली ३,५०७) शिक्षण घेत आहेत.
- सीबीएसई, आयसीएसई मंडळाच्या शाळांमधील प्रवेशाकरीता पालकांचा उदंड प्रतिसाद पाहता सन २०२४-२५ मध्ये एकूण १२ शाळांमध्ये इयत्ता २ री ते इयत्ता ६ वी पर्यंत नैसर्गिक वाढीच्या वर्गाव्यतिरिक्त प्रत्येक वर्गाची दुसरी तुकडी सुरू करण्यात येईल.
- सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात (१) मुंबई पब्लिक स्कूल शांतीनगर- जी/दक्षिण, (२) मुंबई पब्लिक स्कूल नटवरलाल पारेख कंपाऊंड -एम/पूर्व-१, (३) मुंबई पब्लिक स्कूल मालवणी टाऊनशिप- पी/उत्तर, (४) मुंबई पब्लिक स्कूल वीर सावरकर मार्ग वर्षानगर-एस विभाग या ४ नवीन सीबीएसई शाळा सुरू करण्यात येणार आहेत.

**श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ:-** श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक सोहळ्यास ३५० वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्यसाधून, शिवकालीन पारंपारिक देशी खेळांद्वारे भारतीय संस्कृती जपण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, जिल्हाधिकारी-मुंबई शहर व उपनगर, महाराष्ट्र शासन आणि क्रीडा भारतीयांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचे आयोजन दि.२६.०१.२०२४ ते १९.०२.२०२४ या कालावधीत करण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये पंजा लढविणे, दोरीच्या उड्या, मल्लयुध्द, पावनखिंड दौड (मॅरोथॉन), शरीरसौष्ठव, मल्लखांब, दंड बैठक आदी वैयक्तिक आणि कब्बडी, खो-खो, लंगडी, फुगडी, ढोल-ताशास्पर्धा, लगोरी, विटी-दांडू, लेझीम, रस्सीखेच आदि सांघिक अशा एकूण १६ प्रकारच्या देशी खेळांचा समावेश आहे.

**'इंद्रधनुष्य' (टॅलेंट शो):-** 'इंद्रधनुष्य' या कार्यक्रमाद्वारे महानगरपालिका विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. महानगरपालिका विद्यार्थ्यांच्या संगीत, नृत्य व क्रीडा क्षेत्रातील कलागुणांवर आधारित 'इंद्रधनुष्य-२०२३' हा कार्यक्रम दि.०५ मार्च २०२३ रोजी NSCI डोम, वरळी येथील सभागृहात संपन्न झाला.

**आर्थिक साक्षरता मिशन (Mission Financial Literacy)**:- विद्यार्थ्यांना पैश्यांच्या अचूक नियोजनाचे ज्ञान प्राप्त होण्यासाठी बजेटींग, गुंतवणूक, विमा, कर्ज आणि व्याज अशा दैनंदिन व्यवहारातील संकल्पनेवर आधारीत मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी भाषेतील आर्थिक साक्षरता पुस्तकांचे वितरण बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्युट लिमिटेड यांच्या सहयोगाने महानगरपालिकेच्या शाळांमधील इ.८ वी व इ.९ वी च्या एकूण ४३,००० विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.

**कार्यालयीन दस्तऐवजांचे अंकीय संवर्धन:-** माहिती आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शालेय व कार्यालयीन दस्तऐवज डिजीट्ल स्वरूपात उपलब्ध होण्याकरीता महानगरपालिकेच्या ९३५ प्राथमिक व २१५ माध्यमिक शाळेतील शालेय व कार्यालयीन दस्तऐवजाचे संवर्धन अंकीय स्वरूपात करण्याचे प्रस्तावित आहे.

२.     **खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **महापालिकेच्या शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता /दर्जा सुधारणे** | महानगरपालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता वाढ उंचावण्याच्या दृष्टीने खालील उपक्रम हाती घेतलेले आहेत.<br>**(एक) डिजिटल शाळा तयार करणे-**<br>मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूण ७,९३४ वर्गखोल्यांपैकी मागील वर्षापर्यंत एकूण २,५१४ वर्गखोल्या डिजिटल करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत ५,४२० वर्गखोल्यांपैकी सन २०२३-२४ मध्ये १,३०० वर्गखोल्या LED Interactive Panel द्वारे डिजिटल करण्यात येतील.<br>**(दोन) शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी-**<br>प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत शैक्षणिक गुणवत्ता पूर्ण सक्षमीकरणासाठी खालील कार्यक्रम करण्यात येणार आहेत.<br>**अ)** प्रगत शाळा घोषित करणे- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ठरविलेल्या २५ निकषांनुसार शाळांचे A, B, C, D असे वर्गीकरण करण्यात येणार असून निरिक्षक (शाळा) व प्रशासकीय अधिकारी (शाळा) हे B, C, D या वर्गातील शाळांना A वर्गीकरणामध्ये आणून त्यांचा स्तर उंचाविण्यासाठी कार्यवाही करणार आहेत.<br>**ब)** अतिरिक्त १०० शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यम उपलब्ध करुन देणे.<br>**क)** ट्युटोरियल कक्ष- इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांकरिता इंग्रजी, गणित, विज्ञान विषयांच्या ट्युटोरियलची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. | २३४.४२ | १७९.१८ |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | **ड)** मनपाच्या प्रत्येक शाळेत बालवाडी वर्ग उपलब्ध असण्याच्या दृष्टीने चार माध्यमांच्या बालवाड्या संबंधित माध्यमांच्या प्राथमिक शाळांना जोडण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २०२३-२४ मध्ये अन्य मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थांना नर्सरी वर्गात ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्यात आले आहेत.<br>**(तीन) सॅनेटरी नॅपकीन वेंडींग मशिन्स आणि बर्निंग मशिन्स-**<br>महानगरपालिका शालेय इमारतींमध्ये मुलींसाठी सॅनेटरी नॅपकीन, वेडिंग आणि बर्निंग मशिन्स ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.<br>**(चार) शिष्यवृत्तीसाठी परिक्षा व स्पर्धांचे आयोजन -**<br>इयत्ता ३री, ४थी, ६वी, ७वी, ८वी च्या विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक क्षमता, निरिक्षण क्षमता, संशोधन वृत्ती, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परिक्षेत सुयश प्राप्त व्हावे या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रज्ञाशोध परिक्षा, गणित ऑलिम्पियाड परिक्षा, विज्ञान ऑलिम्पियाड परिक्षेस बसविण्यात येते.<br>**(पाच)** शाळांमध्ये केंद्रीय ध्वनीक्षेपण यंत्र उभारणे.<br>**(सहा)** ७७ "मुंबई पब्लिक स्कूल" सुरू आहेत. तसेच १८ सीबीएसई, आयसीएसई, आयजीएसई व आयबी मंडळाची प्रत्येकी १ अशा एकूण २१ शाळा सुरु आहेत.<br>**(सात)** महानगरपालिका शाळांमधील व्यापक स्वरूपातील देखभाल व सुरक्षितता सेवांचे बळकटीकरण करणे.<br>**(आठ)** महानगरपालिका शाळांमध्ये प्रयोगशाळा, भाषा विकास वर्ग, क्रीडा, आरोग्य इत्यादीसारख्या सुविधांचे बळकटीकरण करणे. | | |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | **(नऊ)** बालकोत्सव, मेळावे, शिबीरे, प्रदर्शन, स्पर्धा, शैक्षणिक सहली व क्रीडा कार्यक्रम यांचे आयोजन.<br>**(दहा)** महानगरपालिका शिक्षकांना प्रशिक्षण.<br>**(अकरा)** पालक-शिक्षक सभेचे आयोजन.<br>**(बारा)** विद्यालंकार आणि आयडीएल या शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त सहभागाने महानगरपालिका विदयार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ३ कनिष्ठ विज्ञान महाविद्यालये सुरू आहेत. या महाविद्यालयातून महानगरपालिका विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण देण्यात येते.<br>**(तेरा)** बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थांना सर्वोत्तम व सर्वांगीण शिक्षण देण्याकरिता महाराष्ट्र बोर्ड सह सीबीएसई, आयसीएसई या बोर्डाचे शिक्षण देण्यात येत आहे.<br>केंब्रिज विदयापीठाशी संलग्नित आय.जी.सी.एस.ई (International General Certificate of Secondary Education) अभ्यासक्रम जगातील शिक्षणाचे दर्जेदार माध्यम असून सदर बोर्डाचा अभ्यासक्रम सुरु केल्याने मुंबईतील विद्यार्थांना शिक्षणाचा उत्तम पर्याय उपलब्ध होईल.<br>**(चौदा)** माध्यमिक शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य:<br>महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून शिक्षण घेणारे विद्यार्थी आर्थिक दुर्बल घटकातील असल्यामुळे गुणवत्ता असूनही महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना वंचित रहावे लागते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक दर्जा सुधारणा, त्यांच्यात गुणवत्ता वाढ व्हावी तसेच शैक्षणिक स्पर्धेत टिकून रहावे यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी शासन | | |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | स्तरावर शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच आर्थिक सहाय्य देण्याबातच्या विविध योजना कार्यान्वित आहेत. त्या आधारे महानगरपालिका माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रथम येणाऱ्या २५ विद्यार्थ्यांकरीता पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. मार्च २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ७४ विद्यार्थांनी याचा लाभ घेतलेला आहे. | | |
| २. | **महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविणे** | **(एक)** महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्राकडे आवड निर्माण होण्यासाठी क्रीडा गणवेशाचा पुरवठा करण्यात येतो.<br>**(दोन)** महानगरपालिका शाळांमधील सर्व विदयार्थ्यांना शालेय गणवेश, बूट, मोजे, स्कूल कीट, वह्या, स्टेशनरी व दप्तर यासह इतर शालेपयोगी शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करण्यात येतो.<br>**(तीन)** महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या मनातील गणित विषयाबद्दलची असलेली भिती दूर करण्याच्या दृष्टीने गणित ऑलिम्पियाड परिक्षा, बौध्दीक क्षमता, निरीक्षण क्षमता, संशोधन वृत्ती, वैज्ञानिक दृष्टीकोन याबद्दल आवड निर्माण करण्यासाठी विज्ञान ऑलिम्पियाड परिक्षा तसेच प्रज्ञाशोध परिक्षेस विद्यार्थ्यांना बसविण्यात येते. तसेच आंतरराष्ट्रीय फायनान्स ऑलिंपियाड परिक्षेकरिता इ.९ वीच्या विद्यार्थांना बसविण्यात आले आहे.<br>**(चार)** दिव्यांग विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता व शिष्यवृत्ती योजना सुरु आहे.<br>**(पाच)** शालेय पोषण आहार योजना (राष्ट्रीय मध्यान्ह भोजन कार्यक्रम).<br>**(सहा)** शालेय आरोग्य कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी व गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष तरतूद. | २०३.८१ | ८७.९२ |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | **(सात)** शालेय विद्यार्थ्यांसाठी शारिरीक शिक्षण, क्रीडा सुविधा आणि सहली.<br>**(आठ)** महानगरपालिका शाळांमध्ये उपस्थित राहण्यासाठी इयत्ता ८वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीनींना प्रोत्साहनपर त्यांच्या खात्यामध्ये रु.५०००/- मुदत ठेव योजने अंतर्गत भारतीय डाक कार्यालयाद्वारे देण्यात येतात.<br>**(नऊ)** शाळेपासून दूर अंतरावर राहणा-या विद्यार्थ्यांना मोफत बस सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.<br>**(दहा)** भाषा प्रयोग शाळा – विद्यार्थ्यांचे भाषा कौशल्य समृध्द करण्यासाठी भाषा प्रयोग शाळेची उभारणी करण्यात आलेली आहे.<br>**(अकरा)** शाळांचे मुल्यमापन – प्रथम टप्प्यात ३० शाळांचा दर्जा आणि गुणवत्ता यांचे मुल्यमापन प्रक्रिया पूर्ण होऊन त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर मूल्यमापन प्रक्रियेमध्ये महानगरपालिकेच्या शाळांमधील चांगल्या बाबी ठळकपणे पुढे आल्या आहेत. त्याचप्रमाणे आवश्यक सुधारणांसाठी योग्य उपाययोजना करणे सुलभ झाले आहे.<br>**(बारा)** समुपदेशन – मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना बालमानसशास्त्रानुसार प्रबोधन व प्रशिक्षण, शैक्षणिक मानसशास्त्रानुसार किशोरवयीन मुलांमध्ये होणारे मानसशास्त्रीय बदलांबाबत मार्गदर्शन व समुपदेशनाकरिता १२ शहर साधन केंद्रासाठी प्रत्येकी ३ याप्रमाणे ३६ समुपदेशकांची निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागविण्यात आले आहेत.<br>**(तेरा)** खेळांची साधने – जीवनातील व्यथा व चिंता विसरावयास लावून मनाला विरंगुळा देण्याचे तसेच शरीर व मन ताजेतवाने करण्याचे काम विविध खेळ करु शकतात. शरीरास भरपूर व्यायाम मिळतो आणि | | |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | त्यामुळे शरीर काटक व बळकट बनते. विद्यार्थ्यांना शाळांमध्ये आकर्षित करण्यासाठी व शाळेत टिकवून ठेवण्याची क्षमता खेळांमध्ये आहे.<br>**(चौदा)** नगर उप अभियंता (शाळा पायाभूत सुविधा कक्ष) यांच्यामार्फत शाळांच्या दुरुस्ती, दर्जोन्नती व पुनर्बांधणीची कामे करत असताना बालवाडी असलेल्या इमारतींमध्ये लहान मुलांसाठी खेळांची साधने उपलब्ध करुन दिली जात आहेत. त्याचा वापर लहान मुले चांगल्या प्रकारे करत आहेत.<br>**(पंधरा)** मुख्याध्यापकांच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण :<br>शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शाळेच्या मुख्याध्यापकांना विशेष अधिकार बहाल करण्यात आले आहेत.<br>वैद्यकीय, प्रसुतीसारख्या कारणांसाठी मोठया रजेवर शिक्षक / शिक्षिका वेळोवेळी जातात. परिणामी, विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात पालिका शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांची ११ ते १७९ दिवसांपर्यंत तात्पुरती नेमणूक करण्याचे अधिकार आता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना देण्यात आलेले आहेत. यामध्ये किमान वेतनानुसार निवृत्त झालेल्या शिक्षकांची तात्पुरत्या १७९ दिवसांपर्यंत नेमणूक करता येणार आहे. नेमणूकीचा ठराव शाळा व्यवस्थापन समितीत मंजूर करून घेतला जाणार आहे.<br>मुख्याध्यापकांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये खालील बाबींचा समावेश असणार आहे. | | |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | • शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी शालेय उपक्रम राबविणे, पालक मेळावे आयोजित करणे, शैक्षणिक शिबिराचे आयोजन करणे.<br>• महानगरपालिका शाळेत ५ दिवसांकरीता डाटा एन्ट्री ऑपरेटरची नेमणूक<br>• विद्यार्थ्यांना विविध परिक्षांमध्ये सहभागी होण्यासाठी विविध परिक्षांचे शुल्क अदा करणे<br>• रद्दी व भंगार सामानाची विल्हेवाट लावणे<br>• रु.१०,००० पर्यंतच्या खर्चांच्या रकमेची देयके प्रमाणित /मंजूर करण्याचे विशेष<br>अधिकार मुख्याध्यापकांना बहाल करण्यात आल्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया अधिक वेगवान होण्यास मदत होणार असून त्याचा शालेय गुणवत्ता वाढीस हातभार लागणार आहे. | | |
| ३. | **प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता खाजगी प्राथमिक शिक्षण संस्थांना सहाय्य करणे** | • खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांना महानगरपालिकेतर्फे सहाय्यक अनुदाने देण्यात येतात. | ४५१.६० | ४४८.५० |
| | | • मुंबई शहरातील ९०० बालवाड्यांना महानगरपालिकेतर्फे सहाय्यक अनुदाने देण्यात येतात. | १५.१८ | १५.१८ |
| | | • मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय आणि एशियाटीक लायब्ररी यांना सहाय्यक अनुदाने देण्यात येतात. | १.५० | ०.८७ |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| ४. | **श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ** | श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक सोहळ्यास ३५० वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून, शिवकालीन पारंपारिक देशी खेळांद्वारे भारतीय संस्कृती जपण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, जिल्हाधिकारी-मुंबई शहर व उपनगर, महाराष्ट्र शासन आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महाकुंभ' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विविध अशा १६ प्रकारच्या देशी खेळांचा समावेश होता. | १.२२ | १.२२ |

### ३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | डिजिटल क्लासरुम | महानगरपालिकेच्या एकूण १,२१४ शाळांतील ३,८१४ वर्गखोल्या LED Interactive Panel द्वारे डिजिटल करण्यात आलेल्या आहेत. |
| २. | महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना मोफत बस सेवा | दि.३१.१०.२०१७ पासून महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते १० वी तील गणवेशधारी विद्यार्थ्यांना निवासस्थानापासून ते शाळेपर्यंत बेस्ट बस मोफत प्रवास सुविधा सुरू करण्यात आली. ज्या मार्गावर सर्वसाधारण बस सेवा उपलब्ध आहे अशा ठिकाणी सर्वसाधारण बसद्वारे व ज्या मार्गावर सर्वसाधारण बस सेवा उपलब्ध नाही अशा ठिकाणी गणवेशधारी विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरी बस सेवा सुरु करण्यात आली आहे. दि.२१ डिसेंबर २०२१ पासून बेस्ट विभागामार्फत नव्याने अद्ययावत करण्यात आलेल्या चलो स्मार्ट कार्डाचे वितरण करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ मध्ये अंदाजे प्राथमिक १४,९०१ विद्यार्थीना व माध्यमिक ४८२३ विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला आहे. |
| ३. | मोफत पाठ्यपुस्तके | माध्यमिक शाळांतील इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात आलेली आहेत. |
| ४. | शैक्षणिक साहित्य व वस्तु यांचा मोफत पुरवठा | प्राथमिक, माध्यमिक, एमपीएस, सीबीएसई व अन्य मंडळाच्या शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, वह्या इ. शालोपयोगी २७ वस्तूंचा पुरवठा करण्यात आलेला आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ५. | महानगरपालिका शाळांच्या स्वच्छता व सुरक्षिततेसह देखभालीसाठी बाह्य सेवांचे आयोजन करणे | शालेय इमारतींची स्वच्छता व परिरक्षण यासाठी तसेच बाह्य उपद्रवी व्यक्तींकडून शालेय आवारांमध्ये होणारा उपद्रव टाळण्यासाठी खाजगी कंत्राटदार, बाह्यसंस्था यांच्याद्वारे हाऊसकिपिंग व सुरक्षा करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून ४६९ शालेय इमारतीत त्याची कार्यवाही सुरु असून सदर कामांकरिता तीन बाह्य कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सन २०२२ ते २०२५ या कालावधीकरिता बाह्य कंत्राटदाराची नियुक्ती सात परिमंडळांमध्ये प्रती चौरस फूट दर निहाय ई-निविदा करुन करण्यात आलेली आहे. |
| ६ | शाळांमध्ये ध्वनिक्षेपण यंत्रणा | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ७२८ प्राथमिक व ४४ माध्यमिक शाळेत ध्वनिक्षेपण यंत्रणा पुरवठा/उभारणी व कार्यान्वयन प्रक्रिया पूर्ण झालेली असून संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी ध्वनीक्षेपण यंत्रणेचा उपयोग करीत आहे. |
| ७. | मुंबई पब्लिक स्कूल | ७७ इंग्रजी माध्यमाच्या "मुंबई पब्लिक स्कूल" सुरू झालेल्या आहेत. |
| ८. | संगणक प्रयोगशाळा अद्ययावतीकरण:- | इयत्ता ५ वी ते १० वी च्या महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येते. महानगरपालिकेच्या १९३ प्राथमिक शाळांमध्ये व ३१ माध्यमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा (91 ITC Lab सह) कार्यरत आहेत.<br><br>सन २०१७-१८ मध्ये शाळा पायाभुत सुविधा कक्षाद्वारे १७९ संगणक प्रयोगशाळा कक्षाकरिता बांधकामाबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. या २२४ संगणक प्रयोगशाळांमध्ये संगणक खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संगणकाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ मध्ये या २२४ संगणक प्रयोग शाळांपैकी ११२ संगणक प्रयोग शाळांचे अद्ययावतीकरण करण्यात आलेले आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | सदर अद्ययावतीकरणामध्ये या प्रयोगशाळांमध्ये अत्याधुनिक साहित्य पुरविण्यात येणार असून अत्यंत सुसज्ज संगणक प्रयोगशाळा तयार करण्यात येणार आहे. |
| ९. | विज्ञान प्रयोगशाळा | महानगरपालिकेच्या ज्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळेची उपलब्धता नाही अशा ८८ शालेय इमारतींमध्ये स्थापत्य स्वरुपाची व विज्ञान प्रयोगशाळेसाठी लागणा-या साहित्याची खरेदीकरिता कंत्राटदारांची नियुक्ती करुन प्राथमिक शाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळांकरिता आवश्यकतेनुसार साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला असून विज्ञान प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. |
| १०. | आधुनिक अग्निशामक उपकरण | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतीमध्ये आपात्कालीन परिस्थितीत आगीपासून संरक्षण मिळावे याकरीता एकूण ३,६५४ जेलफोम फायर स्प्रे (५०० मि.ली.) प्रक्रिया कार्यान्वित आहे. |
| ११. | सहली, बालकोत्सव, मेळावे, शिबीरे इत्यादींचे आयोजन | बालकोत्सव व इतर कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी महानगरपालिकेतर्फे करण्यात येते. |
| १२. | पालक-शिक्षक सभेचे आयोजन | पालक शिक्षक सभेच्या माध्यमातून पालक व शिक्षक यांच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या एकूणच प्रगतीबाबत सुसंवाद साधण्यात येत आहे. |
| १३. | दिव्यांग विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता व शिष्यवृत्ती योजना | सदर योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिव्यांग विद्यार्थ्यांना आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु करण्यात आलेला आहे. सन २०२३-२४ अखेरीस ३,५२९ विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता देण्यात आला आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १४. | शालेय पोषण आहार | महानगरपालिकेच्या शाळांतून इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजवलेले अन्न व आठवड्यातून एकदा पुरक आहार म्हणून सोया शेंगदाणा, राजगिरा/चुरमुरा लाडू, चिक्की, खजूर, खारीक व फळे यासारखे पदार्थ सकस आहार म्हणून देण्यात येतात. तसेच अंडी व केळी देण्यात येतात. |
| १५. | द्विभाषिक शाळा | इंग्रजी भाषेमध्ये शिक्षण देणाऱ्या शाळांची मागणी लक्षात घेता, विद्यार्थ्यांच्या मातृभाषेसोबतच इंग्रजी भाषेचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रथम दर्जाच्या पुस्तकांचा अध्यापन अध्ययन चा वापर करुन ५८ शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून द्विभाषिक वर्ग सुरु केले आहेत. |
| १६. | शालेय आरोग्य कार्यक्रम | १) राष्ट्रीय लोहयुक्त गोळ्या प्रकल्प:- शालेय मुलांमधील रक्तक्षयाचा प्रतिबंध करण्यासाठी नोव्हेंबर २०१७ पासून राष्ट्रीय लोहयुक्त गोळ्या उपक्रम (NIPI) हा कार्यक्रम सुरु करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत इयत्ता १ ली ते १० वीच्या सर्व मुलांना आठवड्यातून एकदा लोहगोळी शिक्षकांच्या निरिक्षणाखाली शाळेमध्ये देण्यात येते.<br>२) राष्ट्रीय जंतनाशक दिन :- दि.१३.०२.२०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहिम सर्व शाळांमध्ये राबविण्यात आली. या वेळी बृहन्मुंबई महानगरपालिका व अनुदानित शाळांमधील ३,७६,७९९ विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळी देण्यात आली.<br>३) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम: डिसेंबर २०१७ पासून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम महानगरपालिका शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ ला ३२,८८७ आणि ऑक्टोबर २०२३ |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | ते मार्च २०२४ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील ४,१८,६८० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. |
| १७. | शालेय विद्यार्थ्यांनीसाठी उपस्थिती भत्ता | महानगरपालिका शाळांमध्ये उपस्थित राहण्यासाठी इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनीना प्रोत्साहनपर रू.५,०००/- इतकी मुदत ठेवीची प्रक्रिया करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये ८ वी च्या एकूण १३,९०६ मुलींना मुदत ठेव योजनेतंर्गत उपस्थिती प्रोत्साहन भत्ता भारतीय डाक विभाग यांच्याद्वारे देण्यात आला आहे. |
| १८. | प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उदिष्ट साध्य करण्याकरीता खाजगी प्राथमिक शिक्षण संस्थांना सहाय्य करणे. | ३८७ खाजगी प्राथमिक शाळांना महानगरपालिकेतर्फे सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे. खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांच्या संस्थांना द्यावयाच्या मासिक वेतन अनुदानाचे दावे हाती तयार करण्याच्या प्रचलित कार्यपध्दती मधील त्रुटींमुळे शैक्षणिक संस्थांना अनुदान मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी खाजगी अनुदान प्राप्त प्राथमिक शाळांच्या मासिक वेतन अनुदान दाव्याचे अधिदान संगणक प्रणालीमार्फत सुरू केले आहे. सन २००७-०८ पासून खाजगी/बाह्य संस्थांद्वारे चालविण्यात येणा-या बालवाड्यांना अनुदान देण्यास प्रारंभ केला आहे. त्या व्यतिरिक्त नव्याने बालवाडी वर्ग सुरू करण्यास मंजूरी प्राप्त झालेली असून त्यानुसार बालवाडी वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. सन २०२३-२४ मध्ये एकूण १,०३४ बालवाडी वर्गातील ४०,४९९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अशा बालवाड्यांतील मुले ही पुढे महानगरपालिका शाळेमध्ये दाखल होणार असल्याने पर्यायाने महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थी संख्येत वाढ होत आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १९. | शालेय पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती करणे. | अ) शालेय पायाभूत सोयी सुविधांचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका शालेय इमारतींच्या सर्वसाधारण स्थापत्य दुरुस्त्या, विद्युत जोडण्या, विद्युत उपकरणाची दुरुस्ती इ. कामासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येतात.<br><br>ब) महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या एकूण ४७९ शालेय इमारती आहेत. सन २०२३-२४ वर्षातील पुनर्बांधणी व नवीन बांधकामाची ०८ कामे व सन २०२४-२५ वर्षामध्ये दि.३१.१०.२०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली पुनर्बांधणी व नवीन बांधकामाकरीता ०७ कामे अशी एकूण १५ कामे प्रगतीपथावर होती. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ०५ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत आणि १० कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.<br><br>सन २०२३-२४ वर्षातील मोठ्या दुरुस्तीची व दर्जोन्नतीची ४४ कामे व सन २०२४-२५ या वर्षामध्ये दि.३१.१०.२०२४ पर्यंत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आलेली दुरुस्तीची व दर्जोन्नतीची २२ कामे अशी एकूण ६६ कामे प्रगतीपथावर होती. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ४० कामे पूर्ण करण्यात येणार आहेत आणि २६ कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील.<br><br>अशाप्रकारे मार्च २०२५ पर्यंत दुरुस्ती व दर्जोन्नती व पुनर्बांधणीची एकूण ४५ कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित ३६ कामे त्यापुढील वर्षामध्ये पूर्ण करण्यात येणार आहेत.<br>**पुनर्बांधणी व नवीन बांधकामे**:-<br>सन २०२३-२४ या वर्षातील पुनर्बांधणी व नवीन बांधकामाची ०८ कामे व सन २०२४-२५ या वर्षामध्ये दि.३१.१०.२०२४ पर्यंत ठेकेदारांना |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | कार्यादेश देण्यात आलेली पुनर्बांधणी व नवीन बांधकामाकरीता ०७ कामे अशी एकूण १५ कामे प्रगतीपथावर होती. त्यापैकी मार्च २०२५ पर्यंत एकूण ०५ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत आणि १० कामे पुढील आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ३२०.०० | २११.३३ | ३३०.१९ |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ३०२७.१३ | २५५९.२४ | ३१६७.६३ |
| एकूण | ३३४७.१३ | २७७०.५७ | ३४९७.८२ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# घनकचरा व्यवस्थापन /परिवहन खाते

१. **प्रस्तावना** :

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम ६१ (सी) अन्वये साफसफाई सेवा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अत्यावश्यक कर्तव्याचा एक भाग आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३६५, ३६८ व ३६९ मध्ये या संबंधातील कर्तव्ये आणि कार्ये यांचा अंतर्भाव आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३८५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत मृत पावलेल्या जनावरांची विल्हेवाट लावण्याची सेवा घनकचरा व्यवस्थापन खाते पुरविते. तसेच समुद्र किनाऱ्यालगतची साफसफाई, झोपडपट्टी विभाग, घोषित खाजगी गलिच्छ वस्त्या या ठिकाणी साफसफाई सेवा या खात्यातर्फे दररोज पुरविल्या जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मागील वर्षामध्ये स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा, माहिती-शिक्षण-संवाद अंतर्गत कार्यक्रम, क्षमता बांधणी अशा सर्व स्तरावर कामे केली असल्याने दृश्य बदल निदर्शनास आले. तसेच घरगुती कचरा संकलन, कचरा वर्गीकरण, मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्थातर्फे कचऱ्याची उगमस्थानी विल्हेवाट, प्लास्टिक बंदी, शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट इत्यादी वर लक्ष केंद्रीत केले.

मुंबईचे जागतिक दर्जाच्या शहरामध्ये रुपांतर करण्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या शहराच्या स्वच्छतेची पातळी आंतरराष्ट्रीय दर्जाची असणे अत्यावश्यक असल्याने मुंबई महानगर स्वच्छ राखण्यासाठी जोमाने प्रयत्न करीत असताना घन कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रीय आणि पर्यावरणीय दृष्टीकोनातून योग्य प्रकारे लावण्यासंबंधी भारत सरकार आणि सर्वोच्च न्यायालये यांनी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करणे अत्यावश्यक असल्याने खालील उद्दीष्टये साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

- उगमस्थानी कचऱ्याचे अलगीकरण आणि प्रक्रिया करणे ही योजना राबवून कचऱ्याचे निर्मूलन करणे.
- घन कच-याची वाहतूक बंदिस्त वाहनातून आणि कॉम्पॅक्टर्समधून करणे आणि वर्गीकरण केलेल्या कच-याचे नियमितपणे पूर्णत: वेगळे संकलन करणे.
- ओला /सुका आणि घरगुती कच-याचे उगमस्थानी वर्गीकरण करण्याबाबत नागरिकांना जागरूक करणे आणि कचरा निर्माण करणा-या लहान व मोठ्या संस्थामध्ये विकेंद्रीय / उगमस्थळी कचरा प्रक्रियेस प्रोत्साहन देणे.

- 'घन कचरा व्यवस्थापन दृष्टीक्षेप २०३०' या Flagship programme अंतर्गत, विकेंद्रीय कचरा व्यवस्थापनाच्या पायाभूत सुविधांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे.
- घरोघरी शाश्वत कचरा वर्गीकरणासाठी नागरीकांशी संवाद साधणे आणि जागरूकता निर्माण करणे.
- निवडक प्रमुख रस्ते आणि विभागांचे शून्य कचरा मोहिम, डेब्रीजसाठी स्वतंत्र व्यवस्था व मॉपिंगची व्यवस्था करणे, रस्त्यांवरील धुळ साफ करण्यासाठी यांत्रिकी /ई -पॉवर स्वीपरचा वापर करणे.
- पर्यटन स्थळांच्या स्वच्छतेच्या सेवांची दर्जोन्नती करणे.
- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिसरातील तसेच खाजगी परिसरातील स्वच्छतेसाठी अशासकीय संस्थामार्फत सेवा पुरविणे.
- घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कामगारांना पुरविलेल्या सेवानिवासस्थानांचे बांधकाम/पुनर्विकास/नूतनीकरण करणे.
- कागद, कपटे, तिकीटे व खाद्यपदार्थाचे वेष्टन रस्त्यावर न फेकता जवळील "लिटरबिन" मध्ये संकलित व्हावे,या करिता वर्दळीच्या ठिकाणी व बस थांब्यावर आवश्यक प्रमाणात "लिटरबिन" चा पुरवठा करणे.
- ''पैसे भरा व वापरा'' या योजनेअंतर्गत अस्तित्वात असलेल्या व जेथे शक्य असेल तेथे विभागीय स्तरावर वैयक्तिक शौचालयाची सोय करणे.
- पूर्व आणि पश्चिम द्रूतगती महामार्गावर सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी संस्थांची नेमणूक करण्यात आलेली आहे.
- कचरापेटी मुक्त मुंबई करणे व स्वच्छते संबंधी जनतेमध्ये जागृती निर्माण करणे याद्वारे शहर कचरामुक्त ठेवणे.
- साफसफाई खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविणे.

२.	**खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **कचऱ्याचे घरगुती पातळीवर वर्गीकरण आणि 'घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे' या योजनेचा विस्तार** | (एक) घरोघरी जाऊन कचरा संकलित करण्याच्या पध्दतीत सध्याच्या ९५ टक्क्यांवरुन १०० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचे प्रस्तावित आहे.<br>(दोन) कचरा गोळा करणे आणि त्याची वाहतूक करणे यासाठी सर्वसमावेशक परिमंडळ निहाय कंत्राटे<br>(तीन) कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्याच्या योजनेची ठोस अंमलबजावणी<br>(चार) प्रत्येक विभागात सुका कचरा केंद्रासाठी शेड बांधणे | ७४०.०० | ७०१.१३ |
| २. | **स्वच्छता सेवा पुरविली न जाणारे परिसर स्वच्छता सेवेखाली आणणे** | सर्व गलिच्छ वस्त्यांमध्ये ''स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान'' राबविणे | ८५.०० | ८०.२३ |
| ३. | **स्वच्छता व साफसफाई प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे** | (एक) ''रस्ते स्वच्छता योजना'' अंमलबजावणी | ४५.०० | ४१.३९ |
| | | (दोन) यांत्रिकी झाडूद्वारे प्रमुख रस्त्यांची साफसफाई करणे | २७.५० | २५.३७ |
| | | (तीन) साफसफाई, समुद्र किनारे स्वच्छ करणे, कचरा गोळा करणे, वाहून नेणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, इ. सेवा पुरविणे. | १८.०० | १७.४० |

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| ४. | **कचरापेटी मुक्त मुंबई करणे व स्वच्छतेसंबंधी जनतेमध्ये जागृती निर्माण करणे याद्वारे शहर कचरामुक्त ठेवणे** | (एक) शून्य कचरा जनजागृती मोहिम | ८.५० | ६.१० |
| | | (दोन) स्वच्छ धारावी, निरोगी धारावी उपक्रम | १.०० | ⅄ १.२१ |
| | | (तीन) कचऱ्याचे वर्गीकरण आणि पुनर्चक्रांकन जनजागृती कार्यक्रम | ०.५० | --- |
| ५. | **वाहन ताफ्यात सुधारणा व बंदिस्त वाहनांमधून कचऱ्याची अधिक कार्यक्षमतेने वाहतूक करणे** | (एक) कचऱ्याची वाहतूक बंदिस्त वाहनातून, म्हणजेच मोठे कॉम्पॅक्टर्स व छोटे कॉम्पॅक्टर्स आणि लहान वाहनांतून करणे | ३.७५ | ★ ५.२५ |
| | | (दोन) परिवहन विभागातील जुनी वाहने बदलून नवीन वाहनांची खरेदी करणे | ९.१८ | ✦ ९.५१ |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रु.१.७५ कोटी

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.५.२६ कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१०.५० कोटी

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| ६. | **क्षेपणभूमीवर शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे** | (एक) शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणभूमीतील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी (कचऱ्याचे रिसायकलींग आणि तत्सम कामे) विद्यमान आणि नवीन क्षेपणभूमी, भरावभूमीचे बांधकाम व पायाभूत सुविधेसह विकास करणे तसेच क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करणे | ५.९० | ०.३९ |
| | | दोन) अत्याधुनिक कचरा स्थानांतरण केंद्राचे बांधकाम / विकास | ११.३० | --- |
| ७. | **साफसफाई खात्यातील कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी उपाययोजना** | एक) घनकचरा व्यवस्थापन खात्यामधील कामगार वर्गासाठी कल्याणकारी योजना | २.५० | १.५६ |
| | | दोन) साफसफाई खात्यातील कर्मचाऱ्यांकरिता बक्षिसे / वैद्यकीय मदत | ०.९५ | --- |
| ८. | **घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कामगारांच्या सेवा निवासस्थानांचे बांधकाम /पुनर्विकास / नूतनीकरण** | - घन कचरा व्यवस्थापन कर्मचारी निवासस्थानांचे व्यापक नूतनीकरण व पुनर्रचना / पुनर्विकास | ११२५.०० | ३८०.२५ |
| ९ | **सार्वजनिक सेवासुविधा पुरविणे** | - पर्यटन स्थळांच्या स्वच्छतेच्या सेवांची दर्जोन्नती करणे | १.२० | ०.८० |

## ३.	सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | 'उगमस्थानी कचऱ्याचे विलगीकरण आणि प्रक्रिया करणे' या योजनेचा विस्तार करणे | उगमस्थळी कचरा वर्गीकरणास प्रोत्साहन दिल्याने, सन २०२३-२४ मध्ये कचऱ्याच्या वाहतुकीने ६००० ते ६४०० टन प्रतिदिन इतकी पातळी गाठली आहे. तसेच मुंबईत निर्माण होणाऱ्या घरगुती घातक कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने ११ ठिकाणी ४ टन प्रतिदिन क्षमतेच्या घरगुती कचरा प्रक्रिया केंद्राची उभारणी करणे, तसेच देवनार क्षेपणभूमी येथे ६०० टन प्रतिदिन क्षमतेच्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे (टप्पा-१) बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच ओल्या वर्गीकृत कच-यापासून जैव इंधन वायू प्रकल्प राबविण्याकरीता महानगर गॅस कंपनी सोबत सामंजस्य करार केला आहे. |
| २. | 'माझी मुंबई - स्वच्छ, मुंबई' अंतर्गत शहर स्वच्छ व निरोगी राखणे | माझी मुंबई - स्वच्छ, मुंबई अंतर्गत डिसेंबर – २०२३ पासून "सखोल स्वच्छता अभियान" (Deep Clean Drive) मोहीम राबवून लोक सहभागाद्वारे शहर स्वच्छ व निरोगी ठेवण्याकरिता विशेष प्रयत्न केले गले. तसेच स्वच्छ, भारतमिशन २.० नागरी या अभियानांतर्गत नमूद उद्दिष्टे साध्य करण्याकरिता विविध उपक्रम हाती घेण्यात आले. तसेच देवनार स्थित क्षेपणभूमी येथे जमा झालेला कचरा उकरून व प्रक्रिया करून जागेची पुन:प्राप्ती करण्याचा प्रकल्प टप्प्याने राबविण्यासाठीचे प्रयत्न चालू आहेत. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
| --- | --- | --- |
| ३. | ‘स्वच्छ भारत अभियान’ अंतर्गत मुंबई शहर हागणदारी मुक्त करणे | बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहर ‘हागणदारीमुक्त’ झाल्याचे घोषित केले आहे. उघडयावर शौचास बसणाऱ्या व्यक्तींना प्रतिरोध करणे व गरज पडल्यास दंड आकारणे याकरिता क्लिन-अप मार्शल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवाही लोकसंख्येकरिता सार्वजनिक प्रसाधनगृहांची कमतरता असल्याने महामार्ग ज्या विभागातून जातो त्या विभागात तसेच वर्दळीच्या ठिकाणी आधुनिक सोयीयुक्त प्रसाधनगृह उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. |
| ४. | कचरापेटी मुक्त मुंबई करणे व स्वच्छतेसंबंधी जनतेमध्ये जागृती निर्माण करणे | कचरा संकलन करण्याची ठिकाणे आणि कचरा पेटी मुक्त मुंबई करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. घरोघरी जाऊन कचरा संकलित करण्याची योजना ९९% पर्यंत राबविली गेली आहे. केंद्र शासनाच्या शहरी मंत्रालयाने विकसित केलेल्या ‘स्वच्छता ॲप व मुख्यमंत्री स्वच्छता हेल्पलाईन द्वारे’ नागरीक अस्वच्छता विषयक समस्या मांडण्यासाठी आणि या समस्यांचे १२ तासांच्या निर्धारित कालावधीत निराकरण करून घेण्यासाठी वापर होत आहे. |
| ५. | ‘आश्रय योजना अंतर्गत’ सफाई कामगारांच्या निवासस्थानांच्या पुनर्विकासाचे काम करणे तसेच संक्रमण शिबिराचे बांधकाम करणे | स्वच्छता कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांचे निवासस्थान त्यांच्या कार्यक्षेत्राजवळ असणे आवश्यक असल्याने, ३०० चौ.फूट चटईक्षेत्र असलेल्या १०,३५१ व ६०० चौ.फूट चटईक्षेत्र असलेल्या ८३२ सदनिकांचे बांधकाम करण्यात येत आहे. ९ ठिकाणी पुनर्विकासाची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ठिकाणी भूमीपूजन झाले आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ६. | ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करणे | कचऱ्याचे वर्गीकरण करण्याला अत्यंत सक्रियपणे प्रोत्साहन दिले जात असल्याने सुका/ओला कचरा वेगवेगळा ठेवण्याकरिता स्वतंत्र कप्पे असतील अशी कचरा संकलन करणाऱ्या तसेच स्वंतत्रपणी साठवण सुविधा असलेल्या नवीन वाहनांची खरेदी करण्यात येईल आणि जेथे शक्य असेल तेथे हा उद्देश साध्य करण्यासाठी सध्याच्या वाहनांची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी 'माय वेस्ट' मोबाईल ॲप, कचरा वाहतुकीसाठी वाहन मागोवा आणि देखरेख व्यवस्थापन प्रणाली आणि निष्कासनाच्या ठिकाणी Weigh Bridge Management System सारख्या प्रणालीचा वापर करण्यात येत आहे, त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया अधिक पारदर्शक तसेच नियंत्रित करणे सोईचे होईल. |
| ७. | सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेची गुणवत्ता वाढविणे | बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व शौचालयामध्ये वीज व पाणी पुरवठा उपलब्ध करण्याबाबतचा कार्यक्रम राबविला असून त्याद्वारे नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित सुविधा प्राप्त होत आहे. तसेच म्हाडा प्राधिकरणाने बांधलेल्या शौचालयांची दुरुस्ती करून महानगरपालिकेकडे वर्ग करण्याचे काम चालू आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध ठिकाणी सामुहिक शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकीन व्हेंडींग मशिन आणि इन्सिनरेटर बसविण्याचे काम हाती घेतले आहे. |
| ८. | 'क्लिन-अप-मार्शल च्या सेवा उपयोगात आणून संपूर्ण मुंबईमध्ये बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधी, २००६ ची अंमलबजावणी करणे. | 'बृहन्मुंबई स्वच्छता आरोग्य उपविधी – २००६' ची अंमलबजावणी करण्याकरिता जुलै, २०१६ पासून 'क्लिन-अप-मार्शल' योजना सुरु करण्यात आली आहे. २०२३-२४ च्या अखेरपर्यंत उपद्रव शोधकांनी वसूल केलेला दंड अंतर्गत एकूण रु.१.६३ कोटी इतका महसूल गोळा करण्यात आला आहे. |

४.	सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| (अ) भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | | | |
| घनकचरा व्यवस्थापन | १५०१.९० | ७६०.७५ | १४५३.०० |
| परिवहन खाते | २९.०४ | ६०.९२ | २९.६० |
| एकूण (अ) | १५३०.९४ | ८२१.६७ | १४८२.६० |
| (ब) महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | | | |
| घनकचरा व्यवस्थापन | २९९७.८४ | २७८१.१० | ३३१२.८५ |
| परिवहन खाते | ४६०.१५ | ४०८.०१ | ४६८.३९ |
| एकूण (ब) | ३४५७.९९ | ३१८९.११ | ३७८१.२४ |
| एकूण अर्थसंकल्पीय तरतूद (अ + ब) | ४९८८.९३ | ४०१०.७८ | ५२६३.८४ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# उद्यान खाते

१.    **प्रस्तावना** :

उद्यान खात्यातर्फे मुंबईच्या नागरिकांना उद्याने व मनोरंजनपर सुविधा पुरविण्यात येतात. उद्याने व मोकळ्या जागा या मुंबईसारख्या दाट लोकवस्ती असलेल्या शहरांची फुफ्फुसे आहेत. शहराच्या हद्दीचा विस्तार व वाढत्या लोकसंख्येच्या गरजा तसेच वेगाने होणा-या औद्योगिकीकरणामुळे प्रदुषणाचा वाढता धोका लक्षात घेता या खात्यानेही आपल्या कार्याचा विस्तार केला आहे.

**वृक्ष प्राधिकरण विभाग :**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ च्या प्रकरण सहा मधील कलम १६ अन्वये आपल्या अखत्यारितील झाडांचे जतन करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक प्राधिकरणाची आहे, म्हणून महानगरपालिकेने वृक्षप्राधिकरणाची नेमणूक केलेली आहे. या वृक्षप्राधिकरणाचे उत्पन्न महानगरपालिकेच्या अगोदरच्या वर्षातील सर्वसाधारण कराच्या वसुलीच्या ०.५ टक्के अंशदान हे आहे.

मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असताना तिचे सौंदर्यात्मक आवाहन वाढविण्याची गरज आहे. त्यादृष्टीने शहराचे सौंदर्य वाढविण्याच्या कामांबरोबरच मुंबईचा कायापालट करुन देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करणारी विविध कामे हाती घेणे आवश्यक आहे.

मुंबईच्या हरित स्वरुपात वाढ व्हावी या दृष्टीकोनातून वृक्षप्राधिकरणांतर्गत पुढील उपक्रम हाती घेण्यात आले होते.

- रस्त्यांच्या कडेला व इतर मोकळ्या जागांवर वृक्षारोपण करणे. तसेच महानगरपालिकेच्या इतर खात्यांकडे उपलब्ध असणा-या मोकळ्या जागांवर देखील वृक्ष लागवड करणे.
- मानवी कल्याणाच्या दृष्टीने झाडे व वनस्पती यांच्या मानवी जीवनातील महत्त्वाबद्दल समाजामध्ये जागरुकता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिका व वृक्षप्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने झाडे, फुले, फळे, भाज्या इ.चे प्रदर्शन भरविणे तसेच ‘उद्यान विद्या’ विषयक कार्यशाळेचे आयोजन करणे.
- हरित क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिका दरवर्षी वृक्षारोपणाची मोहिम हाती घेते. तथापि मुंबईतील जागेच्या कमतरतेमुळे अधिकचे वृक्षारोपणास मर्यादा येत आहे. यास्तव कमीत कमी जागेत जास्तीत जास्त वृक्षारोपण करून कमीत कमी वेळेत शहरी वने तयार करण्याचा हेतू साध्य करण्याकरिता मियावाकी पध्दतीने वृक्षांची लागवड करणे.

मुंबई शहरातील बागा आणि उद्यानांचा विकास तसेच शहरामधील हरित क्षेत्र /हिरवळ यांचे प्रमाण वाढविणे आणि शहराच्या सुशोभिकरणात अधिकाधिक भर घालणे याकरीता उद्यान विभागामार्फत विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

**वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय**

सन १८६२ मध्ये स्थापन झालेले वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालय हे देशातील जुन्या प्राणिसंग्रहालयांपैकी एक असून या उद्यान व प्राणिसंग्रहालयास 'पुरातन वास्तू श्रेणी २ (ब)' म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर प्राणिसंग्रहालयाचे वर्गीकरण ''मध्यम प्राणिसंग्रहालय'' असे करण्यात आले आहे.

वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाचे आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने, केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी दि.१३.०२.२०१९ रोजी अंतिम मंजूरी प्रदान केलेल्या बृहत (मांडणी) आराखडयानुसार प्रकल्पाची विकासकामे करण्यात येत आहेत. वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयातील आधुनिकीकरणाच्या विकास कामांमुळे प्राणिसंग्रहालयाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत एकूण ३०,१६,८२७ इतक्या पर्यटकांनी प्राणिसंग्रहालयास भेट दिली असून महानगरपालिकेला रू.११,९८,३७,१७१/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.

**क्रीडा व मनोरंजन**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरीकांकरीता मनोरंजन तसेच करमणूकीची सुविधा उपलब्ध व्हावी या हेतूने जलतरण तलाव, नाट्यगृहे, वस्तूसंग्रहालये, स्मृतीदालने इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशा सुविधा उपलब्ध करून देत असताना सदर सुविधांकडे उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहण्यात येत नाही तर नागरीकांना जास्तीत जास्त चांगल्या दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा उद्देश असतो.

२. **खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **मुंबईमधील हरित पट्ट्यांचा विस्तार** | शहर व उपनगरातील विद्यमान वृक्षांचे जतन आणि नवीन वृक्षांची लागवड आणि त्यांची निगा | ७७.२८ | ४७.२२ |
| २. | **विद्यमान उद्यानांचा विकास आणि नियोजनबध्द उद्याने आणि हरित जागांचा विकास** | (एक) डी विभागातील ऑगस्ट क्रांती मैदानाचा विकास | ७.०० | ६.५४ |
| | | (दोन) विद्यमान उद्याने/मनोरंजन मैदाने /बाल मैदाने इत्यादींची दर्जोन्नती करणे आणि नवीन उद्याने /मनोरंजन मैदाने / थीम उद्याने/ बाल मैदाने इत्यादी विकसित करणे | २१.०० | ★ ४३.६० |
| | | (तीन) नवीन उद्याने / मनोरंजन उद्यानांचा विकास | १.०० | ०.२९ |
| | | (चार) मुंबई शहर आणि उपनगरात विविध मनोरंजन उद्याने, खेळाची मैदाने, उद्यान भूखंडाचा विकास करणे. | ५९.१५ | ३९.८० |
| ३. | **मध्यवर्ती मैदाने, वाहतूक बेटांचे सुशोभिकरण** | शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरातील मध्यवर्ती मैदाने, वाहतूक बेटांचे सुशोभिकरण | २.०० | ०.९६ |
| ४. | **शहरातील प्राणी संग्रहालयाचे आधुनिकीकरण** | वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालय (Zoo) यांचे आधुनिकीकरण आणि दर्जोन्नती | १३३.९३ | १३.९० |
| ५. | **क्रीडांगणांची दर्जोन्नती** | खुल्या जागा व्यवस्थापन योजनेतंर्गत खेळाच्या मैदानांची दर्जोन्नती | ३.०० | ✦४.१३ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.४८.३३ कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.५.८० कोटी

३. सन २०२३-२०२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | मुंबईमधील हरित पट्ट्यांचा विस्तार | महानगरपालिकेच्या विविध पदपथावर व मोकळया जागेत असलेल्या झाडांचे परिरक्षण करण्यात आले. मुंबई शहरात जास्तीत जास्त झाडे लावण्यासाठी विविध शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था, कारखाने, औद्योगिक संस्था, रुग्णालये, शासकीय-निमशासकीय संस्था व मुंबईतील नागरिकांना त्यांच्या आवारात झाडे लावण्यासाठी महानगरपालिकेतर्फे रोपे पुरविण्यात आली. |
| २. | क्रीडांगणाची दर्जोन्नती | १) सीटीएस नं.१६/१ ते २४ आणि १७, चकाला, अंधेरी (पू) येथील खेळाचे मैदान<br>२) स्वातंत्र्यवीर सावरकर क्रीडांगण, जानू कंपाऊंड, मालाड (पू), मुंबई - ४०००९७<br>३) स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प) येथील मैदान<br>४) न.भू.क्र.११अ/३, संघर्ष नगर, चांदिवली, कुर्ला (प) येथील मैदान<br>५) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर मैदान, कुर्ला (पू)<br>६) न.भू.क्र.१(भाग), घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथील खेळाचे मैदान<br>७) श्रीमान बाळासाहेब ठाकरे खेळाचे मैदान, देवनार म्यनिसिपल कॉलनी, गोवंडी<br>८) महात्मा गांधी मैदान, रोड नं.१५, चेंबूर (पू)<br>९) न.भू.क्र.६१२/बी, आतुर पार्क जवळ, चेंबूर येथील खेळाचे मैदान<br>१०) अटल बिहारी वाजपेयी खेळाचे मैदान, कोकण नगर, भांडुप (प)<br>११) माँसाहेब मीनाताई ठाकरे खेळाचे मैदान, भांडुप (प)<br>१२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगण, दिन दयाळ उपाध्याय मार्ग, मुलुंड (प), मुंबई - ४०००८०<br>१३) न.भू.क्र.२६ (भाग), योगी हिल, मुलुंड (प), मुंबई -४०० ०८० येथील खेळाचे मैदान |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ३. | आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे रोपवाटिकांचा विकास | रोपवाटिकांचा विकास करताना जास्तीत जास्त आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होईल याची काळजी घेण्यात आली आहे. तसेच नागरिकांना विविध वृक्षांची रोपे विभागामध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून विभाग कार्यालयातून रोपवाटिका उपलब्ध करून दिल्या आहेत. |
| ४. | मनोरंजन सुविधांसह लहान मुलांसाठीच्या उद्यानांचा विकास | लहान मुलांकरिता आकर्षक खेळाची साधने बसवून विविध उद्यानांचा विकास करण्यात आला. |
| ५. | विद्यमान  उद्यानांचा विकास आणि सुंदर नियोजनबध्द  उद्याने आणि हरित जागांचा विकास | १) नेहरू उद्यान, मादाम कामा रोड, नरिमन पॉईंट<br>२) बेग मोहम्मद पार्क, नारायण धुरू मार्ग, मुंबई - ४०००० ३<br>३) साथी शांताराम तावडे मनोरंजन मैदान, ताडदेव डिव्हिजन, मुंबई - ४०००३४<br>४) सेठ तुलसीदास किलाचंद उद्यान, मुंबई - ४००००७<br>५) भाऊसाहेब हिरे उद्यान, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०००३४<br>६) जयसिंगभाई सोलंकी उद्यान, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००३४<br>७) स्वामी समर्थ उद्यान, गिरगांव, मुंबई - ४००००४<br>८) पाडुरंग शास्त्री आठवले मनोरंजन मैदान, ताडदेव, मुंबई -४०००३४<br>९) लोकमान्य टिळक उद्यान, गिरगांव, मुंबई-४००००४<br>१०) न्यु स्कॉयलार्क इमारतीजवळील उद्यान, भुलाभाई देसाई मार्ग, मलबार हिल, मुंबई - ४०००२६<br>११) कलानगर उड्डाणपुलाखालील ग्रीन नाला, खेरवाडी, वांद्रे (पूर्व) येथील मोकळ्या जागेवरील स्ट्रीप्स गार्डन<br>१२) पद्मविभूषण शिवकुमार शर्मा उद्यान, वांद्रे (प), मुंबई -४०००५० |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | १३) सीटीएस नं.५५/७, महेश्वरी नगर प्लॉट, कोंडिविटा, अंधेरी (पू) येथील उद्यान<br>१४) संत निरंकारी बाबा हरदेव सिंगजी महाराज उद्यान, अंधेरी (पू), मुंबई - ४०००९९<br>१५) शहीद हेमंत करकरे उद्यान, मजास गाव, पूनमनगर, जोगेश्वरी (पू)<br>१६) छत्रपती राजाराम महाराज उद्यान, जोगेश्वरी (पू)<br>१७) सीटीएस नं.२७३,२७४ , कोंडिविटा गाव, अंधेरी (पू) येथील मनोरंजन मैदान<br>१८) पंडीत चंद्रभान शर्मा मनोरंजन मैदान, पवई<br>१९) जय जवान उद्यान, कुर्ला (प)<br>२०) ना.ग. आचार्य उद्यान, चेंबूर (पू)<br>२१) संत गाडगे महाराज उद्यान, एलबीएस मार्ग, घाटकोपर (प)<br>२२) जॉगर्स पार्क, एलबीएस मार्ग, घाटकोपर (प)<br>२३) क्रांतीवीर पंडित श्यामजी कृष्ण वर्मा मनोरंजन मैदान, महिंद्रा पार्क, घाटकोपर (प)<br>२४) प्रबोधनकार ठाकरे मनोरंजन मैदान, विक्रोळी पार्क साईट, विक्रोळी (प)<br>२५) श्रीमान बाळासाहेब ठाकरे मनोरंजन मैदान, भांडुप (प)<br>२६) माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख पार्क, आकुर्ली गाव, कांदिवली (पू), मुंबई -४००१०१<br>२७) श्री.गांवदेवी मनोरंजन मैदान, दहिसर गावठाण, दहिसर (प) |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ६. | मुंबई येथील भायखळा स्थित वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने विविध विकासकामे करणे. | मगर व सुसर या प्रदर्शनीचे बांधकाम पूर्ण झाले असून प्रदर्शनी पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे. |
| ७. | जलतरण तलाव सभासदांनी नव्याने विकसित केलेल्या ऑनलाईन जलतरण तलाव सभासदत्व प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा. | नव्याने विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीचा नागरिकांमार्फत जास्तीत जास्त वापर करण्यात आला व रू.१९,७७,०९,७६८.०१ मात्र इतक्या रक्कमेचा महसूल सदर संगणकीय प्रणालीचा वापर करून प्राप्त करण्यात आला. |
| ८. | क्रीडा संकुलांचे जास्तीत जास्त नागरिकांनी ऑनलाईन पध्दतीने आरक्षण करण्याकरीता संगणकीय प्रणालीचा वापर करावा. | क्रीडा संकुलांचे जास्तीत जास्त नागरिकांनी ऑनलाईन पध्दतीने आरक्षण करण्याकरीता संगणकीय प्रणालीचा वापर नागरिकांकडून करण्यात येत आहे. |
| ९. | क्रीडा व मनोरंजन उपविभागांतर्गत विविध उपक्रमांची माहिती नागरीकांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या टोल फ्री क्रमांकाच्या सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांकडून वापर होणे. | क्रीडा व मनोरंजन उपविभागांतर्गत विविध उपक्रमांची माहिती नागरीकांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या टोल फ्री क्रमांकाच्या सुविधेचा जास्तीत जास्त नागरिकांकडून वापर होत आहे. |

## ४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ४९४.२४ | २७२.४४ | २७७.८० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ३१४.८१ | ३४६.१२ | ३३६.७५ |
| वृक्ष प्राधिकरण महसुली तरतूद | ७७.२८ | ४७.२२ | ९१.०५ |
| एकूण | ८८६.३३ | ६६५.७८ | ७०५.६० |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# बाजार खाते

**१. प्रस्तावना** :

मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (ह) नुसार सार्वजनिक बाजार बांधणे आणि सुस्थितीत ठेवणे आणि सर्व बाजारांचे विनियमन करणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे.

उपरोक्त कर्तव्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी, खालील उद्दीष्टे साध्य करणे आवश्यक आहे.

- नागरीकांना दैनंदिन जीवनावश्यक वस्तुंची एकाच ठिकाणी खरेदी करण्याची सेवा उपलब्ध करणे.
- विद्यमान महानगरपालिका मंडयांचे परिरक्षण तसेच दुरुस्त्या करणे.
- विद्यमान महानगरपालिकेच्या मंडयांचा पुनर्विकास तसेच आधुनिकीकरण करणे.

महानगरपालिकेच्या एकूण ९२ विद्यमान मंडया व समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या १०८ मंड्या असून या मंडयांना बहुसंख्य मुंबईकर नियमितपणे भेट देत असतात. माझगाव येथील बाबू गेणू मंडईचे बांधकाम पूर्ण झाले असून परवाना धारकांचे पुनर्वसन करण्यात येत आहे. चेंबूरकर मंडईचे बांधकाम चालु करण्यात आले आहे. कुलाबा मंडई, मुलुंड पूर्व मंडई, जिजामाता मंडई, डोंगरी मंडई, सांताक्रुझ मंडई, प्लॉट ३६ अे मंडई, मुलुंड इत्यादींचे व्यापक दुरुस्ती कार्य पूर्ण झाले आहे. तसेच लक्ष्मणराव यादव मंडई, फोर्ट मंडई, लाल बहादुर शास्त्री मंडई, हॉकर्स प्लाझा मंडई यांचे दुरुस्ती काम चालु आहे. तसेच बांद्रा टाऊन मंडई, आण्णासाहेब वर्तक मंडई, डी.एन.नगर मंडई, मालवणी मंडई इ. मंडयांचे इमारत परिरक्षण विभागामार्फत व्यापक संरचनात्मक दुरस्तीची काम प्रगतीपथावर आहे. इतर मंडयांच्या किरकोळ दुरुस्त्या विभाग स्तरावर करण्यात येतात. पाली मंडई, टिळक नगर मंडई, कलिना मंडई व हिराचंद देसाई मंडई या ४ मंडयांचा पुनर्विकास भाग बांधून पूर्ण झाला असून मंडईतील परवानाधारकांना नवीन इमारतीमध्ये पुनर्वसित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने संमत केलेल्या विकास नियंत्रण नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(२१)(सी) च्या अन्वये बाजार विभागामार्फत १० मंडयांचा पुनर्विकास करण्यात येत असून त्यापैकी टोपीवाला मंडई, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, शिरोडकर मंडई व बाबु गेणू मंडई या ४ मंडयांचे पुनर्विकासाचे काम सुरू करण्यात आले आहे उर्वरित ६ मंडयांचे आराखडे तयार करण्याचे काम सुरू आहे.

हिंदुह्रदयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे, अंधेरी (पूर्व) येथील मंडईमधील तळमजला ते दुसरा मजला दि. ३०.०६.२०२२ पासून भाडेतत्त्वावर देण्यात आला असून तिसरा ते पाचवा मजला नियोजित ‘के/उत्तर’ विभाग कार्यालयासाठी देण्यात आला आहे. तसेच सहावा मजला ते नववा मजला (इमारत प्रस्ताव) पश्चिम उपनगरे विभाग, ‘एच’

विभाग व ‘के’ विभाग यांचे कार्यालय कार्यरत आहे. १) क्रांतीसिह नाना पाटील मंडई, २) मीनाताई ठाकरे मंडई, दादर (प), ३) साईनाथ रोड मंडई मालाड (प) व ४) बोरीवली (पश्चिम) मंडई येथे सेंद्रीय कच-याचे विघटन करण्यासाठी Organic Waste Converter (OWC) बसविण्यात आले आहेत. तसेच ऐरोली जकात नाका येथील अंशतः भुखंडावर सेंद्रीय कचरा प्रक्रिया Organic Waste Converter यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

बाजार विभागात सध्या मंडईचे भाडे व अनुज्ञापत्र नूतनीकरण सॅपद्वारे करण्यात येत आहे, त्यामुळे अनुज्ञापत्रधारकांना सदर सुविधा उपलब्ध झाली आहे.

२.	**खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **विद्यमान महानगरपालिका मंडयांचे योग्यप्रकारे परिरक्षण आणि दुरुस्त्या करणे.** | (एक) महात्मा ज्योतिबा फुले मंडई - टप्पा - २ (के.एम.जे.पी.) चा पुनर्विकास करणे | ३०.०० | ★ ४७.९३ |
| | | (दोन) महानगरपालिका मंडयांच्या विशेष स्वरुपाच्या दुरुस्त्या करणे | ६.०० | ४.०९ |
| | | (तीन) मंडयांना पारंपारिक स्वरुप देण्याकरिता व्यापक दुरुस्त्या | २.०० | ०.८४ |
| २. | **नागरिकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू त्यांच्या सोयीनुसार एकाच छताखाली खरेदी करणे शक्य व्हावे म्हणून बाजाराची सुविधा उपलब्ध करुन देणे** | (एक) टोपीवाला मंडई येथे मंडई तसेच नाटयगृहाची सोय करणे | १३.०० | ३.२४ |
| | | (दोन) नवीन मार्केट बांधणे | ०.०७ | --- |
| ३. | **शौचालयांची दुरुस्ती व पुनर्बांधणी** | महानगरपालिका बाजारातील शौचालयांच्या दुरुस्त्या / पुनर्बांधणी करणे | ०.६० | --- |
| ४. | **मंडयातील कचऱ्याचे जैविक रुपांतरण** | महानगरपालिका बाजारातील सेंद्रीय कचऱ्याची विल्हेवाट (सेंद्रीय कचरा परिवर्तक) | १.८३ | १.८२ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.५९.५० कोटी

**३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | विकास नियमावली – २०३४ नुसार महानगरपालिकेमार्फत पुनर्विकास करणे. | महात्मा ज्योतिबा फुले मंडईमधील हेरीटेज भाग वगळून अन्य भागांचा पुनर्विकास चालू असून ५० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. शिरोडकर मंडई पुनर्विकसीत करण्यात येत असून नव्या इमारतीच्या आठ मजल्यापर्यंत फेज-१ चे काम पूर्ण करण्यात आले असून तेथील मासळी मंडई नवीन इमारतीची निम्म तळमजल्यावर स्थलांतरित केली असून इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. बाबु गेनू मंडईचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे व टोपीवाला मंडईचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच चेंबुरकर मंडईचे बांधकाम सुरू करण्यात आलेले असून बोरीवली मंडई, नवलकर मंडई, खेरवाडी मंडई ह्या मंड्यांच्या पुनर्विकासासाठीचे नकाशे बनविणे प्रगती पथावर आहे. |
| २. | खाजगी मंडयांच्या धर्तीवर विद्यमान महानगरपालिकेच्या मंड्यांचा पुनर्विकास आणि आधुनिकीकरण करणे. | खाजगी विकासकांमार्फत मंडई पुनर्विकास सुरू असलेल्या प्रकरणांपैकी १) कै.बी.आर गावडे मंडई, २) पाली मंडई, ३) वाकोला महानगरपालिका मंडई, ४) पंतनगर महानगरपालिका मंडई ५) संत जलाराम मंडई ६) हिराचंद देसाई मंडई, व ७) टिळक नगर मंडई महानगरपालिकेच्या परवानाधारकांना पुनर्वसित करण्यात आले आहे. तसेच कालिना मंडईस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून पुनर्वसन प्रतिक्षेत आहे. विक्रोळी पार्कसाईट मंडईच्या पुनर्वसन भागाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ३. | मंड्यांचे संरचनात्मक परिक्षण करून दुरुस्ती करणे. | बाजार विभागाच्या फोर्ट येथील कुलाबा मंडई, जिजामाता मंडई, डोंगरी मंडई, सांतक्रुझ मंडई, प्लॉट ३६ अे मंडई, मुलुंड इत्यादींचे व्यापक दुरुस्ती कार्य पूर्ण झाले आहे. |
| ४. | मंडयांमध्ये कचऱ्याच्या विघटनासाठी Organic Waste Converter (OWC) ची व्यवस्था करणे. | महानगरपालिकेच्या ४ मंडयांमध्ये प्रायोगिक तत्वावर ओ.डब्ल्यु.सी.बसविण्यात आला आहे. सदर ४ मशिन्सची क्षमता एकूण २७.५ मे.टन इतकी आहे. तसेच ऐरोली जकात नाका येथील बाजार विभागाच्या अख्यत्यारीतील मोकळ्या भुखंडावर ओ.डब्ल्यु.सी. प्रकल्प उभारण्यात आला असून महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या अखत्यारीतील ६५ मंड्यांमधील कचरा कंत्राटदारामार्फत उचलून वरील नमूद ठिकाणी त्याचे ओ.डब्ल्यु.सी. मशिन्समार्फत सेंद्रिय खतात रुपांतर करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाची क्षमता एकूण ४१.५ मे.टन इतकी आहे. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ९६.३० | ७६.३८ | १०५.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ७५.४२ | ६०.८० | ८३.७९ |
| एकूण | १७१.७२ | १३७.१८ | १८८.७९ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# देवनार पशुवधगृह

**१. प्रस्तावना** :

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ६१ (ह) नुसार पशुवधगृहाची उभारणी व त्याचे विनियमन करणे ही महानगरपालिकेची अनिवार्य जबाबदारी आहे. तद्अनुषंगाने १९७१ साली देवनार पशुवधगृह हे महानगरपालिकेचे आशिया खंडातील सर्वात मोठे असे पशुवधगृह स्थापन करण्यात आले आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारीत असलेले श्वान नियंत्रण कक्ष व गुरेढोरे कोंडवाडा हे दोन विभाग दि.११.०९.२०१७ पासून महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांच्या अखत्यारीत हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

**देवनार पुशवधगृहाचा परिसर एकूण ६४ एकराचा असून त्याचे ३ भागात विभाजन करण्यात आले आहे.**

| | | |
|---|---|---|
| १) प्रत्यक्ष पशुवधगृहे / कारखाना विभाग | - | २१ एकर |
| २) बाजार विभाग | - | १९ एकर |
| ३) जनावरांसाठी चरई क्षेत्र | - | २४ एकर |

**देवनार पशुवधगृहाच्या स्थापनेमागे महानगरपालिकेची पुढीलप्रमाणे प्रमुख उद्दीष्टये होती.**

१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना स्वच्छ, निर्जंतुक मांसाचा पुरवठा.

२) पशुवधाच्या पश्चात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे.

३) मुंबईत जिवंत शेळ्या-मेंढ्या, म्हैसवर्गीय प्राणी व वराह या प्राण्यांच्या बाजारासाठी व्यवस्था करणे.

प्राणी क्लेश कायदा १९६०, पशुवधगृह नियमावली २००१, खाद्य सुरक्षा व मानके कायदा २००६, महानगरपालिका अधिनियम १८८८ कलम ४६१ (k,l,m,n) याद्वारे देवनार पशुवधगृहाचे दैनंदिन कार्य पार पाडले जाते. यामध्ये जनावरांच्या वधासाठी अनुज्ञापनपत्र देणे, जनावरांच्या बाजारासाठी जागा उपलध करून देणे, जनावरांची वधपूर्व व वधोत्तर तपासणी करणे, स्वच्छ, सकस व निरोगी मांस उपलब्ध करून देणे इत्यादी कर्तव्ये देवनार पशुवधगृहामार्फत पार पाडली जातात.

देवनार पशुवधगृहामध्ये मुख्यत्वे शेळया- मेंढया, म्हशी व म्हशींचे रेडे व डुकरे इत्यादी प्राण्यांचा वध केला जातो. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ सुधारणा १९९५, अंतर्गत बैलांच्या वधास पूर्णपणे बंदी असल्यामुळे दि.४ मार्च २०१५ पासून कायदा अंमलात आल्यानंतर बैलाचा वध देवनार पुशवधगृहामध्ये पूर्णपणे बंद करण्यात आलेला आहे.

देवनार पशुवधगृहामध्ये मुख्यत्वे शेजारील राज्यातील म्हणजे राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक या राज्यातील शेळया-मेंढया विक्रीसाठी येतात. महाराष्ट्रातील शेळया-मेंढयाचे प्रमाण अत्यल्प आहे. शेळया-मेंढयाचा बाजार आठवडयातून २ दिवस म्हणजे मंगळवार व शनिवार या दिवशी भरतो. शेळया-मेंढयाचा देवनार पशुवधगृहात प्रवेश झाल्यावर तात्काळ त्यांची नोंदणीकृत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत वधपूर्व तपासणी केली जाते. वधपूर्व तपासणी झाल्यावर शेळया-मेंढया विक्रीसाठी बाजार विभागात आणल्या जातात. दरम्यान जनावारांसाठी चारा, पाण्याची सोय केली जाते. सदर शेळया- मेंढयांची बाजारात दुकानदारांमार्फत खरेदी केली जाते. सदर खरेदी केलेल्या शेळया-मेंढयांना तद्नंतर वधासाठी प्रत्यक्ष पुशवधगृहामध्ये आणले जाते. या सर्व कालावधीत जनावरांना पुरेशी विश्रांती मिळावी, चारा व पाण्याची सोय व्हावी या करिता निवा-याची व्यवस्था केली आहे.

**बकरी ईद व्यवस्था :**

दैनंदिन पशुवधाव्यतिरिक्त देवनार पशुवधगृहामार्फत बकरी ईद या धार्मिक सणानिमित्त देवनार पशुवधातील शेळ्या-मेंढ्या बाजारात मोठ्या प्रमाणात बकऱ्यांची आवक होते. तसेच व्यवस्थापन देखील पाहिले जाते. बकरी ईद निमित्त सन २०२३-२४ मध्ये साधारणपणे १५००० म्हैंसवर्गीय जनावरांची देवनार पशुवधगृहामध्ये विक्री करण्यात आली होती. तसेच अंदाजे १.७६ लक्ष बकरे विक्रीकरिता देवनार पशुवधगृहात आलेले होते. विक्रीकरीता येणाऱ्या शेळ्यां-मेंढ्या व म्हैस वर्गीय जनावरांच्या निवाऱ्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या छावण्या, अतिरिक्त पाणी पुरवठा तसेच विजेची सोय महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येते. जनावरांच्या विक्रीकरिता येणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी शौचालय, पिण्याचे पाणी तसेच विश्रामगृहाची सोय महानगरपालिकेतर्फे पुरविली जाते. बकरी ईद मध्ये १५ दिवस जनावरांची आवक व विक्री सुरू होते. तद्अनुषंगाने उपरोक्त नमूद केलेल्या सोयी पुरविल्या जातात. हया व्यतिरिक्त कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तसेच अतिरिक्त सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली जाते. तसेच काही दुर्घटना घडू नये म्हणून फायर मार्शलची देखील व्यवस्था करण्यात आलेली होती. पूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्याकरिता ठिकठिकाणी २१० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सोय केली होती. तसेच देवनार पशुवधगृहामध्ये जनावरे खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांकरिता तात्पुरत्या उपहारगृहांची सुविधा उपलब्ध करण्यात येते.

बकरी ईद मध्ये १५ दिवस संपूर्ण परिसराच्या स्वच्छतेकरिता नियमित सफाई कामगारांव्यतिरिक्त अशासकीय संघटनांच्या कामगारांची नेमणूक करून साफसफाईची सेवा दिवस-रात्र देखील पुरविली जाते.

श्रृंगी जनावरांची धार्मिक कार्यासाठी खरेदी करून त्यांचा वध देवनार पशुवधगृहामध्येच करणे बंधनकारक आहे व त्यासाठी बकरी ईद व त्यानंतरचे २ दिवस वधासाठी आवश्यक व्यवस्था प्रशासनामार्फत केली जाते. धार्मिक कार्याकरिता खरेदी केलेल्या शेळया-मेंढया कलम ४०३ (ई) अंतर्गत घरी घेऊन जाण्याकरिता महानगरपालिकेने बनविलेल्या धोरणानुसार परवानगी देण्यात येते.

२.	**खात्याची ठळक उद्दिष्टे व ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टे | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **देवनार पशुवधगृहाचे आधुनिकीकरण /दर्जोन्नती,पशुवधापश्चात निर्माण होणा-या घन व द्रव कच-यांची प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या विहित पध्दतीनुसार विल्हेवाट केली जाते.** | (एक) देवनार पशुवधगृह आणि कत्तलखाना विभाग यांचे आधुनिकीकरण करणे. | १३.६९ | ७.१९ |
| | | (दोन) देवनार पशुवधगृहातील शीप युनिट व प्रशासकीय इमारत दुरुस्ती | ३.९० | ★ ४.८९ |
| | | (तीन) देवनार पशुवधगृहाच्या सर्वसाधारण स्थापत्य दुरुस्त्या | ०.७० | ०.६८ |
| | | (चार) इन्सीनरेटर / स्मशानभूमी | ३.०० | ⅄ ५.०५ |
| २. | **बकरी ईद व्यवस्थापन** | (एक) बकरी ईद निवा-यांकरीता तात्पुरती शेड | १४.५० | ✦ १७.३६ |
| | | (दोन) बकरी ईद – विशेष परिरक्षण | २.०० | १.९४ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.४.९० कोटी

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.५.३१ कोटी

✦ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१७.५१ कोटी

**३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | पशुवधाचे बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ कलम ४६१ अन्वये बनविण्यात आलेल्या उपविधीनुसार विनियमन | **अ) <u>गुरे - ढोरे विभाग</u>:**<br>मुंबईच्या नागरिकांना निरोगी व सकस घाऊक बीफ मांस उपलब्ध करून देण्याचे काम या विभागामार्फत पाहिले जाते. ३०० म्हैसवर्गीय जनावरे प्रती पाळी एवढी पशुवध क्षमता असलेल्या गुरेढोरे साधारणत: अंदाजित ४०८ जनावरांचा प्रती दिन वध केला जातो.<br><br>**ब) <u>शेळया-मेंढया विभाग</u>:**<br>६००० शेळ्या-मेंढ्या प्रती पाळी एवढी पशुवध क्षमता असलेल्या या विभागात सर्वसाधारणपणे अंदाजे १११९ शेळ्या-मेंढ्या प्रती दिन वध केल्या जातात. त्यात निर्यातीकरिता कापली जाणारी जनावरे, मध्यरात्र वध विभाग व उपनगरे विभागात होणाऱ्या शेळ्या-मेंढ्यांचा वध समाविष्ट आहे.<br><br>**क) <u>वराह विभाग</u> :**<br>मुंबईच्या नागरिकांना वराहाचे मांस उपलब्ध होण्यासाठी कार्यरत असणाऱ्या वराह विभागाची २०० वराह एका पाळीत वध करण्याची क्षमता असलेल्या या विभागात सरासरी ५३ प्रती दिन एवढ्या वराहांचा पशुवध करण्यात आला.<br><br>**ड) <u>अनुज्ञाप्ती संख्येत भरीव वाढ झाली आहे.</u>** |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| २. | पशुवधापश्चात निर्माण होणारा घन कचरा व द्रव कचऱ्यांची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार प्रक्रिया करणे व विल्हेवाट लावणे. | अ) राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचे आदेशानुसार भाभा अणुसंशोधन केंद्र यांच्या तंत्रज्ञानावर आधारित पशुवधापश्चात निर्माण होणाऱ्या Type-1 व Type-2 घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता १५ MT एवढी क्षमता असलेल्या बायोमिथेनेशन सयंत्राची उभारणी सन २०१७ मध्ये करण्यात आली असून, सदर सयंत्राद्वारे सन २०२३-२४ मध्ये ५९१.७१ मे.टन घन कचऱ्यावर प्रक्रिया करुन १३३१५ युनिट एवढी वीज निर्माण करण्यात आली आहे.<br><br>ब) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार पशुवधापश्चात निर्माण होणाऱ्या दुषित पाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता सन २००४ मध्ये 1.3 MLD एवढी क्षमता असलेल्या ETP Plant ची उभारणी करण्यात आली व सदर सयंत्राद्वारे प्रतिवर्ष सुमारे ३० कोटी लिटर दुषित पाण्यावर प्रक्रिया करुन, प्रक्रिया केलेले पाणी देवनार पशुवधगृहातील रस्ते धुण्याकरिता व परिसरातील बागेकरिता वापरुन उर्वरित पाणी महानगरपालिकेच्या मलनि:सारण वाहिनीमध्ये सोडण्यात येते. |
| ३. | पशुवधगृहाचे आधुनिकीकरण व दर्जोन्नती | सुमारे चार दशकांपूर्वी बांधलेल्या सध्याच्या या पशुवधगृहाचे मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी महानगरपालिकेने घेतलेल्या पुढाकाराचा एक भाग म्हणून संपूर्णपणे आधुनिकीकरण करण्याचे नियोजिले आहे. त्यामुळे भविष्यकाळात आवश्यक स्थापत्य/ विद्युत/ यांत्रिकी /वास्तुशास्त्रीय /संरचनात्मक / उद्यान विद्या विषयक बाबी आणि संगणकीकरण व स्वयंचलन यांनी परिपूर्ण असलेले हे जगातील सर्वोत्तम पशुवधगृहांशी स्पर्धा करू शकणारे अत्याधुनिक पशुवधगृह असेल. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | त्यामुळे मुंबईच्या रहिवाशांना उत्तम प्रतीच्या आरोग्यदायी मासांचा पुरवठा होईल. देवनार पशुवधगृहाच्या आधुनिकीकरणाच्या सल्लागाराची नेमणूक करण्याचे काम प्रमुख अभियंता (यां.व वि.) यांजकडून सुरू आहे. याकरीता केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय व वित्त मंत्रालयाच्या आर्थिक कार्य विभागांतर्गत सूचीबध्द असलेल्या प्रकल्प सल्लागाराकडून देकार मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. |
| ४. | पाळीव श्वानांसाठी शव दाहिनीची सुविधा | बृहन्मुंबईच्या शहर, पश्चिम व पूर्व उपनगरांमध्ये प्रत्येकी एक अशी पाळीव/भटके श्वान/मांजरांसाठी नैसर्गिक वायूवर आधारित दहनभट्टी उभारण्याचे काम सुरू असून, इन्सिनेटर मशिन इंग्लंड मधून मागविण्यात आलेली आहे. सदर काम हे मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रथमच करण्यात येत असून या दहनभट्टया यशस्वीपणे दिर्घकाळ वापरात येतील. अशा मजबूत, नागरिकांच्या आरोग्यास हानी न करणा-या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मापदंडानुसार असतील. या दहनभट्टयांमध्ये मुंबईतील श्वान अनुज्ञाप्तीधारकांचे श्वान, भटके श्वान, मांजरी,पक्षी यांच्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यात येईल. तसेच म्हैसवर्गीय मृत जनावरेही मोठया दहनभट्टीमध्ये दहन करता येतील. यापैकी पश्चिम उपनगरांमधील मालाड कोंडवाडा येथे उभारण्यात येणा-या ५० कि.ग्रॅ./तास क्षमतेच्या दहनभट्टीचे काम पूर्ण झालेले असून, सदर दहनभट्टी सप्टेंबर-२०२३ पासून व्यवस्थित कार्यरत आहे. पूर्व उपनगरामधील देवनार पशुवधगृह व महालक्ष्मी येथे उभारण्यात येणा-या दहनभट्टीचे काम प्रगतीपथावर आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ५. | भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व रॅबिज प्रतिबंध लसीकरण, परिमंडळीय पशुवैद्यकीय सेवा व जनावरांचा दवाखाना | अ) भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित करण्यासाठी प्राणि जन्म नियंत्रण कार्यक्रम सन १९९४ पासुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये सुरु करण्यात आला. सदर कार्यक्रम मा. उच्च न्यायालय याचिका क्र.१९५६/१९९८ मधील आदेशान्वये व प्राणी (श्वान) जन्मनियंत्रण अधिनियम २००१, अन्वये प्राणी क्लेश कायदा १९६० च्या अधिन राबविण्यात येत आहे.<br><br>ब) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पशुवैद्यकीय सेवा प्रथमच परिमंडळीय स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर सेवेअंतर्गत मुंबईतील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी ८६१७ श्वानांचे व १७४९ इतक्या मांजरांचे निर्बिजीकरण करण्यात आले.<br><br>श्वान नियंत्रण कार्यक्रमावर प्रत्यक्ष देखरेख, भटक्या श्वानांना रेबिज प्रतिबंध लसीकरण करणे, पाळीव श्वानांचा परवाना देणे इत्यादी सेवा उपलब्ध करण्यात आल्या. आजपर्यंत एकूण २६३५ एवढ्या पाळीव श्वानांना नवीन परवाने देण्यात आले असून, १९२३ एवढ्या श्वानांचे परवाने नुतनीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागरिकांच्या तक्रारीचे निवारण जलद गतीने करण्याकरिता नागरिकांना तक्रार करण्यासाठी MyBmcApp. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.<br><br>क) सध्याच्या खार येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या जागेत पाच मजली इमारत बांधण्याचे काम सुरु आहे. सदर ठिकाणी अत्याधुनिक पशुवैद्यकीय दवाखाना, पशुवैद्यकीय आरोग्य खात्याचे मुख्यालय, प्राण्यांपासून माणसांना होणाऱ्या रोगांच्या निदानाकरिता (Zoonotic diseases) प्रयोगशाळा याव्यतिरिक्त अद्ययावत निदान सुविधा असलेला प्राण्यांचा दवाखाना या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ६. | भटक्या / मोकाट गुरांबाबत कार्यवाही करणे व गुरेढोरे कोंडवाड्याचे व्यवस्थापन | अ) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ४४१ (क) मधील तरतुदीनुसार वर्षभरात एकूण २५७ भटक्या /मोकाट गुरांबाबत जप्तीची कार्यवाही करण्यात आली व रू.१०,१८,४४८/- एवढा दंड वसूल करण्यात आला.<br><br>ब) मालाड येथील कोंडवाड्याचे पुनर्बांधकाम सुरु असून सन २०२५-२६ मध्ये पूर्ण करण्यात येईल.<br><br>क) यावर्षी लम्पी रोगाच्या साथीला अटकाव करण्याकरिता, महानगरपालिका क्षेत्रातील सर्व भटक्या/मोकाट गुरांचे तसेच खाजगी मालकीच्या गोठ्यातील गुरांचे सर्वेक्षण करुन त्यांचे लसीकरण करण्यात आले. |

## ४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | २६.९९ | २२.२२ | २७.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ५८.२० | ६०.६० | ६६.६९ |
| एकूण | ८५.१९ | ८२.८२ | ९३.६९ |

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>कार्यानुरुप अहवाल २०२४-२५</u>

# मुंबई अग्निशमन दल

१. **प्रस्तावना** :

मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ६१ (क) अन्वये आगीपासुन मुंबईच्या नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करण्याचे बंधनकारक कर्तव्य अग्निशमन दल पार पाडीत असते. त्याचप्रमाणे इतर आपत्तीच्यावेळी म्हणजेच इमारत कोसळणे, अपघात, प्राणी व पक्ष्यांची सुटका करणे इत्यादी वर्द्यांना प्रतिसाद देते.

अलीकडच्या काळात मुंबई शहर व उपनगरात उत्तुंग इमारती, शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स चित्रपटगृहे इत्यादींच्या बांधकामात मोठया प्रमाणात झालेली वाढ लक्षात घेता, आग आणि इतर संलग्न धोक्याची शक्यता वाढली आहे. अशा धोक्याच्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी अग्निशमन दलाला लागणा-या आवश्यक साधनसामग्रीच्या तांत्रिक क्षमतेमध्ये व संख्येमध्ये मोठया प्रमाणावर वाढ करावी लागणार आहे.

या व्यतिरिक्त राज्यातील समुद्रकिना-यांवर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून पारीत करण्यात आलेल्या आदेशान्वये व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार अग्निशमन दलातर्फे मुंबईतील ६ समुद्र किना-यांवर जीव रक्षकांची सेवा पुरविण्यात येत आहे.

अग्निशमन दलाचे अत्याधुनिकीकरण व बळकटीकरण करणे ही काळाची गरज आहे, त्यादृष्टीने या खात्याची खालील उद्दिष्टये निर्धारित आहेत.

- आधुनिक अग्निशमन व विमोचन वाहने आणि साधनसामग्री खरेदी करणे आणि कालबाहय यंत्रसामग्री टप्याटप्याने बदलून अग्निशमन दल अधिक सक्षम करणे.
- मुंबई शहरात उंच व गगनचुंबी इमारतींची झपाटयाने होणारी वाढ लक्षात घेता अग्निशमन दलाचे आधुनिकीकरण आणि विकास करणे हे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता ३० मी आणि ४० मी उंचीचे एक टर्नटेबल लॅडर यांची खरेदी करण्यात आली आहे.
- तळघरांतील आगीचा सामना करण्याकरिता दोन फायर फायटिंग रोबोट खरेदी करण्यात आले आहेत.
- जुन्या व कालबाह्य झालेल्या अग्निशमन वाहने बदली करण्याच्या नियोजनांतर्गत मिनी वॉटर टेंडर-५ नग खरेदी करून कार्यान्वित करण्यात आली आहेत. तसेच, संयुक्त अग्निशमन वाहने हायड्रॉलिक प्लॅटफॉर्मसह – ०७ नग व उत्तुंग इमारत अग्निशमन वाहने – ०५ नग पुरवठ्याकरिता कार्यादेश देण्यात आला आहे. तसेच, परिवहन

खात्याच्या नियमानुसार १५ वर्षे पूर्ण झालेल्या प्रथम प्रतिसादात्मक अग्निशमन वाहनांच्या बदली उत्तुंग इमारत अग्निशमन यंत्रणेचा अंतर्भाव असणारी ११ नवीन प्रथम प्रतिसादात्मक अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरीता निविदा प्रसारित करण्यात आली आहे.

- महानगरपालिकेच्या विभागांमध्ये २२ जलद प्रतिसाद वाहने तैनात करण्यात आल्या असून त्यामुळे आपात्कालीन वर्दीचा प्रतिसादात्मक वेळ कमी होण्यास मदत होत आहे.
- बोरिवली प्रादेशिक समादेश केंद्र येथे डिजास्टर रिकव्हरी साईट (मिरर ईमेज) ची उभारणी करून कार्यान्वित करण्यात आली आहे.
- अग्निशामकाची कार्यकुशलता व व्यावसायिक कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या तीव्रतेच्या आगी व इमारती ढासळल्यावर विमोचनाच्या वेगवेगळ्या परिस्थितीची अनुकरण करणारी – इमारती मधील आगी व सिमीत जागेमध्ये विमोचन प्रशिक्षण देणारी प्रणाली उभारण्याचे प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.
- तसेच अग्निशमन दलामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ वाढविण्याच्या दृष्टीने त्यामध्ये
  - ५०० अग्निशामकांची पदे भरण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
  - ५४ यंत्रचालकांची आवश्यकता पुरविण्याकरिता बाह्य संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे.
  - प्रमुख अग्निशामकांची पदे अग्निशामक संवर्गामधून पदोन्नतीद्वारे भरण्यात आली आहेत.
  - दुय्यम अधिकारी यांची पदे प्रमुख अग्निशामक व यंत्र चालक संवर्गामधून पदोन्नतीद्वारे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
- त्याचप्रमाणे मुंबई शहराची होणारी दैनंदिन वाढ व लोकसंख्येमध्ये होणा-या वृद्धीमुळे आगी सारख्या दुर्घटनांमध्ये वाढ झालेली आहे. तसेच शहरात होणारी वाहतुकीची कोंडी यांचा विपरित परिणाम प्रतिसाद वेळेवर होत आहे. त्या दृष्टीने यामध्ये सुधारणा करण्याकरिता नवीन अग्निशमन केंद्रे बांधण्याचे प्रस्ताविण्यात आलेले आहे. नवीन अग्निशमन केंद्राकरिता भूखंड उपलब्ध करुन देण्याकरिता मुख्य अभियंता (विकास व नियोजन) यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

आगीवर पोहोचण्याचा प्रतिसादात्मक वेळ कमी होण्याकरिता अतिरिक्त अग्निशमन केंद्रे प्रस्ताविण्यात आली असून ठाकूर विल्हेज, कांदिवली (पू) येथे आणि कांजुरमार्ग (प) येथे एल.बी.एस. मार्ग आकृती बिल्डिंग जवळ या ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र बांधण्याचे लवकरच पूर्ण होणार असून जुहू - तारा रोड - सांताक्रूज (प), माहूल रोड - चेंबूर व टिळक नगर येथे अद्ययावत अग्निशमन केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

तसेच मुंबई शहरामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या कोस्टल रोड (सागरी किनारा मार्ग) येथे आपात्कालीन परिस्थितीमध्ये नागरीकांना तातडीने मदत कार्य पोहोचविण्याच्या दृष्टिने दोन नवीन अग्निशमन केंद्रे सदर मार्गावर मोक्याच्या ठिकाणी उभारण्याचे प्रस्तावित आहे.

- तसेच, सन २०१७ साली १७ छोटी अग्निशमन केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती व त्याचा उपयोग नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीमध्ये चांगली सेवा देण्याकरीता होत असल्यामुळे मुंबई शहरामध्ये अजून १५ छोटे अग्निशमन केंद्रे बांधण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

२. **खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **आधुनिक अग्निशमन विमोचक वाहने आणि साधनसामग्री खरेदी करणे आणि कालबाहय यंत्रसामग्री पुढील काही वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने बदलून अग्निशमन दलाचे बळकटीकरण करणे** | - अग्निशमन व विमोचन वाहनांची खरेदी करणे | १२८.२० | ६४.७५ |
| | | - यंत्रे व संयंत्रे यांची खरेदी करणे | २८.६० | ★ ३९.०८ |
| २. | **नवीन अग्निशमन केंद्रे कार्यान्वित करुन आपत्कालीन प्रसंगी अग्निशमन दल दुर्घटनास्थळी दाखल होण्याचा कालावधी कमी करणे** | (अ) ठाकूर व्हिलेज कांदिवली (पूर्व) अग्निशमन केंद्राचे बांधकाम | १९.०० | ⅄ २०.५३ |
| | | (ब) कांजूर मार्ग येथे अग्निशमन केंद्र बांधणे | | |
| | | (क) के/पश्चिम जुहू सांताक्रुझ येथे नवीन अग्निशमन केंद्र उभारणे | | |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.४५.२१ कोटी

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.२२.०० कोटी

३.  **सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | मुंबई अग्निशमन दलाच्या कार्य क्षमतेचे बळकटीकरण केल्यामुळे नागरीकांना अधिक प्रभावीपणे सेवा पुरविता येतील. | सन २०२३-२४ या कालावधीमध्ये अग्निशमन दलाच्या ताप्यामध्ये, सीटीडी ट्रायकोरोस फोम प्रणाली असलेली मिनी वॉटर टेंडर-०६ नग, फायर फाईटींग रोबोट-०२ नग, विद्युत वाहने-०६ नग व महिंद्रा बोलेरो जीप्स-११ नग यांचा समावेश करण्यात आला आहे.<br>तसेच, घर पडल्याच्या वर्दीवर, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, भूकंप झाल्यास तसेच छोट्या जागी व इतर अत्यावश्यक प्रसंगी अडकलेल्या व्यक्तींची सुटका व विमोचन कार्य करण्यासाठी, अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत डिजास्टर डिप्लॉयमेंट किट-१५ नग यांची खरेदी करण्यात आली आहे. तसेच, सी.ए.एफ.एस. वर आधारीत वॉटर मिस्ट प्रणाली यंत्र-६५ नग यांची खरेदी करण्यात आली आहे. बोरिवली समादेश केंद्र येथे डिजास्टर रिकव्हरी साईट (मिरर ईमेज) प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. |
| २. | अग्निशमन दल दळणवळण क्षेत्राचे आधुनिकीकरण | अग्निशमन दलाच्या इंटीग्रेटेड कमांड व कंट्रोल प्रणाली करिता बोरिवली प्रादेशिक केंद्र येथे डिजास्टर रिकव्हरी साईट प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. |
| ३. | अग्निशमन दलाचे अधिकारी / कर्मचारी यांची कार्य क्षमता व कार्य कुशलता वृध्दींगत करणे | अग्निशमन व विमोचन कार्य करताना प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा कार्यक्षम, कार्यकुशल व शारिरीक दृष्टया तंदुरुस्त असणे आवश्यक आहे. त्याकरिता सर्व अग्निशमन केंद्रांवर व्यायाम शाळेची व्यवस्था करण्यात आलेली आहे.<br>त्याचप्रमाणे अधिकारी व व्यावसायिक कार्यकुशलता वाढविण्याकरिता वडाळा अग्निशमन केंद्र येथे बी.ए. गॅलरी द्वारे धुरामध्ये आग विझविणे व विमोचन कार्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच अत्याधुनिक ड्रील टॉवर व आगीचे प्रात्याक्षिकांसह प्रशिक्षण देण्याकरिता ठाकूर विलेज येथे मल्टी सिम्युलेटरची ड्रील टॉवर उभारणीची प्रक्रिया सुरू आहे. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | २२७.०७ | १५४.७१ | २३२.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ४३९.२० | ३५३.४० | ४५७.९९ |
| एकूण | ६६६.२७ | ५०८.११ | ६८९.९९ |

# आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी केंद्र

१. **प्रस्तावना** :

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ (२००५ चा ५३) चे कलम २५ मधील (१), (२) आणि (४) या तरतूदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार आणि महाराष्ट्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियम २ नुसार सन २०११ मध्ये बृहन्मुंबई आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. या प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महानगरपालिका आयुक्त हे होते.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार आणि शासन निर्णयान्वये सन २०१८ मध्ये मुंबई शहर व मुंबई उपनगरांसाठी स्वतंत्र जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त हे मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेने खालील उद्दिष्टे समोर ठेवून आपत्कालीन व्यवस्थापन विभागाची निर्मिती केली आहे.**

१) आपत्ती दरम्यान जलद व प्रभावी प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे.

२) प्रतिसाद देणा-या सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राखणे/प्रस्थापित करणे.

३) आपत्तींशी संबंधित माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याकरिता समाज प्रसार माध्यमांशी समन्वय साधणे.

४) सर्व स्तरांवरील सुसज्जतेकरिता समन्वयन करणे.

५) आपत्कालीन परिस्थितीत बाधितांना सहाय्य करण्याकरिता संबंधित यंत्रणांना प्रोत्साहित करणे.

६) आपत्ती व्यवस्थापनात कार्यरत विविध यंत्रणांच्या अधिका-यांना व नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे.

बृहन्मुंबईकरिता संभाव्य असणा-या नैसर्गिक आणि आपत्कालीन धोक्यांचे १०२ उपमुख्य धोक्यांमध्ये निश्चितीकरण करण्यात आले आहे. यामध्ये लहान मोठ्या दुर्घटना, भूस्खलन, झाडे पडणे, पाणी तुंबणे, इमारती/घरे कोसळणे, शॉर्टसर्किट, पूर परिस्थिती, भूकंप, बॉम्बस्फोट इत्यादी धोके अंतर्भूत आहेत. उपरोक्त धोक्यांचे प्रत्यक्ष आपत्तीमध्ये रूपांतर झाल्यास अशा घटनांची नोंद संगणकीय प्रणालीत करून सुनिश्चित कार्यपध्दतीनुसार मदतकार्य उपलब्ध करून देण्यात येते.

**आपत्कालीन व्यवस्थापन विभागातर्फे खालील यंत्रणा / प्रणाली विकसित करण्यात आल्या आहेत.**

- **स्वयंचलित हवामानदर्शक संयंत्र :- (Automatic Weather Stations)**

  बृहन्मुंबईतील विविध १२० ठिकाणी स्वयंचलित हवामान दर्शक संयंत्रे उभारण्यात आली आहेत.

- **आपत्कालीन नियंत्रण कक्षासाठी MCS संनिरिक्षण केंद्र :- (SITC & Operation of Viewing Centre in 24 Wards under Mumbai City Surveliance (MCS) project)**

  या अंतर्गत बृहन्मुंबईतील विविध ठिकाणी प्रस्थापित करण्यात आलेल्या १०००० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमे-यांचे थेट प्रक्षेपण मुख्य नियंत्रण कक्षात पाहण्याकरिता व्हिडीओ वॉल उपलब्ध करून देण्यात आली आहे. संपूर्ण मुंबई महानगरात २४ विभाग कार्यालयात एमसीएस प्रकल्पांतर्गत निरिक्षण केंद्रे उभारण्यात आली आहेत.

- **डिजिटल मोबाईल रेडिओ बिनतारी संदेशवहन यंत्रणा :-**

  अखंडीत संदेशवहनाकरिता महानगरपालिकेचे २४ प्रशासकीय विभाग, मुख्य रूग्णालये, विविध शासकीय यंत्रणा डिजिटल वायरलेस यंत्रणेमार्फत **(DMR)** जोडण्यात आलेल्या आहेत.

- **आपत्ती व्यवस्थापन संकेतस्थळ :-**

  ‘dm.mcgm.gov.in’ या संकेतस्थळावर भरती-ओहोटी वेळापत्रक, भारतीय हवामान खात्याकडून प्राप्त हवामान अंदाज, स्वयंचलित हवामान दर्शक संयंत्रांकडून प्राप्त हवामानाच्या विविध घटकांची दर १५ मिनिटांनी थेट अद्ययावत होणारी माहिती, रस्ते वाहतुकीची सद्यस्थिती, उपनगरीय रेल्वे वाहतूक सद्यस्थिती, हवाई वाहतूक सद्यस्थिती तसेच आपत्कालीन व्यवस्थापन विभागाशी संबंधित महत्वाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

- **आपत्ती व्यवस्थापन ॲप :-**

  बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या अँड्रॉइड व आयओएस प्रणालीवरील आपत्ती व्यवस्थापन ॲप मध्ये बृहन्मुंबई परिसरातील पर्जन्यमानाची माहिती आणि हवामानाचे इतर मापदंड जसे तापमान, हवेचा दाब, आर्द्रता, हवेचा वेग, वळविण्यात आलेली रस्ते वाहतूक, हवामान खात्याकडून प्राप्त झालेला हवामान अंदाज यांची थेट माहिती उपलब्ध आहे.

- **मुंबई शहर आणि उपनगरांसाठी सेस्मिक मायक्रोझोनेशन आणि धोका असुरक्षित जोखीम मुल्यांकन (MHVRA):**

  संभाव्य जोखमींचा अंदाज वर्तविण्याची आवश्यकता लक्षात घेऊन आणि येणा-या आपत्तीचा प्रभाव कमी करण्यासाठी, मुंबई शहर आणि उपनगरातील बहु-धोकादायक जोखीम असुरक्षिततेचे मुल्यांकन करण्याचा प्रकल्प संयुक्त राष्ट्र विकास प्रकल्प **(UNDP)** यांच्या सहकार्याने हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाची उदिष्ट खालीलप्रमाणे:-

  १. जीविताच्या दृष्टीने प्रमुख नैसर्गिक आणि मानवनिर्मित धोके आणि त्यांची तीव्रता तपासणे.

  २. जैव आणि वित्त मालमत्तेचे संरक्षण आणि आर्थिक व सामाजिक नुकसान कमी करण्यासाठी प्रतिसादाची आवश्यकता असणारे धोके निश्चित करणे. आपत्कालीन प्रसंगामध्ये कृत्रिम बुध्दिमता व मशिन लर्निंग याचा वापर करून निर्णयक्षमता वाढविणे.

## २. खात्याची ठळक उद्दिष्टे व ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टे | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **अत्याधुनिक स्वयंपूर्ण व निर्दोष संपर्क यंत्रणा विकसित करणे.नैसर्गिक आपत्तीच्या काळात जेथे जेथे शक्य आहे तेथे सर्व संबंधितांना पूर्व सूचना देणे** | (अ) यंत्रे व संयंत्रे खरेदी करणे | २.७५ | ★ ३.६९ |
| | | (ब) महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षासाठी MCS संनिरीक्षण केंद्र उभारणे | ४.२६ | ⅄ ५.०२ |
| २. | **आपत्कालीन परिस्थिती निवारण आणि व्यवस्थापन यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांची क्षमता वृध्दींगत करणे** | (अ) नैसगिक आपत्ती निवारणासाठी तरतूद | ५.७५ | ३.३९ |
| | | (ब)यंत्रे / साधनसामग्रीचे वार्षिक परिरक्षण आकार | १.४४ | १.०४ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.३.८४ कोटी

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.५.०२ कोटी

३.	**सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेले फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | आपत्कालीन, अग्नि आणि औद्योगिक सुरक्षा व्यवस्थापन पदविका सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शहर आपत्ती व्यवस्थापन येथे सुरू केलेला अभ्यासक्रम बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व संवर्ग अधिकारी – कर्मचारी यांच्यासाठी पुढील पाच वर्षाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. | आपत्कालीन, अग्नि आणि औद्योगिक सुरक्षा व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सर्व संवर्गतील अधिकारी - कर्मचा-यांसाठी शैक्षणिक वर्षे सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ पर्यंत सुरू करण्याकरिता मंजूरी प्राप्त करून घेण्यात आली आहे.<br>आतापर्यंतच्या सात शैक्षणिक वर्षामध्ये महानगरपालिकेतील एकूण १०८ अधिकारी/कर्मचारी यांनी सदर पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे. |

४.	**सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ८.५६ | ९.३१ | ६.५० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ४३.१९ | ३७.२३ | ४४.७१ |
| एकूण | ५१.७५ | ४६.५४ | ५१.२१ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# माहिती तंत्रज्ञान कक्ष

१. **प्रस्तावना** :

बृहन्मुंबई महानगरपालिका नागरिकांना माहिती तंत्रज्ञानाचा वापर नागरीसुविधा कॅशलेस व पेपरलेस स्वरूपात ऑनलाईन सेवा देण्यात अग्रेसर असून आता जवळजवळ सर्व महत्वाच्या सुविधांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. तसेच महानगरपालिकेच्या कर्मचा-यांची उत्पादकताही संगणकीकरणामुळे वाढली आहे.

सदर संगणकीकरणाचा भाग म्हणून खालील प्रकल्प पूर्ण झाले आहेत अथवा पूर्णत्वास जात आहेत.

२. **खात्याची ठळक उद्दिष्टचे व ती उद्दिष्टचे साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टचे | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **महानगरपालिकेच्या विविध खात्यांचे सर्व महत्त्वाच्या कार्यक्रमांचे / बाबींचे संगणकीकरण करण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्युशनचा विकास / अंमलबजावणी करणे** | बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध संगणक प्रणालीकरिता विविध लायसेंस खरेदी करणे. | १२.०० | ०.२२ |
| २. | **महानगरपालिकेच्या सर्व कार्यालये आणि आस्थापना यांचे संगणकीकरण करणे** | एक) महानगरपालिकेच्या विविध कार्यालयास संगणक, प्रिंटर, स्कॅनर इत्यादीचा पुरवठा करणे.<br>दोन) विविध कार्यालये तसेच डेटा सेंटर येथे सर्वर व नेटवर्क हार्डवेअर पुरवठा करणे. | २७.५० | ८.८५ |
| ३. | **बृहन्मुंबई महानगरपालिकेत विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्प राबविणे** | बृहन्मुंबई महानगरपालिकेत विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्प राबविणे, माहिती तंत्रज्ञान सामग्रीकरीता तसेच विविध कार्यालयातील नेटवर्क जाळे सुधारण्यासाठी प्रणाली एकत्रीकरण करण्याकरीता तरतूद | ६.४९ | ⅄ १२.९८ |

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ रू.१३.५० कोटी

३.  **सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांचे सर्व महत्त्वाच्या कार्यक्रमांचे / बाबींचे संगणकीकरण करण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्युशनचा खरेदी करणे. कार्यालये/विभाग याकरिता संगणक, प्रिंटर व स्कॅनर पुरवठा करणे. बृहन्मुंबई महानगरपालिकेत विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्प राबविणे. | महानगरपालिकेच्या संगणकीकरणाच्या गरजेनुसार विविध सॉफ्टवेअर जसे विंडोज, रेड हॅट, मॉनिटरींग सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील वाढते संगणककीरण व कालबाहय झालेली उपकरणे या बाबी लक्षात घेता विविध विभाग / कार्यालयांकरिता संगणक खरेदी करून पुरविण्यात आले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत विविध माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्प राबविण्याच्या अंतर्गत मुंबई महानगरपालिकेमध्ये SD-WAN तंत्रज्ञानाचे अंमलबजावणी करण्यात आली आहे. |
| २. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये भौगोलिक माहिती यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही करणे. याकरीता नियुक्त केलेल्या तांत्रिक मनुष्यबळाच्या माध्यमातून नवीन प्रणालींचा विकास, वापरांत असलेल्या प्रणालींमध्ये सुधारणा, वापरकर्त्यांकडून प्राप्त होणा-या तक्रारींचे निराकरण, विविध प्रकारचे डॅशबोर्डस तयार करणे, प्रशिक्षण आयोजित करणे इ. कार्ये पार पाडणे. | वापरांत असलेल्या प्रणालींमध्ये सुधारणा, प्रशिक्षण<br>१. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये, माय बीएमसी बिल्डींग आयडी या भौगोलिक माहिती यंत्रणा आधारित प्रकल्पाची सन २०२२ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर प्रणालीमध्ये पुढील सुधारणा करण्यात आल्या.<br>२. माय बीएमसी बिल्डींग आयडी या प्रणालीमध्ये इमारत व बांधकाम, आरोग्य परवाने, दुकाने आस्थापना, अनुज्ञापने इ.माहिती अद्ययावत राहण्याकरिता एकात्मता साधण्यात आली.<br>३. बिल्डींग यूआयडी कक्षाशी संबंधित पार पाडावयाची कार्ये यांवर देखरेख करण्याकरीता डॅशबोर्डस तयार करण्यात आले व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. |
| ३. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमामध्ये, भौगोलिक माहिती यंत्रणा आधारीत यूटीलिटी व्यवस्थापन प्रणालीची अंमलबजावणी करणे व सहाय्य सेवा पुरविणे. | बेस्ट उपक्रमाच्या विद्युत विभागासाठी तयार करण्यात आलेल्या भौगोलिक माहिती यंत्रणा आधारीत प्रणालींकरीता सहाय्य सेवा पुरविण्यात आली. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ४. | विविध विभागांना आर्क जी.आय.एस.अनुज्ञापने उपलब्ध करून देणे व उपलब्ध अनुज्ञापनांच्या वार्षिक देखभाल कंत्राटाकरिता उपाययोजना करणे. | उपलब्ध अनुज्ञापनांच्या वार्षिक देखभाल कंत्राटाकरिता व विविध विभागांना आर्क जी.आय.एस.अनुज्ञापने उपलब्ध करून देणे याकरिता, संबंधित ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर समवेत कंत्राट करार करण्यात आला. संबंधित संस्थेमार्फत वापरकर्त्यांकरिता प्रशिक्षणाचे आयोजन आवश्यकतेनुसार करण्यात येत आहे. तसेच, जल अभियंता, विकास नियोजन इ. विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांकरिता अनुज्ञापने वापरण्यात आली व सहाय्य सेवा पुरविली जात आहे. |
| ५. | 3D सिटी मॉडेल | 3D सिटी मॉडेल प्रकल्प सुरू करण्यात आला. सदर प्रकल्पात एरियल फोटोग्रॅमेट्री, लिडार सर्व्हे, टेरिस्टेरिअल अँड मोबाइल लिडार सर्व्हे, पॅनोरॅमिक ३६०-डिग्री इमेजरी सर्व्हेची इत्यादी कामे अंतर्भूत आहेत. |
| ६. | बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी माहिती तंत्रज्ञान सुरक्षा परिक्षण/ऑडिट सेवांची खरेदी | या प्रकल्पांतर्गत माहिती तंत्रज्ञान विभागाद्वारे चालविण्यात येणा-या विविध ऑपरेटिंग सिस्टीम (OS), वेब डेव्हलपमेंट, डेटाबेस मॅनेजमेंट सिस्टीम (DBMS), SAP मधील विविध मॉड्युल्स, नेटवर्क, हार्डवेअर इत्यादींच्या माहिती तंत्रज्ञान सुरक्षा परिक्षण करण्यात येत आहे. |
| ७. | बृहन्मुंबई महानगरपालिकासाठी सुरक्षा ऑपरेशन केंद्र (SOC) सेवांची खरेदी | या प्रकल्पांतर्गत इम्प्लिमेंटेशन, नेटवर्क कनेक्टिव्हिटी, ऑनसाईट रिसोर्सेस, सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर सर्विसेस, प्रणाली सुरक्षा देखरेख, इन्सिडेंट मॅनेजमेंट, थ्रेट इंटेलिजन्स आणि थ्रेट हंटिंग, नेटवर्क, यूजर आणि इव्हेंट्स बीहेव्हीअर ॲनालिटिक्स, ब्रँड मॉनिटरिंग, फॉरेन्सिक इन्व्हेस्टिगेशन (मागणीनुसार) करण्यात येत आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ८. | नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या व्हॉट्सॲप चॅटबॉट सुविधेच्या अंमलबजावणी पश्चात सेवा व देखभालीकरिता | बृहन्मुंबई महानगरपालिकेने व्हॉट्सॲप चॅटबॉट सुविधेच्या आधारित आपल्या नागरिकांना अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरिकांसाठी व्हॉट्सॲप आधारित चॅटबॉटद्वारे प्रदान केलेल्या सेवा खालील विस्तृत श्रेणींवर आधारित आहेत.<br>१. माहिती - शाळा, हॉस्पिटल, गार्डन इत्यादी बीएमसी सुविधा आणि वार्ड ऑफिस, फायर स्टेशनची संपर्क माहिती आणि रक्तपेढीत रक्ताची उपलब्धता.<br>२. व्यवहार- नागरी तक्रार नोंदणी<br>३. मार्गदर्शक- बीएमसी लायसन्स/परमिट/प्रमाणपत्रे ऑनलाईन भरणे.<br>४. संप्रेषण- बीएमसीशी संबंधित माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे.<br>५. बीएमसी हॉस्पिटल आऊट पेशंट डिपार्टमेंट (ओपीडीची माहिती -लोकेशन बेस्ड्)<br>६. बीएमसी दवाखाना रुग्ण प्रयोगशाळेचा अहवाल वॉट्सॲपवर<br>७. प्रॉपर्टी टॅक्स आणि एक बील व्हॉटस्ॲपवर |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ४६.२२ | १८.५८ | ३१.२० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | १३७.९९ | १४५.२७ | १८३.१४ |
| एकूण | १८४.२१ | १६३.८५ | २१४.३४ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# करनिर्धारण व संकलन खाते

१. **प्रस्तावना** :

मालमत्ता कर मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे. महसुलाचे लक्ष्य गाठण्याव्यतिरिक्त या खात्याने खालील प्रमुख उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले आहे.

- करनिर्धारणाची प्रक्रिया सुसूत्रित आणि पारदर्शक करणे.
- करदात्यांना मालमत्ता कर सहज व सुलभरित्या भरणे शक्य होण्यासाठी सुविधा पुरविणे.
- नियमित व वेळेवर कर भरण्यासाठी करदात्यांना उत्तेजन देणे.
- वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी अशी प्रकरणे लवकर निकालात काढणे.

**करनिर्धारण व संकलन खात्याची महत्वाची कामे खालीलप्रमाणे आहेत:-**

मुंबई शहरातील जमिनी व इमारती यांचे प्रत्येक वर्षी सर्वेक्षण करून त्यांचे भांडवली मूल्य ठरविणे. या कामाकरिता नेमलेले विभाग निरिक्षक प्रत्येक मालमत्तेची तपासणी करून जेथे आवश्यक वाटेल तेथे भांडवली मूल्यामध्ये बदल प्रस्तावितात व या कामाकरिता मालमत्तेचे मोजमाप घेण्यासाठी सर्वेक्षक मदत करतात. मालमत्तेचे करनिर्धारण करून भांडवली मूल्य ठरविल्यानंतर त्या बाबतची नोटीस करदात्यास देण्यात येऊन या बाबत काही आक्षेप/ तक्रार असल्यास नोटीस मिळाल्यापासून २० दिवसांच्या आत तक्रार करण्याचे सूचित केले जाते. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या आक्षेप / तक्रारींचे अन्वेषण त्या कामाकरिता नेमलेल्या अन्वेषण अधिकाऱ्यांकडून केले जाते. अन्वेषण अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांच्या विरुध्द कोर्टात अपील केल्यास संबंधित अन्वेषण अधिकाऱ्यास कोर्टात हजर राहावे लागते. मुंबई बंदर विश्वस्त, लोहमार्ग व शासनाच्या मालमत्तांचे मूल्य, कर आकारणी व वसुली इत्यादींचे कामकाज पाहण्यासाठी करनिर्धारण व संकलन खात्याचा स्वतंत्र विभाग चंदनवाडी महानगरपालिका शाळा, श्रीकांत पालेकर मार्ग, मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ००४ येथे कार्यरत आहे.

२. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील विहित कलमान्वये वसुलीकरीता विहित केलेल्या करांचे संकलन करण्याचे काम बाहयवृंद कर्मचारी करतात.

३.	**वर्ष २०२३-२४ ह्या वर्षी मालमत्ता कराच्या वृध्दीसाठी उपाय योजना :**

मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०२ ते २०६ मधील तरतूदीनुसार, विहित वेळेत मालमत्ता कराचे अधिदान न करणा-या पक्षकारांकडून थकीत देयकांची वसुली करण्याच्या अनुषंगाने दंड आकारणी, जप्ती, लिलाव, विक्री इ. कारवाई करण्यात येतात. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, कलम २०६ नुसार करण्यात येणारी लिलावाची प्रक्रिया प्रभावी करण्याच्या अनुषंगाने मालमत्ता कराच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तांची विक्री करण्याबाबतच्या विनियमात सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने विभागीय स्तरावर प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियन १८८८, कलम १५२ अ अन्वये, अनधिकृत बांधकामावर मालमत्ता कराच्या दोनपट दंड आकारणी करण्याची तरतूद आहे. मालमत्ता कराचे विहित वेळेत संकलन होण्याच्या दृष्टीने आणि गृहनिर्माण संस्थांमधील कर थकविणा-या मालमत्ता धारकांना सदनिका निहाय देयके निर्गमित करण्याची कार्यपध्दती प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

४.	कर चुकवेगिरी करणा-यांवर कारवाई करणे आणि त्यांच्याकडून वेळेत वसूली करण्याकरीता तसेच दिर्घकालीन दृष्टिकोनातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता सांख्यिकी विश्लेषण प्रणालीच्या अंमलबजावणी SAS-PTIS (Property Tax Intelligent System) द्वारे करण्यात आलेली आहे.

५.	**जकात शाखा :-**

०१ जुलै २०१७ पासुन वस्तू व सेवाकर प्रणाली लागू झाल्यामुळे जकात संकलन बंद करण्यात आले आहे.

२.	**खात्याची ठळक उद्दिष्टये व ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी अशी प्रकरणे लवकर निकालात काढणे.** | वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी न्यायालयीन कामाकरिता ॲटर्नी जनरल श्री.के.के.वेणूगोपाल आणि व्ही.श्रीधरण यांची नियुक्ती करण्यात आलेली होती व अशा प्रकरणातील मालमत्तांचे मुल्यांकन करण्याकरीता मे.एफ.के.कन्सल्टंट या शासन मान्य संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जेणेकरून मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरळित पार पडेल. | १.५९ | ०.४६ |
| २. | **करनिर्धारण व संकलनाची प्रक्रिया तर्कसंगत आणि पारदर्शक करणे** | मालमत्तांचे जीआयएस सर्व्हेक्षण आणि मालमत्तांचे मॅपिंग करणे<br>-३६० डिग्री मॅपिंग प्रोजेक्टर | ०.७२ | --- |
| ३. | **सीव्हीएस बेस प्रापर्टी टॅक्स सॉफ्टवेअर व भांडवली मुल्याधारीत संगणकीय प्रणालीचा वापर करणे** | (एक) मालमत्ता कर वाढीसाठी भांडवली मुल्याधारीत संगणकीय प्रणालीचा वापर करून महानगरपालिकेचे करवाढीचे उद्दिष्ट साध्य करणे. तसेच सदर संगणकीय प्रणालीचा वापर करून करवाढीचे उद्दिष्टे साध्य करणे | ०.५० | ★ १५.८९ |
| | | (दोन) एस.ए.एस. प्रॉपर्टी टॅक्स ॲनॅलॅटीक सोल्युशनचे परिरक्षण | ६.०० | ⅄ १०.८५ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१६.८६ कोटी

⅄ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१३.१८ कोटी

### ३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
| --- | --- | --- |
| १. | वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी अशी प्रकरणे लवकर निकालात काढणे. | वादग्रस्त प्रकरणांमध्ये न्यायालयीन वादात अडकलेली रक्कम मिळविण्यासाठी प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढण्याकरिता करनिर्धारण व संकलन खात्याकडून निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणे निकाली काढून उत्पन्नात वाढ होणार आहे. |
| २. | मालमत्ता कर देयके Email द्वारे पाठविण्याची सुविधा | मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची देयके Email द्वारे पाठविण्याची सुविधा सुरू केली आहे. सदर सुविधेमुळे करदात्यांकडून देयके न मिळण्याबाबतच्या तक्रारी टाळता येणे शक्य होणार आहे. तसेच आतापर्यंत नोंदणी करण्यात आलेल्या एकूण ४.२४ लाख करदात्यांना त्यांची मालमत्तांची देयके Email द्वारे पाठविण्यात आलेली आहेत. |

### ४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
| --- | --- | --- | --- |
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | २.७९ | १६.४६ | ८.९० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ३५४.०४ | ८७.२० | ४०४.१९ |
| एकूण | ३५६.८३ | १०३.६६ | ४१३.०९ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**कार्यानुरुप अहवाल २०२४-२५**

# विकास नियोजन खाते

१. **प्रस्तावना** :

मुंबईच्या विकासासाठी, नियोजन आराखडयात शाळा, दवाखाने, रस्ता रुंदीकरण, उद्याने, मंडया, नाटयगृहे इत्यादींसारख्या विविध हेतूंसाठी भूखंड राखून ठेवलेले / आरक्षित केलेले असतात. महानगरपालिकेचे विकास नियोजन खाते विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठी आरक्षित भूखंड संपादन करण्याचे काम पार पाडते व त्याद्वारे नियोजन आराखडयाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते.

**विकास नियोजन खात्याची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.**

- शहर आणि उपनगरांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्राधान्याने करावयाच्या विकास कामांसाठी मुंबईतील विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठीचे भूखंड संपादित करणे.
- इमारती/मोकळया जागांचा विकास करण्याच्या कार्यक्रमांचे, विकास नियंत्रण नियमावलींची काटेकोरपणे पूर्तता व्हावी या दृष्टिकोनांतून नियमन करणे.
- महानगरपालिकेचे विकास नियोजन हे खाते बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विकासासंबंधी निर्णय घेते. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात या खात्याची भूमिका महत्त्वाची आहे. या खात्याला शहराच्या भविष्यातील गरजांचाही विचार करून शहराची सध्याची तसेच भविष्यकालीन विकासात्मक धोरणे तयार करावी लागतात.

**या खात्यामार्फत खालील नमूद कामे हाती घेण्यात येतात.**

१ .मंजूर विकास आराखडयाची अंमलबजावणी करणे.

२ .महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतूदींनुसार बंधनकारक असल्यानुसार विकास आराखडयाची पुनर्रचना.

३ .भूसंपादन

४ .नगर रचना योजना व आवश्यकतेनुसार नगर रचना योजनेत फेरबदल करणे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार नगर रचना विभाग बृहन्मुंबईच्या सेवेत नगर रचना तयार करण्याच्या कामाशी संबंधित आहे. बृहन्मुंबईत एकूण ३३ नगर रचना योजना असून, यापैकी ४ शहरात, २५ उपनगरात व ४ विस्तारीत उपनगरात आहेत.

२.	**खात्याची ठळक उद्दिष्टये व ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्टये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **ऐच्छिक कर्तव्यांच्या आरक्षित भारग्रस्त जमिनीवरील भूसंपादन** | (एक) आरक्षण अंतर्गत आवश्यक कर्तव्य (बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६१ अंतर्गत भूसंपादन) | ३७२.३० | १०६.४६ |
| | | (दोन) आरक्षण अंतर्गत विवेकी कर्तव्य (बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६३ अंतर्गत भूसंपादन) | ६६४.४० | ९.७७ |
| २. | **विकास नियोजन खात्याच्या संपूर्ण कामकाजामध्ये अधिक गतिमानता व पारदर्शकता आणणे** | (एक) इमारत प्रस्ताव परवानग्या व विकास आराखडा यांच्या अभिलेखांचे डिजिटलायजेशन | १.२० | --- |
| | | (दोन) सागरी क्षेत्राच्या व्यवस्थापनाचा नकाशा तयार करणे | १.०० | --- |
| | | (तीन) विकास नियोजन खात्याच्या वडाळा, विक्रोळी, जोगेश्वरी, कांदिवली कार्यालयांचे आधुनिकीकरण | २.०९ | --- |
| | | (चार) इमारत प्रस्तावांची ऑटो डीसीआर आणि बीपीएएमएस सॉफ्टवेअरच्या अंमलबजावणीमार्फत ऑटो स्क्रुटीनी | ३.७५ | १.९१ |
| | | (पाच) विकास आराखड्यामध्ये सुधारणा | १.०० | ०.०१ |

## ३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | सन २०१४-२०३४ या कालावधीकरीता विकास आराखडा पुनर्रचना | **प्रारुप विकास आराखडा (२०३४)**<br>बृहन्मुंबईचा प्रारूप विकास आराखडा २०३४, शासनाने बृहन्मुंबई प्रारूप विकास योजनेस शासन अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/विनि/नवि-११ दि.०८.०५.२०१८ अन्वये सदर अधिसूचनेअन्वये दोन भागांमध्ये मंजूरी दिलेली असून, सदर मंजूरीतून वगळलेले सारभूत स्वरूपाचे फेरबदल (इ.पी.) परिशिष्ट-ब मध्ये नमूद केले आहेत. परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या सारभूत स्वरूपाचे प्रस्तावित फेरबदलावर (इ.पी.) शासनामार्फत टप्प्याटप्प्याने मंजूरी देण्यात येत आहे. **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हस्तांतरित केलेल्या तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडा (२०३४) चे प्रकाशन**<br>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील वांद्रा कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रातील मिठी नदी आणि लालबहादूर शास्त्री मार्ग यामधील एल विभागातील क्षेत्र, वांद्रा-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रातील 'अ ब्लॉक'चे एच/पश्चिम विभागातील क्षेत्र आणि ओशिवरा जिल्हा केंद्राच्या अधिसूचित क्षेत्रातील स्वामी विवेकानंद रस्त्याच्या पश्चिमेकडील के/पश्चिम विभागातील क्षेत्र हे तीन क्षेत्र राज्य शासनाच्या आदेशानुसार एमएमआरडीएने बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केले. हया तीन क्षेत्रांचा प्रारुप विकास आराखडयास शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीबी/४३१८/४८४/प्र.क्र.४४/२०२२/नवि-११ दि.२२.०४.२०२३ अन्वये सदर अधिसूचने सोबतचे ''परिशिष्ट ब'' मध्ये दर्शविण्यात आलेला सारभूत स्वरुपाचा फेरबदल (इ.पी) वगळता ''परिशिष्ट अ'' मध्ये दर्शविलेल्या 'एसएम-०२ ते एसएम-२२' बाबत सुधारणेसह मंजूरी दिली आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | **विकास आराखडा २०३४ ची अंमलबजावणी**<br>विकास आराखडा हा जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी महत्वाचे साधन आहे. ज्या अंतर्गत पायाभूत सुविधांसोबत उद्याने, तरणतलाव, क्रीडासंकुल, मनोरंजन मैदाने इत्यादींचा समावेश होतो.<br>विविध विकास नियोजन आराखड्यातील सार्वजनिक उद्दीष्टांकरीता असलेल्या आरक्षणाचा विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील 'समायोजन आरक्षण' या अंतर्गत करणे. विविध आरक्षणे 'विकास हक्क हस्तांतरण' या माध्यमातून महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन जनतेच्या वापरासाठी उपलब्ध करणे. तसेच काही आरक्षित जागा भूसंपादनाच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन जनतेच्या वापरासाठी उपलब्ध करणे.<br>भूसंपादनासाठी दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पामध्ये सुध्दा तशी तरतूद प्रस्ताविली आहे.<br>अशाप्रकारे वर नमूद विविध तरतूदीच्या आधारे विकास आराखडा अंतर्गतच्या प्रकल्पांवर संनियंत्रण करणे आणि अंमलबजावणी करणे शक्य झाले आहे.<br>विकास आराखडा अंमलबजावणी अंतर्गत मंजूर पुनर्रचित विकास आराखडा १९९१ मधील पुढे कायम ठेवलेली आरक्षणे आणि विकास आराखडा २०३४ मध्ये नव्याने प्रस्ताविलेले सुविधा भूखंड विकसित करण्याच्या दृष्टीने वर नमूद केल्यानुसार कार्य सुरू आहे. यामध्ये क्रीडांगणे, उद्याने, दवाखाने, रुग्णालये, स्मशानभूमी, कचरा वर्गीकरण व प्रक्रिया केंद्रे, अग्निशमन केंद्रे, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी बहुउद्देशीय वसतिगृह, बेघरांसाठी निवारा क्रेंदे, आधार केंद्रे, पाळणा घर, महानगरपालिका मंडया, महानगरपालिका चौक्या, रस्ते डेपो इत्यादी सुविधा संबंधीत वापरकर्त्या विभागाकडून विकसित करण्यात येतील. |

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती</th><th>सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती</th></tr>
<tr><td>२.</td><td>विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या तरतूद क्र.३२ नुसार विकास हस्तांतरणीय हक्काद्वारे मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध झालेल्या आरक्षणाखालील जमिनीबाबतचा तपशील</td><td>सन २०२३-२४ या कालावधीत खालीलप्रमाणे आरक्षणाखालील जमीन विकास हक्क हस्तांतरणाद्वारे महानगरपालिकेस उपलब्ध झाली आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>आरक्षण</th><th>प्रकरणे</th><th>क्षेत्रफळ (चौ.मी.)</th></tr>
<tr><td>१</td><td>मनोरंजन मैदान</td><td>०१</td><td>४७९.८०</td></tr>
<tr><td>२</td><td>विकास नियोजन रस्ता</td><td>३३</td><td>६७,७०७.०७</td></tr>
<tr><td>३</td><td>क्रीडांगण</td><td>०६</td><td>३०,८८४.२०</td></tr>
<tr><td>४</td><td>इतर सुविधा (खुली जागा, वसाहत, नाला, बेस्ट बस सुविधा, बगीचा)</td><td>११</td><td>२३,२४६.८०</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>५१</td><td>१,२२,३१७.८७</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३.</td><td>विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या शिफारशीनुसार देण्यात आलेले विकास हक्क प्रमाणपत्र</td><td><table>
<tr><th>प्राधिकरण</th><th>प्रकरणांची संख्या</th><th>क्षेत्रफळ (चौ.मी.)</th></tr>
<tr><td>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण</td><td>४५</td><td>५७,२७७.९२</td></tr>
</table>
सन २०२३-२४ चा छाननी शुल्का अंतर्गत प्राप्त महसूल- एकूण रूपये ९६,२७,११०/-</td></tr>
<tr><td>४.</td><td>इमारत प्रस्ताव संगणक प्रणालीद्वारे मंजूर करण्याबाबत</td><td>सन २०२३-२४ या वर्षात संगणक प्रणालीद्वारे (Auto DCR) ३२५८ (Concessions) प्रस्ताव प्राप्त झाले. त्यापैकी २५३३ प्रस्तावांना महानगरपालिका आयुक्त यांचे स्तरावर आवश्यक असणाऱ्या मंजूऱ्या देण्यात आल्या आहेत.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>तपशील</th><th>मंजूर प्रस्तावांची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>आराखडे मंजूरी सोबत दिलेल्या आक्षेपांची यादी (आय.ओ.डी.) (I.O.D) (८७६ प्राप्त)</td><td>७८४</td></tr>
<tr><td>२</td><td>कार्यारंभ प्रमाणपत्र (सी.सी.) (First CC & Further C.C.) (२७०८ प्राप्त)</td><td>२६४९</td></tr>
<tr><td>३</td><td>भोगवटा प्रमाणपत्र (COC+B.C.C.) (१२३१ प्राप्त)</td><td>१०३९</td></tr>
</table></td></tr>
</table>

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | सदर प्रणालीद्वारे इमारत प्रस्ताव विभागाकडे येणारे प्रस्ताव ऑनलाईन वर प्राप्त होतात व त्यावर रिपोर्ट, स्क्रूटीनी व मंजूऱ्या ऑनलाईन दिल्या जात आहेत. |
| ५. | विकास नियोजन खात्यामार्फत भूसंपादनाच्या प्रकरणांमध्ये भूमालकांकडून खरेदी सूचना प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या भूसंपादनाच्या/ उपलब्ध झालेल्या मोकळ्या जागा/उपलब्ध झालेल्या बाधित, सदनिका, शाळा, ग्रंथालय, इमारत, इस्पितळे कार्यवाहीबाबत. | **शहर**<br>**ई विभाग**<br>१) भू.क्र.७२०(भाग), माझगाव विभाग येथील महानगरपालिका दवाखाना १६२.१४ चौ.मी. दि.२३.०८.२०२३ रोजी हस्तांतरीत करण्यात आले.<br>२) भू.क्र.२०२० भायखळा विभाग (EWS/IH) येथील एकूण – ५२ पीएपी दि.२९.११.२०२३ रोजी हस्तांतरीत करण्यात आले. (In lieu of FSI)<br>३) भू.क्र.२५४ (पै) माझगाव विभाग येथील ६०० चौ.मी. दि.०८.०१.२०२४ आरोग्य केंद्राला ३ खोल्या हस्तांतरीत करण्यात आले.<br>४) भू.क्र.२०२० भायखळा विभाग येथील ५% (Open Space) सुविधा भूखंड, ३३५.३५ चौ.मी. दि.२६.०६.२०२४ रोजी हस्तांतरीत करण्यात आले (In lieu of FSI)<br>**एफ/उत्तर विभाग**<br>१) भू.क्र.२A/११६ व ४/११६, सॉल्ट पॅन विभाग, एफ/उत्तर येथील ५% सुविधा भूखंड (५% Amenity Open Space) ९३३.३५चौ.मी.दि.२८.०८.२०२३ रोजी संपादित करण्यात आला. (In lieu of FSI)<br>२) न.भू.क्र.१२/११६,सॉल्ट पॅन विभाग, एफ/उत्तर येथील उद्यान/बगीचा (ROS १.५) Garden/Park, २७२२.१३ चौ.मी.क्षेत्रफळ व ५% सुविधा भूखंड (५% Amenity Open Space) २२८.९७ चौ.मी.क्षेत्रफळ दि.२६.०४.२०२३ रोजी संपादित केले. (In lieu of FSI)<br>३) न.भू.क्र.६ (भाग), सायन विभाग एफ/उत्तर येथील एकूण ३२९९.१९ चौ.मी.तळमजला ७ मजले असलेली मार्केट करीताची इमारतीचा ताबा दि.०५.०६.२०२४ रोजी संपादित करण्यात आला. (In lieu of FSI)(SRA)<br>**जी/दक्षिण विभाग**<br>१) न.भू.क्र.२४२, लोअर-परेल, जी/द विभाग रस्त्याकरीता क्षेत्रफळ २५४६ चौ.मी. क्षेत्रफळ दि.१८.०४.२०२४ रोजी संपादित केला. (In lieu of TDR) |

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती</th><th>सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती</th></tr>
<tr><td></td><td><u>भूसंपादन</u> :-न.भू.क्र ५३७ (भाग) मौजे मागठाणे, आरक्षण १८.३० मी.रूंद रस्ता रेषा, क्षेत्रफळ १८० चौ.मी., ताबा अद्याप प्राप्त नाही. दि.२५.०९.२४ रोजी कार्यारंभ आदेश प्राप्त, रू.५,१३,१७४/- व रू.३७,६३०/- (RTGS) व रू.२०,१०५/- (DD)</td><td>
पश्चिम उपनगरे विभाग<br>
<u>आर/मध्य विभाग</u><br>
चटईक्षेत्र निर्देशांक - (FSI)
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>न.भू.क्र.</th><th>आरक्षण</th><th>क्षेत्रफळ (चौ.मी)</th><th>ताबा पावती दिनांक</th></tr>
<tr><td>१.</td><td>४७१ व ३३७ मौजे बोरिवली</td><td>महानगरपालिका मंडई</td><td>५६१.३०</td><td>१५.०५.२४</td></tr>
<tr><td>२.</td><td>३२०/ब व ३५१/क/२ मौजे बोरिवली</td><td>सदनिका</td><td>३५२.९२</td><td>२०.०८.२४</td></tr>
<tr><td>३.</td><td>१०७/ई (भाग), १४०अ (भाग), १४१(भाग) व १४२ (भाग) मौजे मागाठाणे</td><td>१८.३० मी.रूंद डि.पी.रोड</td><td>२०७३.१८</td><td>१३.०९.२४</td></tr>
<tr><td>४.</td><td>अंतिम भू.क्र.१७९ बोरिवली टिपीएस क्र.३ (पॉलिसी अन्वये)</td><td>महाविद्यालय</td><td>४१४० (बांधिव क्षेत्रफळ)</td><td>०३.०१.२४</td></tr>
<tr><td>५.</td><td>२३९३, २३९३/१ ते ११ मौजे एक्सर व ३९५/क व ३९१ मौजे बोरिवली</td><td>बगीचा/उद्यान</td><td>२३०७.९०</td><td>१८.०८.२३</td></tr>
<tr><td>६.</td><td>३७४ब/२३ मौजे एक्सर</td><td>खेळाचे मैदान</td><td>८६०.२३</td><td>२४.०८.२३</td></tr>
<tr><td>७.</td><td>२८२/३,२८२/४, २८२/५,२८२/६, २८२/७,२८२/८ २८२/९ मौजे बोरिवली</td><td>खेळाचे मैदान/ बगीचा/उद्यान, रोड सेटबॅक, माध्यमिक शाळा</td><td>४६०८.९४</td><td>०८.०९.२३</td></tr>
<tr><td>८.</td><td>१५/फ/३, १५/ग/३, १५/इ/२,१५/फ/२ व १५/ग/२ मौजे कांदिवली</td><td>खेळाचे मैदान व डि.पी. रस्ता</td><td>३५६५.७६</td><td>२७.०२.२४</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती</th><th>सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती</th></tr>
<tr><td></td><td><u>भूसंपादन</u>: निरंक</td><td>
<u>आर/दक्षिण विभाग:-</u>
<table>
<tr><th>आर/दक्षिण विभाग</th><th>एकूण हस्तांतरित जागा</th><th>हस्तांतरित झालेले क्षेत्रफळ</th></tr>
<tr><td>सक्तीचे भूसंपादन</td><td>-</td><td>-</td></tr>
<tr><td>चटईक्षेत्र निर्देशांक</td><td>-</td><td>-</td></tr>
<tr><td>समावेश आरक्षण</td><td>०५</td><td>१४१८२.०४</td></tr>
<tr><td>शासनाचे भूखंड</td><td>-</td><td>-</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>०५</td><td>१४१८२.०४</td></tr>
</table>
<u>आर/उत्तर विभाग:-</u>
<table>
<tr><th>आर/उत्तर विभाग</th><th>एकूण हस्तांतरित जागा</th><th>हस्तांतरित झालेले क्षेत्रफळ</th></tr>
<tr><td>सक्तीचे भूसंपादन</td><td>-</td><td>-</td></tr>
<tr><td>चटईक्षेत्र निर्देशांक</td><td>०४</td><td>१९५९.९३</td></tr>
<tr><td>समावेश आरक्षण</td><td>०१</td><td>१८५.३६</td></tr>
<tr><td>शासनाचे भूखंड</td><td>०१</td><td>८७५.३०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>०६</td><td>३०२०.५९</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | **भूसंपादन**: निरंक | **पी/दक्षिण विभाग:-** |

**चटईक्षेत्र निर्देशांक - (FSI)**

| अ. क्र | न.भू.क्र. | आरक्षण | क्षेत्रफळ (चौ.मी) | ताबा पावती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | ५९६/एफ(भाग), पहाडी, गोरेगांव (पू) | खेळाचे मैदान/उद्यान (ROS 1.5) | ११७०७.२६ | १०.०६.२४ |
| २. | १०६९/अ/अ/१ आणि १०६९/अ/ब/१ (नवीन न.भू.क्र. १०६९/अ/१/अ/२ ) मालाड (द) | १०% मोकळी सुविधा | ३५८.८० | ३१.०७.२४ |
| ३. | ४४०,४४०/१,४४०/२,४४०/३ आणि ४४०/४ (नवीन न.भू.क्र. ४४०/सी) गोरेगांव (पू) | १३.४० मी.रूंद डि.पी. रोड | २०.६८ | ०९.०७.२४ |
| ४. | ९०५,९०५/१ ते १५ (नवीन न.भू.क्र. ९०५/ब) पहाडी, गोरेगांव (प) | ५% मोकळी सुविधा | २०७.५७ | २८.०८.२४ |
| ५. | ६०२अ/१अ/४अ/१/ब मालाड (पू) | खेळाचे मैदान (ROS 1.4) | १२६६.७० | ०३.०९.२४ |
| ६. | ५०/एफ,पहाडी गाव, गोरेगांव (पू) | १२.२० मी. रूंद डि.पी. रोड | १०२४.८० | २२.१०.२४ |

**पी/उत्तर विभाग:-**

| अ. क्र | न.भू.क्र. | आरक्षण | क्षेत्रफळ (चौ.मी) | ताबा पावती दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | ३३४/अ/३(भाग) | मोकळी सुविधा | ४८०.१० | २९.०७.२४ |
| २. | ११८ के | प्राथमिक / माध्यमिक शाळा | १५३९.९५ | ०२.०७.२४ |
| ३. | ३२८,३२९ | वेडिंग झोन सह किरकोळ बाजार | २७३.२५ | २५.०७.२४ |

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती</th><th>सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती</th></tr>
<tr><td></td>
<td>
<u>भूसंपादन</u>: महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील अधिनियम १२६ (१) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागाच्या मंजूर विकास आराखडा २०३४ मधील न.भू.क्र.१९९ (पै) मौजे अंधेरी या भारतीय विमानतळ प्राधिकरण (Airport Authority of India) यांच्या मालकीच्या भूखंडावरील विकास नियोजन रस्ता क्र.१ (A-B) या १८.३० मी. रूंदीच्या विकास नियोजन रस्त्याच्या अंदाजे ९२९६.४० चौ.मी. क्षेत्राचे रू.९९,०८,१०,३१२/- एवढ्या रकमेच्या मोबदल्यात हस्तांतरण (Transfer) करण्याच्या प्रस्तावास प्रशासक (सुधार समिती) यांची ठराव क्र.९१ दि.०७.०३.२०२४ व प्रशासक (महानगरपालिका) यांची ठराव क्र.१५६४ दि.०७.०३.२०२४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर क्षेत्राचा आगाऊ ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दि.०१.०८.२०२४ रोजी घेण्यात आला.
<u>भूसंपादन</u>:- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागाच्या मंजूर विकास आराखडा २०३४ मधील न.भू.क्र.५२५क मौजे विलेपार्ले (पूर्व) येथील ७१३.६० चौ.मी. खेळाचे मैदान आरक्षण असलेल्या भूखंडाचा ताबा दिनांक १३.०८.२०२४ रोजी महानगरपालिकेस हस्तांतरित झाला.
</td>
<td>
<u>के/पश्चिम विभाग:-</u>
चटईक्षेत्र निर्देशांक - (FSI)
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>न.भू.क्र.</th><th>आरक्षण</th><th>क्षेत्रफळ (चौ.मी)</th><th>ताबा पावती दिनांक</th></tr>
<tr><td>१.</td><td>१३७४ब/४७३ मौजे वर्सोवा</td><td>महानगरपालिका किरकोळ मंडई</td><td>३६६.१६</td><td>२२.०७.२४</td></tr>
<tr><td>२.</td><td>६५४ मौजे ओशिवरा</td><td>व्यावसायिक बांधीव सुविधा</td><td>१००.५०</td><td>०५.०७.२४</td></tr>
<tr><td>३.</td><td>६७६ मौजे ओशिवरा</td><td>१०% मोकळी सुविधा</td><td>२७९.००</td><td>०३.०९.२४</td></tr>
</table>
<u>के/पूर्व विभाग:-</u> <u>चटईक्षेत्र निर्देशांक</u>
<table>
<tr><th>अ. क्र</th><th>न.भू.क्र.</th><th>आरक्षण</th><th>क्षेत्रफळ (चौ.मी)</th><th>ताबा पावती दिनांक</th></tr>
<tr><td>१.</td><td>९०अ (भाग), ९०/ब, ८९अ/३ (भाग), मौजे मुळगाव</td><td>५% बांधीव सुविधा</td><td>५०.३०</td><td>२२.०४.२४</td></tr>
<tr><td>२.</td><td>७७८/अ/१, मौजे मरोळ</td><td>५% बांधीव सुविधा</td><td>१०१.५१</td><td>१३.०५.२४</td></tr>
<tr><td>३.</td><td>१९८/ड, १९८/इ, मौजे मोगरा</td><td>१८.३० मी.रूंद विकास नियोजन रस्ता, १८.३० मी.रूंद रस्तारेषा</td><td>१६९४.२२</td><td>१४.०५.२४</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|

**के/पूर्व विभाग:- चटईक्षेत्र निर्देशांक**

| अ. क्र | न.भू.क्र. | आरक्षण | क्षेत्रफळ (चौ.मी) | ताबा पावती दिनांक |
|---|---|---|---|---|
| ४. | ३६५/अ, मौजे मोगरा | २७ रहिवाशी सदनिका (परवडणारी घरे बांधीव सुविधा) | ११०९.२२ | १५.०५.२४ |
| ५. | १८२/क/२, मौजे मोगरा | महानगरपालिका प्रसुतीगृह बांधीव सुविधा (विनिमय १७) | १०९५.८३ | २५.०७.२४ |
| ६. | ४१९(भाग), ४२६ (भाग),मौजे विलेपार्ले | खेळाचे मैदान | १२३.५५ | ०५.०८.२४ |
| ७. | ९०/क/ब, मौजे मोगरा | रस्ता | ३१२.४० | २०.०८.२४ |
| ८. | ५७,५८,१०० मौजे कोंडीवाटा | महानगरपालिका मंडई बांधीव सुविधा (विनियम १७) | २०४२.६२ | २७.०९.२४ |
| ९. | १८ (भाग),मौजे चकाला | मोकळा सुविधा भूखंड (AOS) | २८९.३७ | ०७.१०.२४ |

**पूर्व उपनगरे विभाग**

**एल विभाग**

१. मौजे कुर्ला- २, येथील न.भू.क्र.४४३,४४३/१ ते ४४२/६ १८.३० मी.रूंद विकास नियोजन रस्त्याकरिता आरक्षित भूखंडाचा १५.३० चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.

२. मौजे मोहिली येथील न.भू.क्र.८३७ या (RMS 1.3) महानगरपालिकेकरीता सुविधा व ५% सुविधा भूखंडाकरीता आरक्षित ५०१.१३ चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.

३. मौजे चांदिवली येथील न.भू.क्र.१ड या (ROS 1.5) बगीचा/उद्यान करीता आरक्षित भूखंडाचा ३५७७.५० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.

४. मौजे तुंगवा येथील न.भू.क्र.९४इ या (१३.४० मी.रूंद विकास नियोजन रस्त्याकरीता) आरक्षित भूखंडाचा १०७६.६० चौ.मी इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | ५. मौजे मोहिली येथील न.भू.क्र.४/२ या (RMS 1.3) महानगरपालिकेकरीता सुविधा व ५% सुविधा भूखंडाकरीता आरक्षित ५०१.१३ चौ.मी.इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.<br>**<u>'एम/पूर्व' विभाग</u>**<br>१. न.भू.क्र.३९६, ३९८ मौजे बोर्लोवरील रहिवाशी इमारतीमधील ३ सदनिका ज्यांचे एकत्रित क्षेत्रफळ ७५.०३ चौ.मी. आहे.<br>२. न.भू.क्र.२५४/ब (भाग) मौजे देवनार वरील १०% सुविधा भूखंड (AOS) क्षेत्रफळ २५२.०३ चौ.मी. व ९.१५मी. रूंद रस्त्याचा सेटबॅक क्षेत्रफळ ४.२१ चौ.मी. आहे.<br>३. न.भू.क्र.३७३, ४०५, ४०६, ४०८ मौजे बोर्लावरील अस्तित्वातील ४० मी रूंद ईस्टर्न फ्रीवे करीता आरक्षित भूखंड ज्याचे क्षेत्रफळ ७२८४.१० चौ.मी. आहे.<br>४. न.भू.क्र. २८४अ मौजे देवनारवरील ५% सुविधा भूखंड (AOS) क्षेत्रफळ ९६.८८ चौ.मी. आहे.<br>५. न.भू.क्र.६/१ब/३ मौजे मंडाळेवरील अस्तित्वातील ३६.६० मी.रूंद रस्त्याचे ७५०० चौ.मी.आहे.<br>**<u>'एम/पश्चिम' विभाग</u>**<br>१. मौजे चेंबूर येथील न.भू.क्र.३९१ब या ९.१५ मी.रुंद डी.पी.रस्त्याने बाधित भूखंडाचा ३४.४०चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.<br>**<u>'एन' विभाग</u>**<br>१. मौजे घाटकोपर येथील न.भू.क्र.१८४ सी (भाग) व मौजे विक्रोळी येथील न.भू.क्र.१/अ (भाग) या बांधीव सुविधेचे महानगरपालिका प्राथमिक शाळा भूखंडाचा ७७१.१६ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे.<br>२. मौजे घाटकोपर किरोळ येथील न.भू.क्र.२२४४ ते २२४९ या ६.१ मी डी.पी. रस्त्याने बाधीत भूखंडाचा १८६.२५ चौ.मी इतक्या क्षेत्रफळाचा ताबा घेतला आहे. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| | | **‘एस’ विभाग**<br>१. मौजे कांजूर (पूर्व) येथील न.भू.क्र.१००७ (भाग), १००८ (भाग), १००९/१ अस्तित्वातील १८.३० मी. रूंद डी.पी. रस्त्याचे (१२४२.५० चौ.मी.) रूंदीकरण<br>२. मौजे हरीयाली (पूर्व) येथील न.भू.क्र.११८/२ (जुना), ११८ सुविधा भूखंडाचा ताबा, क्षेत्रफळ (३६५.३३चौ.मी.)<br>३. मौजे भांडूप (प) येथील न.भू.क्र.२९५,२९५/१ ते २९५/४ प्रस्तावित १८.३० मी.रूंद वळणासहीत डी.पी. रस्त्याचा ताबा घेतला आहे. (क्षेत्रफळ १०६०.७० चौ.मी.)<br>४. मौजे तिरंदाज येथील न.भू.क्र.१०१/२ (पै.), सर्व्हे नं ३८ (पै.) सुविधा भूखंडाचा (Amenity Area) ताबा, (क्षेत्रफळ ४९५८ चौ.मी.)<br>५. मौजे भांडूप (प) येथील न.भू.क्र.२०६/३, (जुना न.भू.क्र. २०६ डी) प्रस्तावित १२.२० मी.रूंद रस्त्याचे रूंदीकरण (क्षेत्रफळ ३७७.९१ चौ.मी.)<br>**‘टी’ विभाग**<br>१. न.भू.क्र.७५८ (भाग) मौजे मुलुंड (पश्चिम) येथील आरक्षित भूखंड RSA 1.2 (खुले विक्री क्षेत्र असणारी मंडई), ५९८.९४ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा ताबा दि.०९.०५.२०२३ रोजी घेण्यात आलेला आहे.<br>२. न.भू.क्र. ७०६/ब/ड, ७१०अ, ७१२अ, ७६२अ आणि ७६३अ मौजे नाहूर येथील आरक्षित भूखंड ROS 1.5 (बगीचा/उद्यान), १७९५८.८० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा ताबा दि.०८.०६.२०२३ रोजी घेण्यात आलेला आहे.<br>३. न.भू.क्र. ४९१/अ/५/३ मौजे नाहूर येथील आरक्षित भूखंड RMS 3.1 (घनकचरा व्यवस्थापन सुविधा), १७९५८.८० चौ.मी इतक्या क्षेत्रफळाचा ताबा दि.२८.०८.२०२३ रोजी घेण्यात आलेला आहे.<br>४. न.भू.क्र.४८१,४८२,४८५ व ४८६ २/८ (भाग), मौजे मुलुंड (पू) जो RH 1.2 रुग्णालयातील आरक्षित आहे. भूखंडाचे क्षेत्रफळ ६७६.६८ चौ.मी. व सुविधा इमारतीचे क्षेत्रफळ ८४५.४७ चौ.मी इतक्या क्षेत्रफळाचा ताबा दि.३०.०८.२३ रोजी घेण्यात आलेला आहे. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | १२५०.०० | ९६.६२ | ८००.०० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ७०.१९ | १३२.२६ | ८०.४७ |
| एकूण | १३२०.१९ | २२८.८८ | ८८०.४७ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल २०२४-२५

# सुरक्षा खाते

१. **प्रस्तावना** :

सन १९६६ मध्ये मुंबई महानगरपालिका सुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली. महानगरपालिकेच्या मालमत्ता उदा. इमारती, कार्यालये, रुग्णालये, उद्याने, पाण्याचे तलाव, धरणे, माता - बाल संगोपन केंद्र इत्यादींचे संरक्षण करणे हे सुरक्षा खात्याचे अनिवार्य कर्तव्य आहे. शहरामध्ये काही आपत्तीजनक अथवा गंभीर तणावपूर्वक परिस्थिती निर्माण झाल्यास हे सुरक्षा दल नियंत्रण व्यवस्थेमध्ये प्रमुख भूमिका पार पाडते. महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या ठिकाणी प्रवेश करणा-या व्यक्ती व वस्तूंची तपासणी व संरक्षण या दलाच्या स्त्री व पुरुष सुरक्षा रक्षकांकडून केली जाते.

भांडुप कॉम्प्लेक्स येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. बृहन्मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनची सुरक्षा करण्यासाठी सुरक्षा दलाचे गस्त पथक अहोरात्र कार्यरत असते. त्याचप्रमाणे घन कचरा व्यवस्थापन कार्ये, अतिक्रमण निर्मूलन अशा ठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरविणे, अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करणे, महापालिका कर्मचा-यांचा संप, मोर्चे, निदर्शने, महानगरपालिका निवडणुकामधील सुरक्षा व्यवस्था, महानगरपालिकेच्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे संरक्षण, महानगरपालिकेच्या रोख विभागाची व त्या विभागाच्या वाहनांची सुरक्षा इत्यादी कामे सुरक्षा दलाकडून यथोचितरित्या पार पाडली जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या जुन्या इमारतीमध्ये तसेच महानगरपालिकेच्या २३ विभाग कार्यालयांमध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये व विभाग कार्यालये अशा एकूण दहा आस्थापनीय कार्यालयांना एक्स-रे बॅगेज स्कॅनिंग मशिन कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता, प्रमुख रूग्णालये व सर्वसाधारण रुग्णालये व नव्याने निर्माण झालेली आस्थापनीय कार्यालये तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रूग्णालये, प्रसुतीगृहे, माता बाल संगोपन विभाग इत्यादी ठिकाणी नव्याने निर्माण झालेले अतिरिक्त विभाग व देवनार क्षेपणभूमी आणि कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या मागणीनुसार हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना येथील सुरक्षा व्यवस्थेकरीता खाजगी सुरक्षा मदतनीस तसेच महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी कॉर्पोरेशन व सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयाकरिता यांच्याकडून खाजगी सुरक्षा रक्षक नियुक्त

करण्यात आले आहेत. तसेच अग्निशमन केंद्रांमध्ये गेट पहाऱ्यावरील फायरमनच्या जागी खाजगी सुरक्षा मदतनीस नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच ‘एम/पूर्व’ व ‘एम/पश्चिम’ विभागात एम.एम.आर.डी.ए.ने प्रकल्पग्रस्तांसाठी बांधलेल्या इमारतीच्या सुरक्षेसाठी खाजगी सुरक्षा मदतनीस नियुक्त करण्यात आले आहेत.

## २. खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **महानगरपालिका मालमत्तांची सुरक्षितता वाढविणे** | (एक) सुधारित संनिरीक्षणासाठी महानगरपालिकेची महत्त्वाची कार्यालये आणि रुग्णालयांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविणे | ७.०४ | ★ ८.१७ |
| | | (दोन) खाजगी सुरक्षा रक्षकांचे भाडे आकार | ८०.०० | ७३.८० |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.११.८४ कोटी

**३. सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका मालमत्तांची सुरक्षितता वाढविणे | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध आस्थापनांना कार्यान्वित करण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणा सी.सी.टी.व्ही., डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, एक्स-रे बॅगेज स्कॅनिंग मशिन इत्यादींच्या बहुव्यापक वार्षिक परिरक्षण करण्यात आले आहे. |
| २. | सुरक्षा दलाच्या कर्मचारी वर्गाच्या क्षमतेमध्ये वाढ करणे | भांडूप संकुल येथे सदर प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येते. सहाय्यक सुरक्षा अधिकारी वर्गाची रिक्त पदे सरळ सेवा भरती पद्धतीने भरण्याकरिता अर्हता निश्चित करण्यात आलेली असून बिंदू नामावली तयार करण्याचे कामकाज सुरू आहे. सदर बिंदु नामावली अंतिम झाल्यानंतर प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस सादर करण्यात आलेला आहे.<br>सुरक्षा दलातील सुरक्षा रक्षकांची मोठ्या प्रमाणातील रिक्त अनुसूचीत पदे व नव्याने निर्माण झालेली आस्थापना कार्यालये व रुग्णालये तसेच रुग्णालयातील अतिरिक्त विभाग इत्यादी महत्त्वाच्या ठिकाणी व पी.ए.पी.इमारती, इतर महत्त्वाच्या ठिकाणी खाजगी सुरक्षा मदतनीस व महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी कॉर्पोरेशन व सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयाकरिता यांच्याकडून खाजगी सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात आले आहेत.<br>सुरक्षा खात्यातील सुरक्षा अधिकारी वर्ग व सुरक्षा रक्षक वर्ग यांना गणवेष साहित्य खरेदी करून त्याचे वाटप करण्यात आले. |

**४. सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | १५.३१ | ७.४६ | १९.१० |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | २५३.१० | २२२.४० | २६०.५९ |
| एकूण | २६८.४१ | २२९.८६ | २७९.६९ |

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>कार्यानुरुप अहवाल २०२४-२५</u>

# सुधार योजना

१. **प्रस्तावना** :

महानगरपालिकेने १९३३ साली ताब्यात घेतलेल्या पूर्वीच्या मुंबई सुधार विश्वस्त मंडळाच्या मालमत्ता आणि इतर संपादित केलेल्या मालमत्ता यांचे परिरक्षण करणे ही बाब प्रामुख्याने सुधार योजनेमध्ये अंतर्भूत आहे. सदर योजनेबाबतची कार्यवाही सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या खात्यामार्फत पार पाडण्यात येते.

**सुधार योजनेची उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत**

- महानगरपालिकेच्या मालमत्तांचे व इतर संपादित मालमत्तांचा पुनर्विकास करणे.
- बी.आय.टी. चाळी, अर्धपक्क्या छपऱ्या आणि महानगरपालिका वसाहती यांच्या दुरुस्त्या आणि परिरक्षण करणे.

**या खात्याकडून पार पाडण्यात येणारी कामे खालीलप्रमाणे आहेत.**

१) माजी मुंबई सुधार विश्वस्त मंडळ आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या भूभागावरील बांधकाम/इमारती तसेच अनधिकृत बांधकाम यांची पाहणी करणे.

२) भूभाड्याची वसुली करुन त्यांचा लेखा अभिलेख जतन करणे.

३) महानगरपालिका कर्मचारी निवासस्थानांचे वाटप करणे.

४) उपरोल्लेखित गाळयांचे हस्तांतरण करणे.

५) संपूर्ण मालमत्ता खात्यातील कामगार/कर्मचाऱ्यांच्या कामावर आणि हालचालींवर विभागीय स्तरावर सर्वसाधारण देखरेख करणे /लक्ष ठेवणे आणि आस्थापनाविषयक कामे मुख्यालयामार्फत पार पाडणे.

६) माजी विश्वस्तांनी मक्त्याने दिलेल्या भूभागाच्या मक्त्याचे दस्तऐवज तयार करणे.

७) शहर आणि उपनगरीय रिक्त भूभागांची मालमत्तांची पहाणी करुन अभिलेख तयार करणे, भाडे वसूल करणे व इतर आवश्यक कार्यवाही.

**नवीन कामे** :

१) नवीन हस्तांतरण धोरणानुसार गाळयांचे मोठया संख्येने हस्तांतरण झालेले असून हस्तांतरण शुल्काद्वारे निधी महानगरपालिकेकडे जमा झाला आहे आणि तसे बरेच प्रस्ताव नव्याने कार्यान्वित करण्यात येत आहेत.

२) प्रकल्पग्रस्त व्यक्तींना वितरीत करावयाच्या सदनिकांचे झो.पु.प्रा. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प व एमएमआरडीए यांचेकडून हस्तांतरण करून घेणे.

३) बृहन्मुंबईच्या २०३४ च्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या नियम क्र.३३(७)/३३(९) अन्वये पुनर्बांधणी /पुनर्विकास योजनेची अंमलबजावणी करणे.

४) महानगरपालिकेच्या मालमत्ता खात्याच्या अखत्यारीतील इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण करणे व आवश्यक दुरुस्त्या, विभाग कार्यालय तथा इमारत परिरक्षण (बी.एम.) खात्याकडून करून घेणे.

५) सी-१ संवर्गातील धोकादायक इमारतींचे निष्कासन विभाग कार्यालयामार्फत होण्याकरिता पाठपुरावा करणे.

६) प्रकल्पबाधितांच्या इमारतींच्या एक वेळ दुरुस्त्यांकरिता (Exit Action Plan) धोरणानुसार पाठपुरावा करणे.

७) महानगरपालिका जमिनींवरील झोपडपट्टी पुनर्वसन प्रस्तावांवर ‘ना हरकत’ देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणे.

८) महानगरपालिकेकडे हस्तांतरण होणाऱ्या प्रकल्पबाधितांसाठी रहिवासी सदनिका तसेच बाधित व इतर आरक्षणाबाबतची माहिती ही संगणकीय प्रणालीमार्फत संकलन व जतन करण्याकरिता पुनर्वसन व पुनर्स्थापन (R&R Cell) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

**महसूल वसूली अहवाल (सन २०२३-२४):-**

१) मक्ता हस्तांतरण अधिमूल्य रू.८३.९७ कोटी

२) मक्ता नूतनीकरण व भूईभाडे रू.४१.२१ कोटी

३) मक्ता भूभगावरील इमारतींच्या पुनर्विकासासाठी एकवेळ अधिमूल्य रु.२६७.२४ कोटी

तसेच लग्न, समारंभ, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मक्त्याने दिलेल्या भूभागांवरील सभागृह व मोकळया जागांमधून मिळणारे उत्पन्न दि.०१.०४.२०२२ पासून रु.४०,०००/- ऐवजी रु.१,५०,०००/- प्रति सभागृह करण्यात आले आहे. या सुधारणेमुळे महानगरपालिकेला अधिक महसूल मिळत आहे.

**पुनर्विकासातून महसूल**

महानगरपालिकेच्या भाडेकरुन मालमत्तांच्या पुनर्विकासातून

१) सन २०२३-२४ रु.१५४ कोटी

२) सन २०२४-२५ रु.१५१ कोटी

**तांत्रिक सुधारणा आणि नवीन प्रणाली**

दि.१ एप्रिल २०२३ पासून R.E.मॉडयुल प्रणाली कार्यान्वित केली आहे, ज्यामध्ये मक्ता भूभागांचे तपशील, भुईभाडे आणि अतिरिक्त भूखंडांच्या वसुलीसाठी सोय करण्यात आली आहे.

**प्रस्तावित धोरणे**

१) फरसबंद (Fungible) भरपाई चटईक्षेत्रासाठी अधिमूल्य आकारण्याचे धोरण तयार.

२) विनिमय क्र.३३(१२A) व ३३ (१२B) अंतर्गत होणाऱ्या पुनर्विकासासाठी अतिरिक्त चटईक्षेत्रावर अधिमूल्य आकारणीचा प्रस्ताव.

३) विनिमय क्र.३३(७)(२२) अंतर्गत एकत्रिकरण पुनर्विकासासाठी एकवेळ अधिमूल्य आकारण्याचे धोरण.

४) विनिमय क्र.३३(२४) अंतर्गत पुनर्विकासात वसूल करावयाच्या भांडवली मूल्याचा प्रस्ताव.

**यामुळे महानगरपालिकेच्या महसूलामध्ये लक्षणीय वाढ होईल व अतिरिक्त महसूल निर्मिती होईल.**

**दूरसंचार पायाभूत सुविधांवरील महसूल**

महानगरपालिकेच्या जमिनी, इमारती किंवा संरचनेवर दूरसंचार सेवा प्रदात्यांकडून एकवेळ अधिमूल्य व मासिक भाडे वसूल करण्याचे धोरण अंतिम करण्यात आले आहे. यामुळे महसूलाचे नवीन स्त्रोत निर्माण झाले आहेत.

**कर्मचारी निवासस्थान (प्रशासकीय मंजूरी व कार्यवाही)**

प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्रमांक २६६१ (दि.१३.०३.२०२४) आणि प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्रमांक १७२१ (दि.१३.०३.२०२४) अन्वये कर्मचारी निवासस्थानांसाठी अनुज्ञप्ती शुल्क व सुधारित सेवा आकार दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आले आहेत. याद्वारे महसूल वाढीची अंमलबजावणी सुरु आहे.

**संगणकीय प्रणाली व धोरणात्मक निर्णय**

१) मक्ता भूभागांवरील व महानगरपालिकेच्या भाडेतत्वावरील मालमत्तांच्या पुनर्विकासासाठी 'ना-हरकत' प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीद्वारे जारी केली जात आहेत.

२) रिक्त भूखंड भाडेपट्टा स्वरुपात दीर्घ कालावधीसाठी देण्यासाठी धोरण तयार असून, राज्य शासनाची मान्यता प्रलंबित आहे. सदर धोरणास मान्यता मिळाल्यास महसूलात लक्षणीय वाढ होईल.

**२. खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :**

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **महानगरपालिका मालमत्तांची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण** | स्ट्रक्चरल ऑडिटच्या रिपोर्टनुसार महानगरपालिका मालमत्तांच्या व्यापक स्वरुपाच्या / संरचनात्मक दुरुस्त्या करणे | ३३.०४ | २२.४३ |
| | | महानगरपालिकेच्या मोडकळीस आलेल्या मालमत्तांच्या व्यापक प्रमाणातील दुरुस्त्या /इमारतीची पुनर्बांधणी आणि पुनर्विकास /कर्मचारी निवासस्थाने व इतर इमारती दुरुस्त्या | ३.९१ | ३.२३ |
| | | अर्थसंकल्प 'ब' अंतर्गत येणाऱ्या बी.आय.टी. चाळी, संपादित मालमत्ता, कर्मचारी निवासस्थाने इ. मालमत्तांचे बांधकाम/पुनर्बांधकाम | ०.०१ | --- |

### ३.   सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेच्या मालमत्तांचा व इतर संपादित मालमत्तांचा पुनर्विकास | महानगरपालिकेच्या भाडेकरू मालमत्तांचा विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अन्वये १४८ पुनर्विकास प्रस्तावांना सुधार समिती/महानगरपालिका यांनी मंजूरी दिली. त्यापैकी १० पुनर्विकास प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत. |
| २. | बी.आय.टी. चाळी, अर्धपक्क्या छपऱ्या आणि महानगरपालिका सदनिका यांच्या दुरुस्त्या आणि परिरक्षण करणे. | महानगरपालिकेच्या मोडकळीस आलेल्या मालमत्तांचा विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र.३३(७), ३३(९) मधील तरतूदींनुसार पुनर्विकास केल्यामुळे समाजामधील गरीब वर्गाला चांगल्या प्रकारची निवासस्थाने पुरविली जातीलच. परंतु महानगरपालिकेला मोठया संख्येने प्रकल्पबाधीत व्यक्तींसाठी निवासस्थानेही उपलब्ध होतील. परिणामी रस्ता रुंदीकरणाच्या प्रकल्पबाधीत अनेक प्रकल्प त्वरीत निकालात काढण्यासाठी प्रशासनाला मदत होईल. |
| ३. | महानगरपालिकेच्या धोकादायक इमारतींचे परिरक्षण व संरक्षण | महानगरपालिकेच्या जुन्या मोडकळीस आलेल्या सी-२ व सी-३ संवर्गातील इमारतींचे परिरक्षण /दुरुस्त्या केल्यामुळे या वर्षात कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाली नाही. तसेच धोकादायक सी-१ संवर्गातील इमारतींबाबत जेथे निष्कासनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे अशा इमारतींचे निष्कासन केल्यामुळेही कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाली नाही.<br>सी-३ संवर्गातील किरकोळ दुरुस्ती ही विभाग कार्यालयामार्फत केली जाते. तसेच स्थापत्य व संरचनात्मक स्वरुपाची सी-२ संवर्गातील दुरुस्ती ही प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) या खात्यामार्फत केली जाते. |

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| ४. | महानगरपालिका मालमत्ता खात्याच्या अखत्यारितील इमारतींचे संरचनात्मक लेखा परिक्षण | मालमत्ता खात्याच्या अखत्यारीतील असलेल्या ३०८३ इमारतींपैकी ५०८ इमारतींचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले आहे. उर्वरीत २५७५ इमारती हया बहुतांश तळमजल्याच्या आहेत. त्यापैकी बहुमजली, तसेच आवश्यकता असलेल्या इतर इमारतींचे लेखा परिक्षण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |
| ५. | Auto DCR प्रणाली कार्यान्वित करणे. | सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) खात्याच्या अखत्यारितील सर्व मालमत्ता GIS प्रणालीमध्ये नोंदविण्यात आलेल्या आहेत. भाडे तत्त्वावरील व मक्त्यांतर्गत मालमत्ता पुनर्विकासाचे ‘ना हरकत’ प्रमाणपत्र Auto DCR ऑनलाईन प्रणाली अंतर्गत देण्याची सुविधा व्यवसाय सुलभता अंतर्गत (Ease of Doing Business) दि.१५.०६.२०२३ पासून सुरू करण्यात आलेली आहे. |
| ६. | मालमत्ता हस्तांतरण प्रक्रिया Auto DCR प्रणाली अंतर्गत कार्यान्वित करणे. | मालमत्ता खात्यातील मक्ता हस्तांतरण करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. नजीकच्या काळामध्ये ही प्रणाली देखील विकसित करून कार्यान्वित करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेच्या अंतर्गत इतर खात्याच्या प्रणाली एकत्रित जोडल्या जातील. ज्यामुळे निर्णय प्रक्रिया पारदर्शक व जलद गतीने पूर्ण होऊ शकतील. |
| ७. | मालमत्ता खात्यातील कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मधील खरेदीदार-विक्रीदार यांना संकेतस्थळ उपलब्ध करून देणे. | सदर बाबतची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या आर्थिक वर्षात सदर प्रक्रिया कार्यान्वित होईल. |
| ८. | कर्मचारी निवासस्थान वाटप करणे याबाबतची प्रक्रिया ऑनलाईन करणेबाबत | मालमत्ता खात्यातील कर्मचारी निवासस्थान वाटप करणे याबाबतची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. ज्यामुळे सदर वाटप प्रक्रिया पारदर्शक व जलद गतीने पूर्ण होवू शकेल. |

४. **सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | ३१४.३० | १२८.४० | ३४५.२६ |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ३६१.८६ | २८१.३३ | ३७५.२३ |
| एकूण | ६७६.१६ | ४०९.७३ | ७२०.४९ |

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>कार्यानुरुप अहवाल २०२४-२५</u>**

# गलिच्छ वस्ती सुधारणा

१. **प्रस्तावना** :

महानगरपालिका/शासन आणि खाजगी जमिनींवरील अधिसूचीत गलिच्छ वस्त्यांमधील नागरी सुखसोयींमध्ये सुधारणा करण्याच्या अनेक उपाययोजना गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत पार पाडल्या जातात.

म्हाडा, मुंबई महानगरपालिका व इतर संस्थांनी बांधलेली अनेक शौचालये आवश्यक त्या देखभाली अभावी व वापरात नसल्यामुळे सुस्थितीत राहिलेली नाहीत. यास्तव, अस्तित्वात असलेल्या शौचालयांची पुनर्बांधणी व दुरुस्तीची कामे हाती घेऊन स्वारस्य अभिव्यक्तीद्वारे त्यांच्या दैनंदिन प्रचालन व परिरक्षणाकरिता स्थानिक वस्ती पातळीवरील संस्थांना हस्तांतरित करण्यात येते. याप्रमाणेच, गलिच्छ वस्त्यांमधील नागरी सुखसोयींमध्ये सुधारणा करण्याच्या अनेक उपाययोजना गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत राबविल्या जातात.

गलिच्छ वस्त्यांमध्ये आरोग्यदायी स्थिती राखण्याकरिता मुंबईतील गलिच्छ वस्त्यांमध्ये पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा सुविधांची दर्जोन्नती करण्याकरिता एका गलिच्छ वस्ती सुधारणा कक्षाची स्थापना करण्यात आली असून, सदर कक्षाकडून बृहन्मुंबई महानगरपालिका, केंद्र शासन, राज्य शासन, म्हाडा आणि खाजगी जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांना मुलभूत पायाभूत सुविधा आणि सोयी विषयक बाबींची हाताळणी करण्यात येते. हा कक्ष 'द महाराष्ट्र स्लम एरियाज ॲक्ट,' १९७१ च्या कलम ५ अे नुसार गलिच्छ वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत असलेल्या जबाबदारी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यास प्रशासनास मदत करते.

शहरी गरीबांना विविध नागरी सेवा पुरविणे आणि या सेवांचा दर्जा सुधारणे या हेतूने प्रतिवर्षी, सुव्यवस्थित अशा मुलभूत नागरी सुविधा आणि खात्रीशीर निरोगी/आरोग्यदायी वातावरण देण्याच्या दृष्टीने गलिच्छ वस्ती सुधारणांवर महानगरपालिका भरीव खर्च करते. मागील वर्षाप्रमाणेच यावर्षी देखील गलिच्छ वस्तीमध्ये शौचालये बांधण्यावर विशेषत्वाने भर देण्यात आला आहे. त्यासाठी, महानगरपालिका शौचालयांमध्ये पुरेसा पाणी पुरवठा आणि विद्युत पुरवठा करण्याच्या दृष्टीने देखील जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येत आहेत. गलिच्छ वस्त्यांमध्ये आवश्यक सेवा आणि मुलभूत सुविधा पुरविण्याच्या हेतूने एकात्मिक गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यानुसार मुलभूत नागरी सेवांतील उणीवा शोधणे आणि त्यावर तातडीने तोडगा काढणे शक्य होईल. गलिच्छ वस्त्यांमध्ये सर्वसाधारण स्वच्छता राखणे, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक आरोग्याच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या बाबींवर संनियंत्रण ठेवणे या दृष्टीने नियमित पाहणी करण्यात येते.

एकात्मिक गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत आणखी एक महत्वाची सुधारणा करण्याच्या दृष्टीने गलिच्छ वस्त्यांमधील पायाभूत सुविधांमधील तफावत भरुन काढण्याची योजना आखण्यात आली होती. परंतु त्यामध्ये पुरेशी प्रगती दिसून आली नाही. आता अटी शिथिल करण्यात आलेल्या असून सर्व विभागीय सहाय्यक आयुक्तांना आवश्यक ते परिश्रम आणि आवश्यक त्या मंजूरी घेवून कामे पूर्णत्वास नेणे अनिवार्य केले आहे. विभाग कार्यालयांना त्यांच्या विभागातील गलिच्छ वस्तीमधील रहिवाश्यांच्या लोकसंख्येवर आधारित अर्थसंकल्पीय तरतूद वितरित करण्यात येत आहे.

## २. खात्याची ठळक उद्दिष्ट्ये व ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठीच्या उपाययोजना याचा गोषवारा :

(रू.कोटीत)

| अनु. क्र. | उद्दिष्ट्ये | उपाययोजना | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | **अधिसूचित गलिच्छ वस्त्यांमधील मुलभूत नागरी सुविधांमध्ये सुधारणा** | (एक) विविध गलिच्छ वस्त्यांमधील धुण्याच्या जागा, पाणी पुरवठ्याची व्यवस्था तसेच शौचकूपांच्या मुख्य दुरुस्त्यासह सिमेंट काँक्रीटच्या मार्गिका, रस्ते, बंदिस्त गटारे, प्रकाश व्यवस्था, स्वच्छतेच्या सोयी यासारखी संकीर्ण कामे करणे | ६९.४४ | ★ १०५.१९ |
| | | (दोन) विविध गलिच्छ वसाहतींमधील ए.पी. ब्लॉक्स /पी.एस.सी. ब्लॉक्स यांच्या सेप्टीक टँकच्या दुरुस्त्या आणि त्यामधील मल काढणे तसेच संलग्न कामे करणे | ३.०० | २.२५ |
| | | (तीन) महानगरपालिकेने बांधलेल्या शौचालयाच्या स्थापत्य दुरुस्त्या, विद्युत दुरुस्त्या, प्रचलन आणि परिरक्षण | ९.०० | ६.६५ |

★ सुधारित अंदाज सन २०२३-२४ नुसार रू.१०६.०० कोटी

३.	**सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती आणि साध्य केलेली फलश्रुती :**

| अनु. क्र. | सन २०२३-२४ अखेरीस अपेक्षित फलश्रुती | सन २०२३-२४ अखेरीस साध्य केलेली फलश्रुती |
|---|---|---|
| १. | अधिसूचित गलिच्छ वस्त्यांमधील मुलभूत नागरी सुविधांमध्ये सुधारणा | विविध गलिच्छ वस्त्यांमध्ये शौचकूपांच्या मुख्य दुरुस्त्या आणि सिमेंट काँक्रिटच्या मार्गिका, रस्ते, गटारे, प्रकाश व्यवस्था, धुण्याच्या जागांसह स्वच्छतेच्या सोयी व पाणी पुरवठ्याची व्यवस्था यासारखी संकीर्ण कामे संबंधित कार्यक्षेत्राधीन विभाग कार्यालयाच्या अखत्यारीत पार पाडण्यात आली आहेत. |
| २. | विविध गलिच्छ वसाहतींमधील ए.पी. ब्लॉक्स /पी.एस.सी. ब्लॉक्स यांच्या सेप्टीक टँकच्या दुरुस्त्या आणि त्यामधील मल काढणे तसेच संलग्न कामे करणे | विविध गलिच्छ वसाहतीमधील ए.पी.ब्लॉक्स / पी.एस.सी. ब्लॉक्स यांच्या सेप्टीक टँकच्या दुरुस्त्या आणि त्यामधील मल काढणे यासारखी कामे संबंधित कार्यक्षेत्राधीन विभाग कार्यालयाच्या अखत्यारित पार पाडण्यात आली आहेत. |

४.	**सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय तरतूदी आणि सन २०२३-२४ चे प्रत्यक्ष आकडे:**

(रू.कोटीत)

| तरतूद | अर्थसंकल्पीय तरतूद २०२३-२४ | प्रत्यक्ष खर्च २०२३-२४ | अर्थसंकल्पीय तरतूद २०२४-२५ |
|---|---|---|---|
| भांडवली अर्थसंकल्पीय तरतूद | २३५.७० | २४९.८५ | १८६.२७ |
| महसुली अर्थसंकल्पीय तरतूद | ३३४.४८ | ४९७.८५ | २९३.३४ |
| एकूण | ५७०.१८ | ७४७.७० | ४७९.६१ |

NS3259CA-BMPP-72132-2024-25-10 Copies